**टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या**
**कला आणि सामाजिकशास्त्र शाखेअंतर्गत राज्यशास्त्र विषयाच्या**
**एम.फिल. पदवीसाठी सादर करण्यात आलेला**
**लघुशोधप्रबंध**

# ''महाराष्ट्रातील महिलांचे राजकीय सक्षमीकरण : एक चिकित्सक अभ्यास'' (विशेष संदर्भ - पुणे महानगरपालिका)


**अभ्यासक**
**उत्तरा उत्तम काळे**
राज्यशास्त्र विभाग
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे ३७

**मार्गदर्शक**
**डॉ. प्रकाश पवार**
प्रपाठक
अण्णासाहेब मगर कॉलेज
हडपसर, पुणे २८

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, उत्तरा उत्तम काळे यांनी  टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या कला व सामाजिक शास्त्र शाखेअंतर्गत राज्यशास्त्र विषयातील एम. फिल. पदवीसाठी सादर केलेली **''महाराष्ट्रातील महिलांचे राजकीय सक्षमीकरण : एक चिकित्सक अभ्यास'' (विशेष संदर्भ - पुणे महानगरपालिका)** या विषयावरील शोध-प्रबंधिका माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला आहे. हे संशोधन स्वतंत्र व नवे असून आवश्यक तेथे संदर्भ-निर्देश केलेला आहे. यापूर्वी ते कोणत्याही पदवीसाठी सादर केलेले नाही.

सदर प्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या 'एम. फिल.' (राज्यशास्त्र) पदवीसाठी सादर करण्यास माझी अनुमती आहे.

दिनांक :

स्थळ :

मार्गदर्शक

**डॉ. प्रकाश पवार**

प्रपाठक, राज्यशास्त्र विभाग

अण्णासाहेब मगर कॉलेज

हडपसर, पुणे २८

# प्रतिज्ञापत्र

मी, काळे उत्तरा उत्तम , प्रतिज्ञापूर्वक प्रमाणित करते की, **''महाराष्ट्रातील महिलांचे राजकीय सक्षमीकरण : एक चिकित्सक अभ्यास'' (विशेष संदर्भ - पुणे महानगरपालिका)** या विषयावरील शोध प्रबंधिका मी टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या कला सामाजिक शास्त्र शाखेअंतर्गत राज्यशास्त्र विषयातील 'एम. फिल.' या पदवीसाठी सादर केलेला आहे. माझे हे संशोधन स्वतंत्र व नवे असून आवश्यक तेथे संदर्भ निर्देश केलेला आहे. यापूर्वी ते कोणत्याही पदवीसाठी सादर केलेले नाही.

दिनांक : संशोधक

स्थळ : **काळे उत्तरा उत्तम**

# अर्पणपत्रिका

'आयुष्यभर संघर्षमय जीवन जगत असताना
आपल्या मुलांना केवळ शिक्षणासाठी प्रोत्साहित करणाऱ्या
आई सौ. लता काळे, वडील श्री. उत्तम काळे यांना
सादर अर्पण... !''

# ऋणनिर्देश

एम. फिल. अभ्यासक्रमातंर्गत सादर करावयाचा लघुशोध प्रबंध मी सादर केरीत आहे.

कोणत्याही कार्याच्या परिपूर्णतेसाठी योग्य मार्गदर्शनाची नितांत आवश्यकता असते. त्यामुळे कार्य करण्यास एक दिशा मिळते. हा लघुशोधप्रबंध अतिशय नेमक्या आणि शास्त्रोक्त पद्धतीने मांडण्यात मला माझे संशोधक मार्गदर्शक डॉ. प्रकाश पवार यांचे बहुमोल मार्गदर्शन मिळाले. त्यांच्या सहकार्यामुळेच हा प्रबंध मी पूर्ण करू शकले. म्हणून मी त्यांची ऋणी आहे. तसेच अण्णासाहेब मगर महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. लोखंडे सर, टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख, डॉ. संजीव सोनवणे सर, पुणे विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागातील प्राध्यापक श्री. बाबासाहेब मुंडे सर, संशोधक सहाय्यक श्री. विवेक घोटाळे सर, पुणे महानगरपालिकेतील निवडणूक आयोगातील श्री. अहिर सर या सर्वांचे बहुमोल सहकार्य लाभले.

कोणतेही ध्येय आणि उद्दिष्ट साध्य करण्यासाठी कौटुंबिक आधार तसेच प्रोत्साहनाची आवश्यकता असते. असा भक्कम पाठिंबा माझ्या आईवडिलांनी दिला. मला कोणत्याही प्रकारची कमतरता भासू न देता अभ्यासाठी सतत प्रोत्साहन दिले. त्यांच्या अनेक आर्शिवादामुळेच आज मी ठामपणे उभी आहे. तसेच मला वेळोवेळी प्रेरणा देणारी माझी मोठी बहीण प्रा. उमा काळे हिची मी नेहमीच ऋणी आहे. माझी लहान भांवडे, दीपिका काळे व विशाल काळे यांचे बहुमोल सहकार्य मिळाले.

संशोधनाचे काम करत असताना अनेक मित्र-मैत्रिणींचे सहकार्य लाभले. त्यात प्रामुख्याने परममित्र मितेश पाटील, गंगाधर बनसोडे, प्रज्ञा तारू व रविकांत गंगथडे या मित्राचे बहुमोल सहकार्य लाभले.

प्रस्तुत शोध प्रबंधिकेसाठी पुणे विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागाचे ग्रंथालय, टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील ग्रंथालय व अण्णासाहेब मगर महाविद्यालयातील ग्रंथालय येथील संदर्भाचा आधार घेतला.

या ग्रंथालयातील कर्मचारी वर्गाने आवश्यक ती मदत केली व संदर्भ ग्रंथ पुरविले त्यामुळे मी या सर्वांची आभारी आहे.

प्रस्तुत शोधप्रबंधिका निवडणुकीच्या राजकारणाचा अभ्यास करणाऱ्या संशोधकांना उपयुक्त व मार्गदर्शक ठरली तर मला नक्कीच आनंद वाटेल.

**- उत्तरा काळे**

# अनुक्रमणिका

प्रमाणपत्र

प्रतिज्ञापत्र

ऋणनिर्देश

प्रकरण पहिले : प्रस्तावना व संशोधन पद्धती १-११

१.१ प्रास्ताविक

१.२ महिलांचे राजकीय सक्षमीकरण

१.३ उद्दिष्ट्ये

१.४ गृहितके

१.५ विषयाचे महत्त्व

१.६ संशोधन पद्धती

१.७ सर्वेक्षणाची उद्दिष्टे

१.८ सर्वेक्षण करण्याची पद्धत

१.९ संकळीक माहिती

१.१० क्षेत्रीय अभ्यास

१.११ सारांश

प्रकरण दुसरे : उपलब्ध संदर्भ साहित्याचा आढावा १२-४४

२.१ महिलांचा राजकीय व निर्णय प्रक्रियेतील सहभाग

२.२ उपलब्ध संदर्भ साहित्य भाग १

२.३ उपलब्ध संदर्भ साहित्य - भाग २

प्रकरण तिसरे : पुणे महानगरपालिकेतील महिलांचा राजकीय सहभाग ४५-९७
(२०११-२०१२ निवडणूक)
३.१ महिला नगरसेविकांच्या माहितीचे विश्लेषण
३.२ पुणे महानगरपालिकेतील पक्षनिहाय निवडून आलेल्या महिलांचे वर्गीकरण
३.३ पुणे महानगरपालिकेतील पक्षनिहाय निवडून आलेल्या महिलांच्या व्यवसायाचे वर्गीकरण
३.४ पुणे महानगरपालिकेतील पक्षनिहाय निवडून आलेल्या महिलांच्या जातीचे निकष / वर्गीकरण
३.५ पुणे महानगरपालिकेतील महिला नगरसेवकांची वयानुसार वर्गवारी
३.६ पुणे महानगरनपालिकेतील पक्षनिहाय निवडून आलेल्या महिलांच्या शिक्षणाचे वर्गीकरण
३.७ पुणे महानरगपालिकेतील पक्षनिहाय विजयी महिला उमेदवारांची निवडणूक लढवलेली संख्या

प्रकरण चौथे : पुणे मनपातील महिलांचे प्रतिनिधीत्व ९८-१०६
४.१ प्रस्तावना
४.२ महाराष्ट्रातील राजकीय पक्ष
४.३ सक्रीय राजकीय सहभाग
४.४ महिलांच्या राजकीय सहभागाची पार्श्वभूमी
४.५ कारणे
४.६ निवडणूक
४.७ कौटुंबिक पार्श्वभूमी
४.८ पाठिंबा
४.९ आरक्षण धोरण
४.१० राजकारणातील महिलांची प्रगती
४.११ निर्णय निर्मितीमध्ये सहभाग
४.१२ सहभाग पातळी

४.१३ राजकारणातील न्याय

४.१४ समस्या

४.१५ सारांश

प्रकरण पाचवे : निष्कर्ष १०७-११५

५.१ प्रस्तावना

५.२ निष्कर्ष

५.३ २००२ निवडणूक

५.४ २००४ निवडणूक

५.५ २००७ निवडणूक

५.६ २०११-१२ निवडणूक

५.७ गृहितकांचा शोध

५.८ उपाययोजना

प्रकरण सहा : परिशिष्ट्ये ११६-११७

१) संदर्भ ग्रंथ सूची

२) नियतकालीका व वर्तमानपत लेख सूची

३) संकेतस्थळ

# तक्त्यांची यादी


| तक्ता क्र. | तक्ता | पान क्र. |
|---|---|---|
| १ | केंद्रीय मंत्रिमंडळातील महिलांचे प्रतिनिधीत्व | १२ |
| २ | सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालय या ठिकाणी महिला न्यायाधिशांची संख्या | १३ |
| ३ | भारतातील न्यायाधिशांची रिक्त जागा स्थिती | १४ |
| ४ | भारतीय प्रशासकीय सेवा, पोलीस दल, परराष्ट्र सेवा यामधील राज्य आणि केंद्र शासित प्रदेश अंतर्गत महिला अधिकाऱ्याची संख्या | १५-१६ |
| ५ | संपूर्ण भारतातील आणि केंद्रिय सेवादलातील महिलांचे प्रतिनिधीत्व | १७ |
| ६ | लोकसभेतील जागा, संख्या आणि संविधानातील प्रकार | १८-१९ |
| ७ | निर्णय प्रक्रियेतील महिलांचे योगदान | २०-२१ |
| ८ | पंचायत राज संस्थामधील महिलांचे प्रतिनिधीत्व | २२-२३ |
| ९ | पंचायत राज संस्थामधील महिलांचे प्रतिनिधीत्व टक्केवारी आकड्यानुसार | २४-२५ |
| १० | संसदेतील महिलांचा सहभाग १९५२-२००९ | २६ |
| ११ | महिला एमपी पक्षानुसार १३, १४, १५ वी लोकसभा निवडणूक संख्या | २७ |
| १२ | Bank Account held by women | २८ |
| १३ | Women with land holdings | २९ |

# आलेख यादी


| आलेख क्र. | आलेख | पान क्र. |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्रातील राजकीय पक्ष | ९८ |
| २ | सक्रीय राजकीय सहभाग | ९९ |
| ३ | महिलांच्या राजकीय सहभागाची पार्श्वभूमी | ९९ |
| ४ | कारणे | १०० |
| ५ | निवडणूक | १०० |
| ६ | विजयी महिला टक्केवारी | १०१ |
| ७ | कौटुंबिक पार्श्वभूमी | १०१ |
| ८ | पाठिंबा | १०२ |
| ९ | आरक्षण धोरण | १०२ |
| १० | राजकारणातील महिलांची प्रगती | १०३ |
| ११ | राष्ट्रीय पातळीवरील राजकारण | १०३ |
| १२ | निर्णय निर्मितीमध्ये सहभाग | १०४ |
| १३ | सहभाग पातळी | १०४ |
| १४ | राजकारणातील न्याय | १०५ |
| १५ | समस्या | १०५ |

प्रकरण १

# प्रस्तावना व संशोधन पद्धती

**प्रास्ताविक :**

भारतीय संविधानाच्या कलम (२४३ K) आणि (२४३ ZA) याचा आधार घेऊन ७३ वी आणि ७४ वी घटना दुरुस्ती करून त्याची अंमलबजावणी करण्यात आली व त्यानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांची निर्मिती करण्यात आली.

प्रस्तुत प्रकरणामध्ये दोन महत्त्वाच्या बाबींचा अभ्यास करण्यात येणार आहे. की जो संशोधनाचा एक भाग आहे. पहिला भागात संविधान व अंमलबजावणी यांचा अभ्यास केला आहे, तर दुसऱ्या भागात ३३% व ५०% राखीव जागांचे धोरण यांचा न्यायालयीन निर्णय प्रक्रियेतून अभ्यास केला आहे.

भारत हे एक सर्वात मोठे लोकशाही राज्य आहे. त्यामध्ये महिलांचा राजकीय सहभागाचा उल्लेख करण्यात येतो व यासाठी विविध कलम व कायदे अंमलबजावणी वेळोवेळी करण्यात आले आहेत.

भारतीय संविधान अंतर्गत महिलांना काही मुलभूत अधिकार हे कलम १४, १५, १५ (१), १६, २१ व २३ याअंतर्गत देण्यात आलेले आहे. तर मार्गदर्शक तत्त्वे ही कलम ३९(ए), ३९ (डी), ३९ (ई), ४२, ४४ याअंतर्गत देण्यात आलेले आहे. तसेच मार्गदर्शक कर्तव्ये ही कलम १५ (ए) याअंतर्गत देण्यात आलेले आहेत.

स्थानिक पातळीवर आरक्षण : ७३ वी व ७४ वी घटना दुरुस्तीनंतर महिलांना पंचायत राज्य संस्था व महानगरपालिकामध्ये आरक्षण धोरण लागू करण्यात आलेले आहे. संसदीय कायदेमंडळातून पास झालेले हे पहिले धोरण आहे.

कलम २४३-डी[११] अंतर्गत पंचायत राज्य व्यवस्थामध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती याच्यासाठी जागा आरक्षित ठेवण्यात आलेल्या आहेत तसेच १/३ ही जागा अनुसूचित जातीसाठी आरक्षित आहे. क्लॉज १[१२] च्या साहाय्याने वरील आरक्षण धोरण जाहीर करण्यात आलेले आहे.

कलम २४३-टी[१२] या अंतर्गत ७४ वी घटना दुरुस्ती करून पंचायत राज्य संस्थामध्ये व

महानगरपालिकांमध्ये ३३% आरक्षण हे महिलांसाठी राखीव करण्यात आलेले आहे. महिला आरक्षण धोरण[१३] अनुसार ९ मार्च २०१० रोजी वरिष्ठ सभागृहात (राज्यसभा) महिलांसाठी ३३% आरक्षण धोरण हे लोकसभामध्ये राखीव करण्यात आलेले आहे व महिला प्रतिनिधीत्वाला चालना देण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोग हा २० एप्रिल १९९४ रोजी संविधानिक रूपाने अस्तित्वात आला. प्रथम निवडणूक ही १९९५ साली घेण्यात आली. ही निवडणूक कल्याण, डोंबिवली महानगरपालिका, नवी मुंबई, महानगरपालिका आणि औरंगाबाद महानगरपालिका या ठिकाणी घेण्यात आली.

डिसेंबर १९९६ ते मार्च १९९७ दरम्यान सामान्य स्वरूपाची निवडणूक घेण्यात आली. यामध्ये २१७ महानगरपरिषद, १० महानगरपालिका, २५ जिल्हा परिषद आणि ३९९ पंचायत समिती होत्या. त्याचप्रमाणे डिसेंबर २००१ ते मार्च २००२ दरम्यान सामान्य निवडणूक घेण्यात आली. त्यामध्ये २०१ नगरपरिषद, १२ महानगरपालिका, १७ जिल्हा परिषद व ३०९ पंचायत समिती होत्या. या सर्व निवडणुका स्थानिक स्वराज्य संस्था अंतर्गत घेण्यात आल्या. सध्या महाराष्ट्रात २३ महानगरपालिका कार्यतर आहेत.

१९९२ ते २०१२ या काळात राजकारण व प्रभुत्व महानगरपालिकेचे पक्षीय राजकारण व प्रभुत्व यामध्ये स्पर्धा आहे. व त्याचा परिणाम भारतीय राजकारणावर झाला आहे. तसेच संविधान व निवडणूक कायदा याचा राजकीय प्रक्रियेत महत्त्वाचा प्रभाव आहे.

**पंचायत राज्यव्यवस्थामध्ये महिलांसाठी ५०% आरक्षण :**

या अंतर्गत ५०% आरक्षण धोरण जाहीर करण्याअगोदर या पूर्वी जाहीर झालेले तीनही आरक्षणाचा विचार करण्यात आला व पंचायत राज्य व्यवस्थेचे युनियन मंत्री डॉ. सी.पी. जोशी यांनी लोकसभेत निवेदन पाठविले व त्यामध्ये ५०% धोरण आरक्षित का करावे? याचा तपशील सांगितला.

यावरती लोकसभेत चर्चा होऊन १९ एप्रिल २०११ मध्ये महाराष्ट्र राज्य कायदेमंडळाने ५०% आरक्षणाचे धोरण महिलांसाठी जाहीर केले व हे धोरण स्थानिक स्वराज्य संस्थेत जाहीर करण्यात आले.

**महिलांचे राजकीय सक्षमीकरण :**

महिलांचे राजकीय सक्षमीकरण म्हणजे काय? याचा विचार केला असता असे सांगता येईल की, सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक या सर्व प्रक्रियेमधून महिलांचा विकास साधणे व आर्थिकदृष्ट्या त्यांना सबल करणे हा होतो.

**उद्दिष्टे :**

१) संशोधनाने सर्वात महत्त्वाचे उद्दिष्ट साध्य केले आहे ते म्हणजे महिलांच्या राजकीय संक्षमीकरणाबद्दल जागृती निर्माण करणे.

२) राजकीय पक्ष, शासन यंत्रणा व बिगर शासकीय संघटना यांच्या माध्यमातून महिलांच्या हक्काची जाणीव करून दिली आहे.

३) महिलांचा आर्थिक, सामाजिक, राजकीय व शैक्षणिक दर्जा यांची माहिती घेतलेली आहे.

४) महिलांच्या राजकीय सहभागात व निर्णय प्रक्रियेतील वर्चस्वाचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

५) सर्वात महत्त्वाचे उद्दिष्ट म्हणजे महिलांना राजकीय सहभाग घेण्यासाठी प्रोत्साहन देणे व त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करून राजकीय व्यवस्थेमध्ये उच्चपदावर जाण्यासाठी प्रेरणा दिलेली आहे.

६) निवडणुकीमधील महिलांचा राजकीय सहभाग याचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

७) महानगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत राज्य यामधील महिलांचा राजकीय सहभाग व टक्केवारी यांचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

वरील सर्व उद्दिष्ट साध्य करण्यासाठी प्रत्यक्ष मुलाखत व साकळीक माहिती याचा उपयोग करण्यात आलेला आहे. प्रत्यक्ष मुलाखत घेताना प्रश्नोत्तर पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे.

**गृहितके :**

१) स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये ५०% राखीव जागांचे धोरण व आरक्षणाची अंमलबजावणी झाल्यामुळे पुणे महानगरपालिकेतील महिलांचा राजकीय सहभाग.

या ठिकाणी आरक्षणामुळे महिलांचा राजकीय सहभाग वाढलेला दिसतो. त्यांचे प्रमाण हे पुरुषांच्या तुलनेत जास्त प्रमाणात आहे.

२) पुणे महानगरपालिकेतील महिलांचे राजकीय सक्षमीकरण व सबलीकरण.

राजकीय सहभागामुळे महिलांना स्वत:च्या हक्कांची व कर्तव्यांची जाणीव होऊन त्या सर्व दृष्टिकोनातून सक्षम झालेल्या आहेत व या साठी मुलभूत हक्क व कर्तव्ये यांचा वापर करताना दिसतात.

३) राजकीय संरचनाच्या दृष्टिकोनातून महिलांचे खरेच राजकीय सक्षमीकरण झाले आहे का?

**विषयाचे महत्त्व :** निवडणुकीच्या राजकारणांवर यापूर्वी अभ्यास झाला आहे. पण प्रत्यक्ष महानगरपालिका निवडणूक व महिलांचा राजकीय अभ्यास यावर फार कमी प्रमाणात अभ्यास करण्यात आलेला आहे. आणि आता हा विषय निवडीचे कारण की स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये महिलांसाठी आरक्षित झालेले ५०% राखीव जागांचे धोरण होय. या धोरणाचा राजकीय व्यवस्थेवर व सामाजिक व्यवस्थेवर कशा प्रकारे प्रभाव पडला आहे व काय बदल होणार आहेत याचा अभ्यास करता यावे म्हणून हा विषय निवडला आहे.

या विषयाअंतर्गत पुणे महानगरपालिका ही सर्वात जास्त मोठी महानगरपालिका समजली जाते. या दृष्टिकोनातून त्यामध्ये सामाजिक, राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक बदल काय झाले आहेत ते हे लक्षात घेतलेले आहे. तसेच महानगरपालिकेतील राखीव व आरक्षणाचा फायदा घेऊन किती महिला निवडून आल्या हे स्पष्ट झालेले आहे. महानगरपालिकेतील महिला व पुरुष यांच्यातील प्रमाण सांगितले गेले आहे. महिलांचे प्रमाण हे पुरुषांच्या तुलनेत जास्त आहे. त्याचप्रमाणे २००२, २००७ व २०१२ या तीनही निवडणुकीतील सत्तेत झालेले फेरबदल संशोधनाने सिद्ध केले आहे. आणि महानगरपालिका निवडणुकींमध्ये जनतेने कोणत्या पक्षाची योग्यता स्वीकारली आहे हे तुलनात्मक पद्धतीने सांगितले आहे.

## संशोधन पद्धती : (सर्वेक्षण, नमुना, पाहणी पद्धत)

राजकीय प्रक्रियेचा अभ्यास करण्याचा एक प्रकार म्हणून सर्वेक्षणाकडे पाहिले जाते. सर्वेक्षण हा संशोधन प्रकार जास्त प्रसिद्ध असल्यामुळे त्याबद्दलचे गैरसमज देखील जास्त आहेत. सर्वेक्षण अभ्यास पद्धतीमध्ये अभ्यास करण्याच्या एकूण समुहामधूप काहींची निवड करून मुलाखतीद्वारे संकलन करणे, त्यानंतर त्यांची सांख्यिकी माहिती सांगणे.

सर्वेक्षणामध्ये सांख्यिकी पद्धतीने माहिती गोळा केली जाते व तिची मांडणी केली जाते. क्षेत्रिय अभ्यासामध्ये सांख्यिकी माहिती नसते.

## सर्वेक्षणाची उद्दिष्टे :

- मोठ्या जनसंख्येविषयी सामान्यीकरण करणे. उदा. भारताची लोकसंख्या किती त्यामध्ये आपल्या जिल्ह्याची गावाची लोकसंख्या किती.
- तथ्याचे सांख्यिकी सादरीकरण करणे. उदा- मिळालेली आकडेवारीतील माहिती टक्केवारीच्या भाषेत सांगणे.
- कृती व सामाजिक आर्थिक घटक यांच्यातील परस्पर संबंध शोधणे. उदा.कोणती भाषा बोलणारे लोक कोणाच्या पाठीमागे आहे.

## सर्वेक्षणाचे किंवा नमुना पाहणीचे प्रकार :

- सामाजिक व आर्थिक पाहणी/सर्वेक्षण - हा एक सर्वेक्षणाचा प्रकार आहे. १९३० मध्ये धनंजय गाडगीळ यांनी पुणे शहराची सामाजिक व आर्थिक पाहणी करून प्रथम याचा असा अभ्यास केला होता. आज या पद्धतीचा वापर करून अनेक अभ्यास केले जात आहेत.
- लोकमताची पाहणी - राजकीय व बिगर राजकीय अशा दोन प्रकारे लोकमताची पाहणी करता येते. उदा- एखादा समाज कोणत्या पक्षाला मतदान करतो किंवा बिगर राजकीय पाहणीमध्ये चित्रपट महिन्यातून कितीवेळा पाहता. अशी नियमित पद्धतीने पाहणी केली जाते.
- मार्केट संशोधन किंवा पाहणी - आपले उत्पादन खपविण्यासाठी मार्केट संशोधन सर्वेक्षण केले जाते.

- **निवडणूक पाहणी / सर्वेक्षण -** हे सर्वेक्षण तीन प्रकारे केले जाते.

१) निवडणूक चाचणी - निवडणुकीच्या अगोदर तसेच मतदान केंद्रातून मतदान करून बाहेर आल्यानंतर मतदारांचे सर्वेक्षण केले जाते. निवडणूकीचा अंदाज व्यक्त करण्यासाठी ही पद्धत वापरली जाते. ही पद्धत अमेरिकेत उदयास आली. भारतामध्ये १९८९ नंतर प्रसिद्धी माध्यमांनी निवडणूक चाचणी घेण्यास सुरुवात झाली. याला कारण भारतासारख्या अवाढव्य देशामध्ये मतदान व मतमोजणी यामध्ये अंतर असते या अभ्यासातून जास्त पैसा माध्यमांना मिळू लागल्यानंतर २४ तास बातम्या देणारी माध्यमे उदयाला आली.

२) निवडणूक पूर्व विश्लेषण - मतदानाच्या आधी राजकीय पक्षांत उमेदवारांना माहिती देणाऱ्या तटस्थपणे सर्वेक्षण करणाऱ्या संशोधन संस्थांना महत्त्व आले. लोकांच्या, समस्या, नेत्याबद्दलची माहिती, प्रचार काय व कोठे करायचा निवडणूक आधी लोकांचा काय कल होता तो निवडणूकीनंतर काय राहिला हे तपासले आहे.

३) निवडणूकीनंतरचे सर्वेक्षण - आपल्याला कोणी मते दिली हे राजकीय पक्षांना व नेत्यांना समजते.

## सर्वेक्षण करण्याची पद्धत -

सर्व्हे करण्यासाठी चांगली प्रश्नावली तयार करावी लागते. त्यामध्ये स्वत: प्रश्न तयार करावे लागतात  १) प्रश्न दोन प्रकारचे असतात. एक बंदिस्त प्रश्न म्हणजे उत्तर कर्त्याला केवळ पर्यायामधून एक पर्याय निवडायचा असतो.

२) व्यक्तिगत किंवा कौटुंबिक माहितीचे प्रश्न - यातून उत्तरकर्त्याची सामाजिक, आर्थिक माहिती मिळविता येते.

३) नमुना म्हणजे काय? - तार्किकता, सांख्यिकी माहिती याबाबत सारखेपणा असण्याची शक्यता असते. समान परिस्थितीतील लोक समान कृती व विचार करण्याची शक्यता जास्त असल्याने निश्चित सांख्यिकी उत्तर मिळत नाही.

संशोधन विषयाचा अभ्यास करताना सर्वेक्षण पद्धत वापरली आहे. व याच्या माध्यमातून प्रत्यक्ष मुलाखत घेऊन विश्लेषण केलेले आहे.

## राजकीय विश्लेषणाच्या पद्धती -

साकळीक तथ्य किंवा माहिती

**प्रस्तावना -**

सर्वेक्षण क्षेत्रीय अभ्यास व साकळीक तथ्य या आधुनिक राजकीय विश्लेषणाच्या पद्धती आहेत. राजकीय विश्लेषण करण्यासाठीची हत्यारे किंवा साधने म्हणून यांच्याकडे पाहिले जाते. पारंपरिक राज्यशास्त्राची तर्कशास्त्र तत्त्वज्ञान, विचारप्रणाली ही हत्यारे किंवा साधने होती. परंतु त्या आधारे अचूकपणे राजकीय विश्लेषण करता येत नव्हते.

आधुनिक राजकीय सत्ता व्यवहार समजून घेण्यासाठी या विश्लेषणाच्या तीनही पद्धती उपयुक्त आहेत. राजकीय समीकरण कसे घडून येते याचे विश्लेषण करताना या संदर्भाचा पुरावा काय हा प्रश्न निर्माण होत होता, जेव्हा राजकीय प्रक्रियेचे विश्लेषण केले जाते त्यावेळी त्याला पुरावा असणे गरजेचे असते. तथ्यनिष्ठ राजकारणापेक्षा अनुभवनिष्ठ राजकारणावरती आधुनिक विश्लेषणाने भर दिला. समाजव्यवस्थेमध्ये व राजकीय व्यवस्थेमध्ये निर्माण होणाऱ्या समस्यांचे विश्लेषण करण्यासाठी राज्यशास्त्रामध्ये विश्लेषणाच्या अनेक पद्धती वापरल्या गेल्या त्यामध्ये साकळीक माहिती, सर्वेक्षण क्षेत्रीय अभ्यास या सर्वांचा समावेश होतो.

## साकळीक माहिती -

साकळीक तथ्य किंवा माहिती असणे संपूर्ण समाजाबद्दलची माहिती होय.

सरकार किंवा शासनसंस्था ही माहिती गोळा करणारी महत्त्वपूर्ण यंत्रणा आहे. साकळीक माहितीचे स्त्रोत आपण स्वत: निर्माण करत नाहीत तर सरकार किंवा शासनसंस्था शोधून ठेवतात. याचाच अर्थ सरकार जी माहिती गोळा करते ती माहिती साकळीक माहिती व औपचारिक देखील असते.

सरकार साकळीक माहिती गोळा करून प्रसिद्ध करते. त्याची काही उदाहरणे खालीलप्रमाणे -

१) भरतीय जनगणना अहवाल

२) राज्य व जिल्हा पातळीवरती देखील जनगणना अहवाल सरकार प्रसिद्ध करते.

३) सामाजिक व आर्थिक पाहणी

४) भारतीय निवडणूक आयोग व राज्य निवडणूक आयोग

५) जिल्हा गॅझेटिअर

६) मानव विकास अहवाल

७) शेतीविषयक सर्वेक्षण

८) एस. सी. एस. टी. आयोगाचे अहवाल

९) वेगवेगळ्या संदर्भामध्ये सरकारने नेमलेल्या आयोगांचा अहवाल उदा. सच्चर कमिटी

सरकार माहिती गोळा करते. संकलित करणे व प्रसिद्ध देखील करते यातून राजकारणाला आवश्यक असणारी माहिती मिळत जाते व तिच्या आधारे राजकीय प्रक्रियेचे विश्लेषण करता येते.

संशोधन विषयाचा अभ्यास करताना साकळीक माहिती यापैकही भारतीय निवडणूक आयोग व राज्य निवडणूक आयोग याचा उपयोग प्रकरण २ व ३ मध्ये केलेला आहे.

## अग्रीगेट (Aggregate) डाटाचे महत्त्व

१) साकळीक माहितीमुळे सर्व समाजाबद्दलची अधिकृत माहिती मिळालेली आहे.

२) ठराविक कालखंडानंतर सरकार सर्व माहिती प्रसिद्ध करते. त्यामुळे नवीन व जुनी माहिती यांचा तुलना करणे शक्य झाली आहे.

३) साकळीक माहितीमध्ये अभ्यास करणाऱ्याला हव्या त्या घटकाची माहिती मिळते. विभाग, जिल्हा, गाव, शहर, जात, धर्म अशा प्रत्येक घटकाची माहिती मिळालेली आहे.

४) साकळीक माहिती फुकट मिळते तशीच ती सहजरीत्या उपलब्ध देखील असते.

अग्रीगेट डाटाचे लिमिटेशन

१) साकळीक माहिती परिपूर्ण नसते. ज्या ठिकाणावरून ही माहिती मिळविली जाते. तेथून १००% सत्य माहिती गोळा केली जाईल किंवा होईल असे म्हणता येत नाही. म्हणजेच तिच्या माहितीच्या स्त्रोताबाबत अनेक आक्षेप आहेत.

२) शासकीय पातळीवरती जी माहिती गोळा केली जाते त्या संकलन पद्धतीमध्ये देखील चुका

किंवा दोष आहेत. उदा. गरीबिची व्याख्या सरकार वेगवेगळ्या पद्धतीने देते. दारिद्र्य रेषेबद्दलचा वाद चालूच आहे. रेशन दुकानामधील वस्तू कोणाला द्यायच्या याच्या संदर्भामध्ये वाद आहेच त्याचबरोबर बीपीएलचा वाद सुरुच आहे.

३) १९९० पूर्वी बौद्ध हे अनुसूचित जातीमध्ये गणले जात नव्हते त्यामुळे त्यांची संख्या कमी राहिली.

४) २००१ च्या जनगणनेमध्ये मात्र बौद्धांचा समावेश अनुसूचित जातीमध्ये झाल्याने त्यांची संख्या वाढली.

५) जी माहिती सरकार गोळा करत नाही, ती माहिती उपलब्ध होत नाही. उदा. १९३१ च्या जनगणनेनंतर जातीनिहाय जनगणना बंद झाली त्यामुळे जातीची माहितीच उपलब्ध होत नाही.

६) सरकार काही वेळेस गुप्ततेचे तत्त्व पाळण्यासाठी बरीचशी माहिती देतच नाही. राजकीयदृष्ट्या संवेदनशील विषयांची माहिती सरकार देत नाही. त्यामुळे परिपूर्ण अभ्यास करता येत नाही.

## साकळीक माहितीमधून कोणकोणत्या प्रकारची माहिती मिळते -

- हिंसेबद्दलची माहिती मिळते. (Domestic violence act)
- सरकारी योजना व त्यावरील खर्च.
- दंगलीबद्दलची माहिती मिळते.
- न्यायालयीन निर्णयाबद्दल माहिती मिळते.
- निवडणूकी संदर्भातील माहिती मिळते.
- विधिमंडळातील कामकाजाची माहिती मिळते.

## अग्रीगेट (संकलीत माहिती) डाटातून खालील माहिती मिळत नाही -

- सरकारी योजनांचे लाभधारक कोण, कोणत्या जागीच्या लोकांना त्याचा फायदा झाला इ. माहिती मिळत नाही.
- निवडणुकीमध्ये कोणत्या जातीने कोणाला मतदान केले हे समजत नाही. पातळीवरील राजकारण कसे घडते हे कळत नाही.

## सारांश -

साकळीक माहिती सरकार गोळा करते व प्रसिद्धी करते. त्यामुळे ती अधिकृत असते. त्याआधारे आधुनिक राजकीय प्रक्रियेचे विश्लेषण करता येते. संपूर्ण समाजाबद्दलची माहिती यातून मिळते.

परंतु ती किती खरी याबाबत सांशकता असते. एकूणच आधुनिक राजकीय विश्लेषणामध्ये साकळीक माहितीलाच महत्त्वपूर्ण स्थान आहे.

क्षेत्रीय अभ्यास पद्धतीचा उपयोग प्रकरण तीन मध्ये करण्यात आलेला आहे. याद्वारे महिलांचे सामाजिक स्थान याबद्दलची माहिती मिळवलेली आहे.

## क्षेत्रीय अभ्यास -

प्रस्तावना - आधुनिक राजकीय विश्लेषणामध्ये साकळीक माहितीप्रमाणेच क्षेत्रीय अभ्यास ही एक अभ्यास पद्धती वापरली जाते. एखाद्या ठिकाणाचा अभ्यास करून त्या आधारे संपूर्ण समाजाबद्दलचे निकष मांडले जातात.

**क्षेत्रीय अभ्यास प्रकार -**

**१) निवासी क्षेत्रीय अभ्यास -** एखाद्या ठिकाणी जाऊन तेथे राहून निरीक्षण करून जो अभ्यास केला जातो त्यास निवासी क्षेत्रीय अभ्यास असे म्हटले जाते.

**२) सहभागी क्षेत्रीय अभ्यास -** एखाद्या समाजाचा भाग म्हणून निरीक्षण करून करण्यात आलेल्या अभ्यासाला सहभागी क्षेत्रीय अभ्यास असे म्हणतात.

**व्याख्या -** एखाद्या समूहाच्या बाहेरील अभ्यासकाने त्या समुहामध्ये जाऊन दीर्घकाळ निरीक्षण करून अभ्यास करण्याच्या पद्धतीला क्षेत्रीय अभ्यास असे म्हणतात.

**उद्दिष्टे -**

१) सखोल अभ्यास करणे.

२) स्थानिक राजकीय प्रक्रिया समजून घेणे.

३) दिर्घकाळाच्या निरीक्षणावरून वर्तनाचे आकृतीबंध समजावून घेणे.

४) वेगवेगळ्या समूहांचे हितसंबंध व राजकारण यांच्यातील परस्पर संबंध शोधणे, कर्ते घटक समजून घेणे. संघटन कसे केले जाते हे अभ्यासणे.

५) राजकीय जागृतीचे मार्ग अभ्यासणे.

६) वर्चस्वाचे आधार समजून घेणे.

७) विविध अंगी सखोल अभ्यास करणे.

- **क्षेत्रीय अभ्यास करण्याची पद्धती -**

१) तटस्थपणे निरीक्षण करून अभ्यास करणे.

२) सहभागी निरीक्षण करून अभ्यास करणे. उदा. सभांना उपस्थित राहणे.

३) तपशीलवाल मुलाखती घेणे.

४) गटचर्चा घडवून आणणे.

५) स्थानिक दस्तावेज / पत्रव्यवहार तपासणे.

**क्षेत्रीय अभ्यासाचे प्रकार -**

**१) वर्णनपर क्षेत्रीय अभ्यास -** अभ्यासकही अभ्यास हे एखाद्या घटनेचे स्थानाचे वर्णन करून केले जातात. त्याला वर्णनपर क्षेत्रीय अभ्यास असे म्हटले जाते.

**२) गृहितकाच्या आधारे क्षेत्रीय अभ्यास -** विशिष्ट प्रश्नावरील गृहीतकाच्या अभ्यास करण्याच्या पद्धतीला गृहीतकाच्या आधारे क्षेत्रीय अभ्यास असे म्हटले जाते. यामध्ये प्रश्नावली तयार करून अभ्यास केला जातो.

**३) निवडणूक अभ्यास -** निवडणूक लागण्याअगोदर, निवडणूकीच्या वेळी व निवडणुकीनंतर जो अभ्यास केला जातो त्यास निवडणूक अभ्यास असे म्हटले जाते. हा क्षेत्रीय अभ्यासाचा महत्त्वपूर्ण प्रकार आहे.

**४) सामान्य किंवा नित्य राजकीय प्रक्रियेचा अभ्यास -** राजकीय प्रक्रिया कशी घडते, तिच्यावरती कोणते घटक परिणाम करतात याचा यामध्ये अभ्यास केला जातो.

कार्टर व लिगो यांनी नित्य राजकीय प्रक्रियेचा अभ्यास केला आहे तर रजनी कोठारी, योगेंद्र यादव, सुहास पळशीकर, नितीन चिरमल, प्रकाश पवार यांनी निवडणूकांच्या राजकारण्याचा अभ्यास केला आहे.

**क्षेत्रीय अभ्यासाचे महत्त्व व फायदा -**

१) राजकीय प्रक्रियेचे तपशील समजतात, प्रत्यक्ष राजकारण समजते.

२) क्षेत्रीय अभ्यासातून खरी माहिती मिळते.

३) कृती व भावना यांच्यातील परस्परसंबंध काय आहेत हे समजण्यासाठी हा अभ्यास उपयुक्त आहे.

- **क्षेत्रीय अभ्यासाच्या मर्यादा / तोटे :**

१) क्षेत्रीय अभ्यास करण्यासाठी निरीक्षण शक्ती व परिपक्वता उच्च दर्जाची असावी लागते.

२) वास्तव समजून घेणे गरजेचे असते.

३) क्षेत्र निवडणूकीमध्ये पक्षपात होऊ शकतो.

४) या अभ्यासात पुनरावृत्ती होण्याची शक्यता असते.

## सारांश -

आधुनिक राजकीय विश्लेषणामध्ये क्षेत्रीय अभ्यासाला महत्त्वाचे स्थान आहे. कारण यातून सखोल अभ्यास करता येतो. राजकीय प्रक्रियेवरती प्रभाव टाकणाऱ्या घटकांचा अभ्यास करता येतो.

एखाद्या बाबीवर जाणीवपूर्वक सूक्ष्म अभ्यास करून उपलब्ध माहितीपेक्षा वेगळी माहिती मिळविणे. मिळालेल्या माहितीची चिकित्सा करणे, हे सूक्ष्म अभ्यास पद्धतीत अपेक्षित असते. हे करताना वेगवेगळ्या पद्धतीचा वापर केला जातो. यापैकीच क्षेत्रीय अभ्यास पद्धती ही एक अभ्यास पद्धती आहे. या पद्धतीत एका ठिकाणचा अभ्यास करून त्याआधारे निष्कर्ष मांडले जातात. हे निष्कर्ष काहीवेळा क्षेत्रीय ठिकाणी अभ्यास करणे बरोबरच तटस्थ निरीक्षण करावे लागते.

प्रकरण २

# उपलब्ध संदर्भ साहित्याचा आढावा

समकालीन राजकीय चळवळ : नवहिंदूत्व व जातसंघटना - प्रा. डॉ. प्रकाश पवार

## महिलांचा राजकीय आणि निर्णय प्रक्रियेतील सहभाग

**केंद्रीय मंत्रिमंडळातील महिलांचे प्रतिनिधीत्व :०**

सन २००६ ते २००९ या काळात केंद्रीय मंत्रिमंडळातील महिलांच्या प्रतिनिधीत्वाचा अभ्यास करताना तक्ता नं. १ च्या साहाय्याने असे दिसून आले की, कॅबिनेट मंत्री म्हणून महिलांची टक्केवारी २००६ साली ३.४५ अशी होती; परंतु २००९ मध्ये त्यामध्ये वाढ होऊन एकूण टक्केवारी ९.०९ अशी झाली तर राज्यमंत्री म्हणून २००६ साली एकूण टक्केवारी १५.३८% होती. तर २००९ मध्ये ती कमी होऊन ११.१ झाली.

संपूर्ण २००६ ते २००९ चा विचार करता सरासरी टक्केवारी ही १०.२५% एवढीच आहे. याचाच अर्थ असा आहे की, राजकीय सत्तेमध्ये महिलांच्या सहभागाचे प्रमाण हे अतिशय अल्प प्रमाणात आहे.

**तक्ता १**

**केंद्रीय मंत्रिमंडळातील महिलांचे प्रतिनिधित्व सन २००९**

| अ. क्र. | मंत्रीमंडळातील पद | केंद्रिय मंत्रीमंडळ | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | महिला | | पुरुष | | एकूण | | % ते महिला एकूण | |
| | | २००६ | २००९ | २००६ | २००९ | २००६ | २००९ | २००६ | २००९ |
| १ | कॅबिनेट मंत्री | १ | ३ | २८ | ३० | २९ | ३३ | ३.४५ | ९.०९ |
| २ | राज्यमंत्री | ६ | ५ | ३३ | ४० | ३९ | ४५ | १५.३८ | ११.१ |
| | एकूण | ७ | ८ | ६१ | ७० | ६८ | ७८ | १०.२९ | १०.२५ |

**सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालय याठिकाणी महिला न्यायाधीशांची संख्या :**

२३.१२.२००५ च्या अहवालानुसार सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालय याठिकाणी महिलांची संख्या ही तक्ता नं. २ च्या साहाय्याने अभ्यासता येईल. यावरून असे दिसून येते की भारतात आतापर्यंत सर्वोच्च न्यायालयात महिला न्याशाधीश म्हणून एकच आली आहे त्या तुलनेने पुरुष न्यायाधीशांची संख्या जास्त आहे. उच्च न्यायालयाचा अभ्यास करताना असे दिसून येते की, महिलांची संख्या ही २००५ पर्यंत एकूण ३४ अशी आहे तर पुरुषांची संख्या जास्त आहे. याचाच अर्थ आपणास असे म्हणता येईल की, सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालय या ठिकाणी महिला न्यायाधीशांची संख्या मर्यादित स्वरूपाची आहे.

**तक्ता २**

## सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालय या मधील लिंगानुसार (सेक्स) न्यायाधिशांची संख्या २३.१२.२००५

| अ.क्र. | न्यायालयाचे नाव | न्यायाधिशांची संख्या | | |
|---|---|---|---|---|
| | | महिला | पुरुष | एकूण |
| | सर्वोच्च न्यायालय | १ | २१ | २२ |
| | उच्च न्यायालय | | | |
| १ | अलाहाबाद | ४ | ७७ | ८१ |
| २ | आंध्रप्रदेश | २ | २८ | ३० |
| ३ | मुंबई | ५ | ५० | ५५ |
| ४ | कोलकाता | १ | २८ | २९ |
| ५ | छत्तीसगढ | – | ०८ | ०८ |
| ६ | दिल्ली | ३ | २३ | २६ |
| ७ | गुवाहटी | १ | १५ | १६ |
| ८ | गुजरात | २ | ३२ | ३४ |
| ९ | हिमाचल प्रदेश | १ | ०७ | ०८ |
| १० | जम्मु आणि काश्मिर | – | १० | १० |
| ११ | झारखंड | – | ०६ | ०६ |
| १२ | कर्नाटक | १ | ३० | ३१ |
| १३ | केरळ | १ | २७ | २८ |
| १४ | मध्यप्रदेश | ३ | ३६ | ३९ |
| १५ | चेन्नई | ४ | ३४ | ३८ |
| १६ | ओडिसा | – | १४ | १४ |
| १७ | पटना | ३ | १९ | २२ |
| १८ | पंजाब आणि हरियाणा | २ | २७ | २९ |
| १९ | राजस्थान | १ | ३१ | ३२ |
| २० | सिक्कीम | – | ०३ | ०३ |
| २१ | उत्तराखंड | – | ०९ | ०९ |
| | एकूण | ३४ | ५३५ | ५४८ |

## भारतातील न्यायाधीशांची रिक्त जागा स्थिती :

जिल्हा किंवा suboridinate पातळीवरील न्यायाधीशांची संख्या ही तक्ता नं. ३ ठरविता येईल. त्यानुसार भारतामध्ये मान्यता मिळालेल्या न्यायाधीशांची संख्या ही १४,३०५ आहे. भरलेल्या जागांची संख्या ही ११,६५० तर रिक्त जागांची संख्या २६५५ अशी आहे. त्याचबरोबर सर्वोच्च

न्यायालयामध्ये मान्यता मिळालेल्या जागांची संख्या २६ आहे. भरलेल्या जागांची संख्या ही २२ तर रिक्त जागा ४ आहेत. त्याचप्रमाणे उच्च न्यायालय याठिकाणी ही रिक्त जागा ७१ आहेत. प्रत्येक राज्यातील व केंद्रशासित प्रदेशातील जागांचा विचार करता तक्ता नं ३ वरून असे दिसून आले की रिक्त जागा ह्या जास्त प्रमाणात आहेत म्हणजेच त्या ठिकाणी मान्यता मिळालेली असून देखील जागा रिक्त आहेत. फक्त अरुणाचल प्रदेश, नागालँड,चा राज्यांमध्ये एकही रिक्तजागा नाही. तसेच अंदमान, निकोबार व दादरा नगर हवेली या केंद्रशासित प्रदेशांमध्येही जागा रिक्त नाही.

**न्यायाधिशांची रिक्त जागा स्थिती**

**तक्ता ३**

**जिल्हा किंवा** subodinate **न्यायालय पातळीवरील न्यायाधिशांची संख्या** (strength) **०१-०१-२००६**

| अ.क्र. | भारत /राज्य/ प्रदेश | मान्यता मिळालेली संख्या | न्यायाधिशांची भरलेल्या जागांची संख्या | रिक्त जागांची संख्या |
|---|---|---|---|---|
| | भारत | १४३०५ | ११६५० | २६५५ |
| | सर्वोच्च न्यायालय | २६ | २२ | ४ |
| | उच्च न्यायालय | ६८६ | ६१५ | ७१ |
| १ | आंध्रप्रदेश | ८०७ | ७६८ | ३९ |
| २ | अरुणाचल प्रदेश | २९३ | २९३ | ० |
| ३ | आसाम | २७५ | २१२ | ६३ |
| ४ | बिहार | ८०७ | ६९१ | ४७२ |
| ५ | दिल्ली | ३९२ | २६६ | १२६ |
| ६ | गोवा | ४४ | २७ | १७ |
| ७ | गुजरात | ८२६ | ७८७ | ३९ |
| ८ | हरियाणा | ३०७ | २३० | ७७ |
| ९ | हिमाचल प्रदेश | ११६ | १११ | ५ |
| १० | जम्मू आणि काश्मिर | २०२ | १८० | २२ |
| ११ | कर्नाटक | ८११ | ६७३ | १३८ |
| १२ | केरळ | ४१८ | ३९५ | २३ |
| १३ | मध्य प्रदेश | ८०१ | ६९५ | १०६ |
| १४ | महाराष्ट्र | १४९२ | १२७६ | २१६ |
| १५ | मणिपूर | ३४ | २९ | ५ |
| १६ | मेघालय | ८ | ६ | २ |
| १७ | मिझोराम | ३४ | १८ | १६ |
| १८ | नागालँड | २५ | २५ | ० |
| १९ | ओडिसा | ४७७ | ४२५ | ५२ |
| २० | पंजाब | ३२८ | २५६ | ७२ |
| २१ | राजस्थान | ७९२ | ६८६ | १०६ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २२ | सिक्कीम | १३ | १० | ३ |
| २३ | तामिळनाडू | ७५७ | ७२७ | ३० |
| २४ | त्रिपुरा | ७५ | ६१ | १४ |
| २५ | उत्तर प्रदेश | २१७२ | १४२४ | ७४८ |
| २६ | उत्तराखंड | २०० | १०१ | ९९ |
| २७ | पश्चिम बंगाल केंद्रशासित प्रदेश | ७०६ | ५९६ | ११० |
| २८ | अंदमान आणि निकोबार | ८ | ८ | ० |
| २९ | चंदीगढ | २० | १८ | २ |
| ३० | दादरा आणि नगरहवेली | ३ | २ | ० |
| ३१ | दमण आणि दीव | ३ | २ | १ |
| ३२ | पाँडेचरी | २१ | १७ | ४ |

टीप (३०.११.२००६ नुसार परिस्थिती)

**भारतीय प्रशासकीय सेवा, पोलीस दल, परराष्ट्र सेवा यामधील राज्य आणि केंद्रशासित प्रदेश अंतर्गत महिला अधिकाऱ्यांची संख्या :**

२००६ च्या अहवालानुसार राज्यामध्ये IAS, IPS आणि IFS महिला अधिकाऱ्यांची संख्या ही पुरुष अधिकाऱ्यांच्या तुलनेत कमी प्रमाणात आहे तसेच केंद्रशासित प्रदेशाअंतर्गत महिलां अधिकाऱ्यांचे संख्या ही अत्यंत कमी स्वरूपात आहे. तसेच दिल्ली, गोवा, मेघालय, मिझोरम, त्रिपुरा या राज्यातही महिला अधिकाऱ्यांची संख्या एकच स्वरूपात आहे. तक्ता नं. ४ वरून आपल्याला वरील सर्व संख्याचा अंदाज घेता येईल व त्यावरून असे ही दिसून येते. GMUTs मध्येही महिला अधिकारी संख्या कमी आहे.

तक्ता नं. ४ वरून असे दिसून येते भारतीय प्रशासकीय सेवा, पोलिस दल परराष्ट्र सेवा यामध्ये महिला अधिकाऱ्यांची संख्या ही पुरुष अधिकाऱ्यांच्या तुलनेत कमी आहे.

| अक्र. | भारत / राज्य/केंद्रशासित | आयएएस | | | आयपीएस | | | आय एफ एस | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | प्रदेश | महिला | पुरुष | एकूण | महिला | पुरुष | एकूण | महिला | पुरुष | एकूण |
| | भारत | ५१७ | ४२१९ | ४७९० | १५० | ३०५९ | ३२०९ | ११४ | २५३४ | २६४८ |
| १ | आंध्रप्रदेश | ३८ | २७० | ३०८ | ११ | १८२ | १९३ | ८ | १३४ | १४१ |
| २ | अरुणाचल प्रदेश, गोवा | ३६ | १८० | २१६ | १२ | १२९ | १४२ | ८ | १२९ | १३७ |
| ३ | आसाम मेघालय | १५ | १८८ | २०३ | २ | १२७ | १२९ | ३ | १०५ | १०८ |
| ४ | बिहार | १८ | २२१ | २३९ | ५ | १५० | १५५ | ० | ४१ | ४१ |
| ५ | छत्तीसगढ | ११ | ७८ | ७९ | १ | ६३ | ६४ | ५ | ११५ | १२० |
| ६ | दिल्ली | (ए.जी.एम.यु.टी. २ वरती) | | | | | | | | |
| ७ | गोवा | (ए. जी. एम. यु. टी. २ वरती) | | | | | | | | |
| ८ | गुजराथ | २७ | १९४ | २२१ | ६ | १३२ | १३८ | १ | १०१ | १०२ |
| ९ | हरियाना | ३१ | १६९ | २०२ | ७ | १०८ | ११५ | ३ | ६३ | ६६ |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १० हिमाचल प्रदेश | २१ | ९६ | ११७ | २ | ६४ | ६६ | ४ | ९९ | १०३ |
| ११ जम्मू काश्मिर | ५ | १०२ | १०७ | २ | ११५ | ११७ | ३ | ८४ | ८७ |
| १२ झारखंड | १७ | १११ | १२८ | ८ | ७६ | ८४ | ३ | १२५ | १२८ |
| १३ कर्नाटक | ३७ | १९९ | २३६ | ६ | १३२ | १३८ | ११ | १५० | १६१ |
| १४ केरळ | २० | १४६ | १६६ | ३ | ११६ | ११९ | ३ | ११८ | १२१ |
| १५ मध्यप्रदेश | ४४ | २४७ | २९१ | १० | २०६ | २१६ | १० | २६२ | २७२ |
| १६ महाराष्ट्र | ४४ | २९६ | ३४० | ८ | १८० | १८८ | ७ | १६४ | १७१ |
| १७ मणिपूर, त्रिपूरा | ६ | १६३ | १६९ | १ | ९५ | ९६ | ३ | ८१ | ८४ |
| १८ मेघालय | | (ए. एम. ३ वरती ९ मध्ये) | | | | | | | |
| १९ मिझोराम | | (ए.जी.एम.यु.टी. २ वरती ९ मध्ये) | | | | | | | |
| २० नागालँड | ४ | ४८ | ५२ | ४ | ३९ | ४३ | ० | २८ | २८ |
| २१ ओडिसा | २१ | १५६ | १७७ | १० | ९४ | १०४ | ०४ | १०९ | ११३ |
| २२ पंजाब | २१ | १५० | १७१ | ०५ | ११३ | ११८ | ०४ | ४३ | ४७ |
| २३ राजस्थान | २८ | १९२ | २२० | ११ | १३० | १४१ | ०७ | १०१ | १०८ |
| २४ सिक्कीम | ०६ | ३९ | ४५ | ०२ | २९ | ३१ | ०१ | ४० | ४१ |
| २५ तामिळनाडू | ३९ | २६२ | ३०१ | १० | १८३ | १९३ | ०६ | १३३ | १३९ |
| २६ त्रिपूरा | | (एम. टी. १४ वरती ९ मध्ये) | | | | | | | |
| २७ उत्तर प्रदेश | ४९ | ४२४ | ४७३ | १२ | ३३२ | ३४४ | ०७ | १५० | १५७ |
| २८ उत्तराखंड | ०६ | ६९ | ७५ | ०७ | ४४ | ५१ | ०७ | ६२ | ६९ |
| २९ पश्चिम बंगाल | २५ | २१० | २४४ | ०४ | २२० | २२४ | ०७ | ९७ | १०४ |
| केंद्रशासित प्रदेश | | | | | | | | | |
| ३० अंदमान, निकोबार | | (ए.जी. एम. यु. टी. २ वरती ९ मध्ये) | | | | | | | |
| ३१ चंदीगढ | | (ए.जी. एम. यु. टी. २ वरती ९ मध्ये) | | | | | | | |
| ३२ दादरा, नगर हवेली | | (ए.जी. एम. यु. टी. २ वरती ९ मध्ये) | | | | | | | |
| ३३ दीव व दमण | | (ए.जी. एम. यु. टी. २ वरती ९ मध्ये) | | | | | | | |
| ३४ लक्षद्वीप | | (ए.जी. एम. यु. टी. २ वरती ९ मध्ये) | | | | | | | |
| ३५ पाँडेचरी / पद्युचेरी | | (ए.जी. एम. यु. टी. २ वरती ९ मध्ये) | | | | | | | |

टीप –ए.जी.एम.यु. टी. म्हणजे अरुणाचल प्रदेश, गोवा, मिझोराम आणि युनियन प्रदेश

ए. एम. म्हणजे – आसाम आणि मेघालय एम.टी. म्हणजे – मणिपूर आणि त्रिपुरा

संपूर्ण भारतातील आणि केंद्रीय सेवा दलातील महिलांचे प्रतिनिधित्व व निवडलेल्या इतर परिस्थिती हे पुढील तक्त्यात वर्णिले आहे.

## संपूर्ण भारतातील आणि केंद्रीय सेवा दलातील महिलांचे प्रतिनिधीत्व :

भारतातील केंद्रीय सेवा दलातील महिलांच्या प्रतिनिधीत्वाच्या विचार करता तक्ता नं. ५ वरून असे दिसून येते की, सर्व केंद्रीय सेवादलात महिलांचे प्रतिनिधीत्व हे सरासरी २०% पर्यंत आहेत. म्हणजेच पुरुष प्रतिनिधीत्च हे जास्त प्रमाणात आहे. २००५-२००९ च्या अहवालानुसार.

**तक्ता ५**

**वैयक्तिक (Personal) लिंगभेदानुसार सर्व भारतातील आणि केंद्रीय सेवा दलातील व इतर परिस्थितीचा तक्ता २००५ – २००९ नुसार**

| अ.क्र. | सेवादल | महिला | पुरुष | एकूण | महिलांची एकूण % |
|---|---|---|---|---|---|
| १ | सर्वोच्च न्यायालय न्यायाधिश २००९ | ०० | २७ | २७ | ०.०% |
| २ | उच्च न्यायालय न्यायाधिश २००९ | ५२ | ५७८ | ६३० | ८.२५% |
| ३ | भारतीय प्रशासकीय सेवा २००२ | ५३५ | ४६२४ | ५१५९ | १०.४२% |
| | २००६ | ५७१ | ४२१९ | ४७९० | ११.९२% |
| ४ | भारतीय ऑडिट आणि खाते अकौंट | | | | |
| | सेवा १९९७ | १२९ | ५१९ | ६४७ | १९.९४% |
| | २००५ | १४९ | ४३४ | ५८३ | २५.५५% |
| ५ | भारतीय कस्टम आणि केंद्रीय एक्ससाईज | | | | |
| | सेवा १९९५ | ११७ | १५२० | १६३७ | ७.०५% |
| | १९९६ | १३० | १५३१ | १६६१ | ७.८३% |
| ६ | भारतीय आर्थिक सेवा १९९६ | ६४ | ३३० | ३९४ | १६.२४% |
| | २००६ | ९४ | २८२ | ३७६ | २५.००% |
| ७ | भारतीय परराष्ट्र सेवा २००५ | ८५ | ५३६ | ६२१ | १३.६८% |
| | २००६ | ११४ | २५३४ | २६४८ | ४.३१% |
| ८ | भारतीय वनसेवा १९९५ | ७३ | २३९० | २४६३ | २.९६% |
| | १९९६ | ७८ | २३८७ | २४६५ | ३.१६% |
| ९ | भारतीय माहिती सेवा १९९५ | ७६ | ४१७ | ४९३ | ५.४२% |
| | २००४ | ७४ | २९६ | ३७० | २०.००% |
| १० | भारतीय पोलीस सेवा २००५ | १४२ | ३०५६ | ३१९८ | ४.४४% |
| | २००६ | १५० | ३०५९ | ३२०९ | ४.६९% |
| ११ | भारतीय डाकसेवा १९९५ | ७० | २५६ | ३२६ | २१.४७% |
| | २००५ | ९४ | ३३९ | ४३३ | २१.७०% |
| १२ | भारतीय रेव्हेन्यू सेवा १९९४ | २४६ | २०२२ | २२६८ | १०.८५% |
| | १९९५ | २७६ | १९८० | २२५६ | १२.२३% |
| १३ | भारतीय संख्याशास्त्र सेवा १९९७ | ३८ | ४९२ | ५३० | ७.१७% |
| | २००६ | ८६ | ४६९ | ५५५ | १५.४९% |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १४ | केंद्रीय गुप्तचर सेवादल १९९५ | -- | -- | ६७८ | -- |
| | १९९६ | ५१ | ६५७ | ७०८ | ७.२०% |
| १५ | केंद्रीय कॅबिनेट मंत्री १९९७ | ०० | २० | २० | ०० |
| | २००२ | ०२ | ३० | ३२ | ६.२५% |
| | २००४ | ०१ | २८ | २९ | ३.४४% |
| १६ | राज्य मंत्री १९९७ | ०५ | १९ | २४ | २०.८३% |
| | २००२ | ०६ | ३५ | ४१ | १४.६३% |
| | २००४ | ०६ | ३३ | ३९ | १५.३८% |
| १७ | चाटर्ड अकौंटट १९९६[३] | -- | -- | -- | ५.०८% |
| १८ | रजिस्टर वैद्यकीय प्रॅक्टीक्शनर्स (डॉक्टर) १९९५[४] | -- | -- | -- | २०.०८% |

टीप – Ministry of Home Affairs

Ministry of External Affairs

1. As on 01.11.98 (includes 1998 Batch)
2. As on 31.12.98 (includes 1999 Batch)
3. Institute of Xhartered Accountants of India
4. Medical Council of India

तक्ता नं. ६ वरून आपल्याला असे दिसून येईल की, लोकसभेत किती जागा आहेत आणि संविधानातील प्रकारानुसार सर्वसाधारण, अनुसूचित जाती व अनुसूचित जाती व जमाती यांना किती प्रमाणात जागा दिल्या गेलेल्या आहेत. यामध्ये राज्य व केंद्र शासित प्रदेश यानुसार जागा व संख्या दाखविलेली आहे.

लोकसभेतील विविध प्रकारच्या जागा ह्या खालील तक्त्यात दाखविलेल्या आहेत.

**तक्ता ६**

**लोकसभेतील जागा, संख्या आणि संविधानातील प्रकार**

| अ.क्र. | भारत / राज्य / प्रदेश (युटीएस) | संविधान प्रकार | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | जनरल | एस.सी. | एस.टी. | एकूण |
| | भारत | ४२३ | ८४ | ३८ | ५४५ |
| १ | आंध्रप्रदेश | ३४ | ०७ | ०३ | ४२ |
| २ | अरुणाचल प्रदेश | ०२ | -- | -- | ०२ |
| ३ | आसाम | ११ | ०१ | ०२ | १४ |
| ४ | बिहार | ३४ | ०६ | -- | ४० |
| ५ | छत्तीसगढ | ०६ | ०१ | ०४ | ११ |
| ६ | गोवा | ०२ | -- | -- | ०२ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७ | गुजराथ | २० | ०२ | ०४ | २६ |
| ८ | हरियाणा | ०८ | ०२ | -- | १० |
| ९ | हिमाचल प्रदेश | ०३ | ०१ | -- | ०४ |
| १० | जम्मू आणि कााश्मिर | ०६ | -- | -- | ०६ |
| ११ | झारखंड | ०८ | ०१ | ०५ | १४ |
| १२ | कर्नाटक | २१ | ०५ | ०२ | २८ |
| १३ | केरळ | १८ | ०२ | -- | २० |
| १४ | मध्यप्रदेश | १९ | ०४ | ०६ | २९ |
| १५ | महाराष्ट्र | ३९ | ०५ | ०४ | ४८ |
| १६ | मणिपूर | -- | -- | ०२ | ०२ |
| १७ | मेघालय | -- | -- | ०२ | ०२ |
| १८ | मिझोराम | -- | -- | ०१ | ०१ |
| १९ | नागालँड | ०१ | -- | -- | ०१ |
| २० | ओरिसा | १३ | ०३ | ०५ | २१ |
| २१ | पंजाब | १० | ०४ | -- | १४ |
| २२ | राजस्थान | १८ | ०४ | ०३ | २५ |
| २३ | सिक्कीम | ०१ | -- | -- | ०१ |
| २४ | तामिळनाडू | ३२ | ०७ | -- | ३९ |
| २५ | त्रिपूरा | ०१ | -- | -- | ०१ |
| २६ | उत्तरप्रदेश | ६३ | १७ | -- | ८० |
| २७ | उत्तराखंड | ०४ | ०१ | -- | ०५ |
| २८ | पश्चिम बंगाल | ३१ | ०९ | ०२ | ४२ |
| | केंद्रशासित प्रदेश | | | | |
| २९ | अंदमान व निकोबार | ०१ | -- | -- | ०१ |
| ३० | चंदीगढ | ०१ | -- | -- | ०१ |
| ३१ | दादरा नगर हवेली | -- | -- | ०१ | ०१ |
| ३२ | दीव दमण | ०१ | -- | -- | ०१ |
| ३३ | दिल्ली | ०५ | ०२ | -- | ०७ |
| ३४ | लक्षद्वीप | -- | -- | ०१ | ०१ |
| ३५ | पाँडेचेरी | ०१ | -- | -- | ०१ |

टीप – एस. सी. – शेड्युल्ड कास्ट

एस. टी. – शेड्युल्ड ट्राइब्ज

## निर्णय प्रक्रियेतील महिलांचे योगदान :

१९९९-२००९ च्या अहवालानुसार लोकसभा आणि पंचायत राज संस्था या दोन पातळीवरील महिलांचे योगदान स्पष्ट केले आहे. तक्ता नं. ७ वरून आपल्याला याचा आढावा घेता येईल. १९९९ मध्ये लोकसभेत महिलांचे योगदान हे ९.०% होते तर पंचायत राज मध्ये ३१.३% होते. २००४ मध्ये लोकसभेत ८.१६% तर पंचायत राजमध्ये ते काहीच नव्हते. तर २००९ यामध्ये वाढ होऊन लोकसभेत १०.८२% झाले तर पंचायत राज मध्ये १९९९ च्या तुलनेत वाढ झाली व त्यठिकाणी ही ३६.८४% झाले. तसेच तक्ता नं. ७ वरून असेही दिसून येते की २००९ साली लोकसभेत काही राज्यात व प्रदेशात महिलांचे योगदान हे ०% आहे. तर पंचायत राज मध्ये ते अल्प स्वरूपात आहे. तक्ता नं. ७ वरून सर्वसाधारणपणे आपणास असे म्हणता येईल की महिलांचे पंचायत राजमध्ये योगदान हे सरासरी ४०% पर्यंत आहे.

निर्णय प्रक्रियेतील महिलांचे योगदान / प्रतिनिधित्व हे दोन पातळीवर खालील तक्त्यात दाखवले आहे.

**तक्ता ७ महिलांचा राजकीय सहभाग आणि निर्णय प्रक्रिया १९९९ – २००९**

| अ.क्र. | भारत/प्रदेश/ राज्य | राजकीय निर्णय प्रक्रिया लोकसभा (२००९) | | पंचायत राज संस्था | |
|---|---|---|---|---|---|
| | | महिला | पुरुष | महिला | % एकूण |
| | भारत/राज्ये/प्रदेश (१९९९) | ४९(९.०%) ४४ | ४९४ ४९५ | ८१३६७६ | ३१.३ |
| | भारत/राज्ये/प्रदेश (२००४) मे | (८.१६%) ५९ | (९१.८४%) ४८६ | | |
| | भारत/राज्ये/ प्रदेश (२००९) | ५९ (१०.८२%) | ४८६ (८९.१८%) | १०३८०४५ | ३६.८४ |
| १ | आंध्रप्रदेश | ०५ | ३७ | ७४०१९ | ३३.०४ |
| २ | अरुणाचल प्रदेश | -- | ०२ | ३१८३ | ३८.५४ |
| ३ | आसाम | ०२ | १२ | ९९०३ | ३८.९३ |
| ४ | बिहार | ०४ | ३६ | ७०४०० | ५४.१२ |
| ५ | छत्तीसगढ | ०३ | ०८ | ५४१५९ | ३१.७३ |
| ६ | दिल्ली | ०१ | ०६ | -- | -- |
| ७ | गोवा | -- | ०२ | ५३४ | ३४.२५ |
| ८ | गुजराथ | ०४ | २२ | ३८०६८ | ३३.२५ |
| ९ | हरियाना | ०२ | ०८ | २५५०३ | ३६.५४ |
| १० | हिमाचल प्रदेश | -- | ०४ | ९५५२ | ३८.८६ |
| ११ | जम्मू काश्मिर | -- | ०६ | -- | -- |
| १२ | झारखंड | -- | १४ | ०० | ०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १३ | कर्नाटक | ०१ | २७ | ४१२१० | ४२.८९ |
| १४ | केरळ | -- | २० | ५६१४ | ३०.३८ |
| १५ | मध्यप्रदेश | ०६ | २३ | १३६१९६ | ३४.३५ |
| १६ | महाराष्ट्र | ०३ | ४५ | ७६५८१ | ३३.३५ |
| १७ | मणिपूर | -- | ०२ | ७५८ | ४३.६६ |
| १८ | मेघालय | ०१ | ०२ | -- | -- |
| १९ | मिझोराम | -- | ०१ | -- | -- |
| २० | नागालँड | -- | ०१ | -- | -- |
| २१ | ओडिसा | -- | २१ | ३३६३० | ३६.३७ |
| २२ | पंजाब | ०४ | १० | ३१८०९ | ३४.९७ |
| २३ | राजस्थान | ०३ | २२ | ४२४३४ | ३६.३७ |
| २४ | सिक्कीम | -- | ०१ | ३९४ | ३९.९६ |
| २५ | तामिळनाडू | -- | ३९ | ३९३६४ | ३३.७९ |
| २६ | त्रिपूरा | -- | ०२ | १९८६ | ३४.६४ |
| २७ | उत्तर प्रदेश | १३ | ६७ | २९९०२५ | ३८.७५ |
| २८ | उत्तराखंड | -- | ०५ | २१५१७ | ३७.४२ |
| २९ | पश्चिम बंगाल | ०७ | ३५ | २१३५१ | ३६.२९ |
| | केंद्रशासित प्रदेश | | | | |
| ३० | अंदमान, निकोबार | -- | ०१ | २९६ | ३४.५८ |
| ३१ | चंदीगढ | -- | ०१ | ६२ | ३३.१६ |
| ३२ | दादरा, नगर हवेली | -- | ०१ | ४९ | ३९.०२ |
| ३३ | दीव व दमण | -- | ०१ | ३७ | ३८.१४ |
| ३४ | लक्षद्वीप | -- | ०१ | ४१ | ३७.२७ |
| ३५ | पाँडेचरी | -- | ०१ | ३७० | ३६.२४ |

टीप - १) लोकसभेतील मेंबर १५ वी लोकसभा, लोकसभा गुप्तचर, नवी दिल्ली, २००९

२) निवडणूक आयोग, भारत सरकार, नवी दिल्ली

## पंचायत राज संस्था

तक्ता नं. ८ मध्ये पंचायत राज संस्था अंतर्गत निवडून आलेल्या महिला प्रतिनिधीत्वाचे राज्यानुसार तीन पातळ्यांवर वर्गीकरण केले आहे. यामध्ये ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद असे वर्गीकरण केले आहे आणि त्यानुसार असे दिसून येते की, काही राज्यात महिला प्रतिनिधीत्व ०% आहे तक्ता नं. ८ वरून असे म्हणता येईल . सर्व प्रवर्गाचा विचार करता महिला प्रतिनिधीत्व हे ग्राम पंचायतमध्ये जास्त आहे तर पंचायत समितीमध्ये काही प्रमाणात आहेत. तसेच जिल्हा परिषद अंतर्गत ते ग्राम पंचायत व पंचायत समितीच्या तुलनेत अल्प स्वरूपाचे आहे. वरील सर्व प्रतिनिधीत्व हे संख्याच्या स्वरूपात दर्शविलेले आहे.

पंचायत राज संस्था अंतर्गत निवडून आलेल्या महिला प्रतिनिधित्वांचे राज्यानुसार तीन पातळीवर वर्गीकरण करून खालील तक्त्यात दाखवले आहे.

**तक्ता ८ निवडून आलेल्या पंचायतमध्ये महिला प्रतिनिधित्व यांच्या तीन पातळ्या राज्यानुसार २००७**

| क्र. | भारत / राज्य/ प्रदेश | ग्राम पंचायत | | पंचायत समिती | | जिल्हा परिषद | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | महिला | एकूण | महिला | एकूण | महिला | एकूण |
| | भारत | ९७४२५५ | २६४५८८० | ५८०१२ | १५६५५७ | ५७७८ | १५५८१ |
| १ | आंध्रप्रदेश | ६८७३६ | २०८२९१ | ४९१९ | १४६१७ | ३६४ | १०९५ |
| २ | अरुणाचल प्रदेश | २५६१ | ६४८५ | ५७७ | १६३९ | ४५ | १३६ |
| ३ | आसाम | ८९७७ | २२८९८ | ७९१ | २१४८ | १३५ | ३९० |
| ४ | बिहार | ६४१५२ | ११७३९७ | ५६७१ | ११५३७ | ५७७ | ११५७ |
| ५ | छत्तीसगढ | ५३०४५ | १५७२५० | १००५ | २९७७ | १०९ | ३२१ |
| ६ | दिल्ली | -- | --- | --- | --- | --- | -- |
| ७ | गोवा | ५१४ | १५०९ | --- | --- | २० | ५० |
| ८ | गुजराथ | ३६४०० | १०९२०९ | १३९४ | ४१६१ | २७४ | ८१७ |
| ९ | हरियाना | २४४०६ | ६६५८८ | ९६२ | २८३३ | १३५ | ३८४ |
| १० | हिमाचल प्रदेश | ८८६४ | २२६५४ | ५९६ | १६७६ | ९२ | २५१ |
| ११ | जम्मू काश्मिर | -- | --- | --- | ---- | --- | --- |
| १२ | झारखंड | -- | --- | ०० | ०० | ---- | --- |
| १३ | कर्नाटक | ३९३१८ | ९१४०२ | १५१९ | ३६८३ | ३७३ | १००५ |
| १४ | केरळ | ४९०४ | १६१३९ | ६०९ | २००४ | १०१ | ३३९ |
| १५ | मध्यप्रदेश | १३३५०८ | ३८८८२९ | २३७८ | ६८५१ | ३१० | ८३६ |
| १६ | महाराष्ट्र | ७४६२० | २२३८५७ | १३०७ | ३९२२ | ६५४ | १९६१ |
| १७ | मणिपूर | ७३० | १६७५ | ०० | ००० | २८ | ६१ |
| १८ | मेघालय | -- | -- | -- | --- | -- | -- |
| १९ | मिझोराम | -- | -- | -- | --- | -- | -- |
| २० | नागालँड | -- | -- | -- | --- | -- | -- |
| २१ | ओडिसा | ३११२१ | ८५३६७ | २२०८ | ६२३३ | ३०१ | ८५४ |
| २२ | पंजाब | ३०८७५ | ८८१३२ | ८६६ | २६२२ | ६८ | २०९ |
| २३ | राजस्थान | ४००४३ | ११३७१० | २०१४ | ५२५७ | ३७७ | १००८ |
| २४ | सिक्कीम | ३५६ | ८९१ | ००० | ०० | ३८ | ९५ |
| २५ | तामिळनाडू | ३६८२४ | १०९३०८ | २३१३ | ६५२४ | २२७ | ६५६ |
| २६ | त्रिपूरा | १८५२ | ५३५२ | १०६ | २९९ | २८ | ८२ |
| २७ | उत्तर प्रदेश | २०३१९ | ५३९८८ | १०७९ | ३१५२ | ११९ | ३६० |
| २८ | उत्तराखंड | २७३२२९ | ७०३२९४ | २४६७४ | ६५६६९ | ११२२ | २६९८ |
| २९ | पश्चिम बंगाल | १८१५० | ४९५४५ | २९५३ | ८५६३ | २४८ | ७२० |
| | केंद्रशासित प्रदेश | | | | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३० | अंदमान, निकोबार | २६१ | ७५९ | २५ | ६७ | १० | २० |
| ३१ | चंदीगढ | ५३ | १६२ | ०६ | १५ | ०३ | १० |
| ३२ | दादरा, नगर हवेली | ४५ | ११४ | --- | ००० | ०४ | ११ |
| ३३ | दीव व दमण | ३० | ७७ | --- | ००० | ०७ | २० |
| ३४ | लक्षद्वीप | ३२ | ८५ | ---- | ०००० | ०९ | २५ |
| ३५ | पाँडेचरी | ३३० | ९१३ | ४० | १०८ | १० | --- |

टीप १) ताज्या उपलब्ध माहितीनुसार

२) महिला एस. सी., एस. टी. आणि सर्वसाधारण कॅटॅगिरी मिळून

## पंचायत राज संस्थामधील महिलांचे प्रतिनिधीत्व टक्केवारी आकड्यानुसार :

पंचायत राज संस्था मध्ये महिलांचे प्रतिनिधीत्वाची टक्केवारी काढताना ग्राम पंचायत, पंचायत समिती व जिल्हा पातळी असे वर्गीकरण करून काढले आहे व ते तक्ता नं. ९ मध्ये दर्शविलेले आहे.

तक्ता नं. ९च्या विचार करता असे दिसून येते की, पंचायत संख्या, एकुण व्यक्ती व महिलांची संख्या याचा विचार करता, ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद या ठिकाणी महिला प्रतिनिधीत्वाचे योगदान हे सरासरी ३५ ते ४०% दरम्यान आहे. तर काही राज्यात हे प्रमाण काहीच नाही तसेच केंद्रशासित प्रदेशामध्ये महिलांचे प्रमाण हे सरासरी ३३% ते ३५% दरम्यान आहे. आणि संपूर्ण भारतातील ग्राम पंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद याठिकाणी महिला प्रतिनिधीत्वाची टक्केवारी ही ग्रामपंचायत मध्ये - ३६.८२% पंचायत समिती - ३७.१% तर जिल्हा परिषदेमध्ये ३७.०८% एवढी आहे. वरील सर्व टक्केवारी ही २००७-२००८ च्या अहवालानुसार दर्शविलेली आहे.

पंचायत राज संस्थांमध्ये महिलांचे प्रतिनिधित्व हे तीन पातळ्यांमध्ये टक्केवारीच्या सहाय्याने खालील तक्त्यात दाखवले आहे.

तक्ता ९ - पंचायत राज संस्थांमध्ये महिलांच्या प्रतिनिधित्वाची टक्केवारी २००७ - २००८

| अ.क्र. | भारत /राज्य/ प्रदेश | ग्रामपंचायत | | | | पंचायत समिती | | | | जिल्हा परिषद | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पंचायत संख्या | एकूण व्यक्ती | महिला | | पंचायत संख्या | एकूण व्यक्ती | महिला | | पंचायत संख्या | एकूण व्यक्ती | महिला | |
| | | | | संख्या | % | | | संख्या | % | | | संख्या | % |
| | भारत | २३२८५५ | २६४५८८० | ९७४२५५ | ३६.८२ | ६०९४ | १५६५५७ | ५८०१२ | ३७.०१ | ६३३ | १५५८१ | ५७७८ | ३७.०८ |
| १ | आंध्रप्रदेश | २१८२५ | २०८२९१ | ६८७३६ | ३३.०० | १०९८ | १४६१७ | ४९१९ | ३३.०७ | २२ | १०९५ | ३६४ | ३३.२४ |
| २ | अरुणाचल प्रदेश | १६३९ | ६४८५ | २५६१ | ३९.०५ | १३६ | १६३९ | ५७७ | ३५.०२ | १४ | १३६ | ४५ | ३३.०९ |
| ३ | आसाम | २२२३ | २२८९८ | ८९७७ | ३९.०२ | १८८ | २१४८ | ७९१ | ३६.०८ | २० | ३९० | १३५ | ३४.६२ |
| ४ | बिहार | ८४७१ | ११७३९७ | ६४१५२ | ५४.०६ | ५३१ | ११५३७ | ५६७१ | ४९.०२ | ३८ | ११५७ | ५७७ | ४९.८७ |
| ५ | छत्तीसगढ | ९८२० | १५७२५० | ५३०४५ | ३३.०७ | १४६ | २९७७ | १००५ | ३३.०८ | १६ | ३२१ | १०९ | ३३.९६ |
| ६ | दिल्ली | -- | -- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | -- | --- |
| ७ | गोवा | १८० | १५०९ | ५१४ | ३४.०१ | -- | --- | --- | -- | ०२ | ५० | २० | ४०.०० |
| ८ | गुजराथ | १३८१९ | १०९२०९ | ३६४०० | ३३.०३ | २२४ | ४१६१ | १३९४ | ३३.०५ | २५ | ८१७ | २७४ | ३३.५४ |
| ९ | हरियाना | ६१८७ | ६६५८८ | २४४०६ | ३६.०७ | ११९ | २८३३ | ९६२ | ३४.०० | १९ | ३८४ | १३५ | ३५.१६ |
| १० | हिमाचल प्रदेश | ३२४३ | २२६५४ | ८८६४ | ३९.०१ | ७५ | १६७६ | ५९६ | ३५.०६ | १२ | २५१ | ९२ | ३६.६५ |
| ११ | जम्मू काश्मिर | -- | --- | --- | --- | -- | --- | --- | --- | --- | -- | --- | --- |
| १२ | झारखंड | ३७४६ | --- | -- | -- | २११ | ०० | ०० | -- | २२ | -- | --- | -- |
| १३ | कर्नाटक | ५६२८ | ९१४०२ | ३९३१८ | ४३.०० | १७६ | ३६८३ | १५१९ | ४१.०२ | २९ | १००५ | ३७३ | ३७.११ |
| १४ | केरळ | ९९९ | १६१३९ | ४९०४ | ३०.०४ | १५२ | २००४ | ६०९ | ३०.०४ | १४ | ३३९ | १०१ | २९.७९ |
| १५ | मध्यप्रदेश | २३०५१ | ३८८८२९ | १३३५०८ | ३४.०३ | ३१३ | ६८५१ | २३७८ | ३४.०७ | ४८ | ८३६ | ३१० | ३७..८ |
| १६ | महाराष्ट्र | २७८९३ | २२३८५७ | ७४६२० | ३३.०३ | ३५१ | ३९२२ | १३०७ | ३३.०३ | ३३ | १९६१ | ६५४ | ३३.३५ |
| १७ | मणिपूर | १६५ | १६७५ | ७३० | ४३.०६ | ०० | ०० | ०० | -- | ०४ | ६१ | २८ | ४५.०९ |

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १८ | मेघालय | -- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | -- | --- | -- |
| १९ | मिझोराम | -- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | -- | --- | --- |
| २० | नागालँड | -- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | -- | --- | --- |
| २१ | ओडिसा | ६२३४ | ८५३६७ | ३११२१ | ३६.०५ | ३१४ | ६२३३ | २२०८ | ३५.०४ | ३० | ८५४ | ३०१ | ३५.२५ |
| २२ | पंजाब | १२४४३ | ८८१३२ | ३०८७५ | ३५.०० | १४१ | २६२२ | ८६६ | ३३.०० | २० | २०९ | ६८ | ३२.५४ |
| २३ | राजस्थान | ९१८८ | ११३७१० | ४००४३ | ३५.०२ | २३७ | ५२५७ | २०१४ | ३८.०३ | ३२ | १००८ | ३७७ | ३७.०४ |
| २४ | सिक्कीम | १६३ | ८९१ | ३५६ | ४०.०० | -- | ०० | ०० | -- | ९५ | ९५ | ३८ | ४०.०० |
| २५ | तामिळनाडू | १२६१८ | १०९३०८ | ३६८२४ | ३३.०७ | ३८५ | ६५२४ | २३१३ | ३५.०५ | २८ | ६५६ | २२७ | ३४.०६ |
| २६ | त्रिपूरा | ५१३ | ५३५२ | १८५२ | ३४.०६ | २३ | २९९ | १०६ | ३५.०५ | ०४ | ८२ | २८ | ३४.१५ |
| २७ | उत्तर प्रदेश | ५२००० | ७०३२९४ | २७३२२९ | ३८.०८ | ८२० | ६५६६९ | २४६७४ | ३७.०६ | ७० | २६९८ | ११२२ | ४१.५९ |
| २८ | उत्तराखंड | ७२२७ | ५३९८८ | २०३१९ | ३७.०६ | ९५ | ३१५२ | १०७९ | ३४.०२ | १३ | ३६० | ११९ | ३३.०६ |
| २९ | पश्चिम बंगाल | ३३५४ | ४९५४५ | १८१५० | ३६.०६ | ३४१ | ८५६३ | २९५३ | ३४.०५ | १८ | ७२० | २४८ | ३४.४४ |
| | केंद्रशासित प्रदेश | | | | | | | | | | | | |
| ३० | अंदमान, निकोबार | ६७ | ७५९ | २६१ | ३४.०४ | ०७ | ६७ | २५ | ३७.०३ | ०१ | ३० | १० | ३३.३३ |
| ३१ | चंदीगढ | १७ | १६२ | ५३ | ३२.०७ | ०१ | १५ | ०६ | ४०.०० | ०१ | १० | ०३ | ३०.०० |
| ३२ | दादरा, नगर हवेली | ११ | ११४ | ४५ | ३९.०५ | ०० | ०० | -- | -- | ०१ | ११ | ०४ | ३६.३६ |
| ३३ | दीव व दमण | १४ | ७७ | ३० | ३९.०० | ०० | ०० | -- | -- | ०१ | २० | ०७ | ३५.०० |
| ३४ | लक्षद्वीप | १० | ८५ | ३२ | ३७.०६ | ०० | ०० | -- | -- | ०१ | २५ | ०९ | ३६.०० |
| ३५ | पाँडेचरी / पद्युचेरी | ९८ | ९१३ | ३३० | ३६.०१ | १० | १०८ | ४० | ३७.०० | -- | -- | -- | --- |

टीप : एस. सी., एस. टी. आणि जनरल कॅटॅगिरी मिळून

तक्ता नं. १० : १९५२-२००९ पर्यंत संसदेतील महिलांच्या सहभागाचा अभ्यास करताना असे दिसून येते कीख लोकसभेमध्ये महिलांचा सहभाग हा सरासरी १० ते ११% पर्यंत आहे तर राज्यसभेतील महिलांचा सहभाग हा ११ ते १२% पर्यंत आहे. तक्ता नं. १० मध्ये दाखविल्यानुसार १९५२-१९९९ पर्यंत महिलांचा सहभाग हा अल्प प्रमाणात होता तर २००४ ते २००९ या काळात वाढ झालेली आहे असे दिसून येते.

## तक्ता १० – संसदेमधील महिलांचा सहभाग १९५२ – २००९

| अक्र. | वर्ष | लोकसभा (कनिष्ठ सभागृह) | | | | राज्यसभा (वरिष्ठ सभागृह) | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एकूण जागा | महिला संख्या | पुरुष संख्या | महिला टक्केवारी | एकूण जागा | महिला संख्या | पुरुष संख्या | महिला टक्केवारी |
| १ | १९५२ | ४९९ | २२ | | ४.०४ | २१९ | १६ | | ७.०३ |
| २ | १९५७ | ५०० | २७ | | ५.०४ | २३७ | १८ | | ७.०५ |
| ३ | १९६२ | ५०३ | ३४ | | ६.०८ | २३८ | १८ | | ७.०६ |
| ४ | १९६७ | ५२३ | ३१ | | ५.०९ | २४० | २० | | ८.०३ |
| ५ | १९७१ | ५२१ | २२ | | ४.०२ | २४३ | १७ | | ७.०० |
| ६ | १९७७ | ५४४ | १९ | | ३.०४ | २४४ | २५ | | १०.०२ |
| ७ | १९८० | ५४४ | २८ | | ७.०९ | २४४ | २४ | | ९.०८ |
| ८ | १९८४ | ५४४ | ४४ | | ८.०१ | २४४ | २८ | | ११.०४ |
| ९ | १९८९ | ५१७ | २७ | | ५.०३ | २४५ | २४ | | ९.०७ |
| १० | १९९१ | ५४४ | ३९ | | ७.०२ | २४५ | ३८ | | १५.०५ |
| ११ | १९९६ | ५४३ | ३९ | | ७.०२ | २२३ | २० | | ९.०० |
| १२ | १९९८ | ५४३ | ४३ | | ७.०९ | २४५ | १५ | | ६.०१ |
| १३ | १९९९ | ५४३ | ४९ | | ९.०० | २४५ | १९ | | ७.०८ |
| १४ | २००४ | ५४५ | ४५ | ५०० | ८.०२ | २४५ | २८ | २१७ | ११.०४ |
| १५ | २००९ | ५४५ | ५९ | ४८६ | १०.०८ | २४५ | २१ | २२४ | ८.५७ |

टीप – सी. एस. टी. एस. डाटा युनिट

तक्ता ११ : महिला एमपीचे पक्षानुसार १३ वी, १४वी, १५ वी लोकसभामधील संख्या खालील प्रमाणे तक्त्यात दाखवली आहे. २००९. १३ वी – १४ वी आणि १५ वी लोकसभा यामध्ये महिला एमपीएसचे चे पक्षानुसार संख्या तक्ता नं. ११ मध्ये दर्शविण्यात आलेली आहे. त्यानुसार १९९९ मध्ये संसदेतील ५४३ पैकी ४९ जागा या महिलाकेंद्री होत्या तर २००९ मध्ये ५४५ पैकी जागा ह्या महिलांकडे होत्या. म्हणजेच १९९९ च्या तुलनेत २००९ मध्ये संख्यांची वाढ झालेली आहे.

## तक्ता ११

| अ.प्र. | राजकीय पक्ष | महिला एमपी संख्या १३ वी लोकसभा | महिला एमपी संख्या १४ वी लोकसभा | महिला एमपी संख्या १५ वी लोकसभा |
|---|---|---|---|---|
| १ | भारतीय जनता पार्टी (बीजेपी) | १५ | १० | १३ |
| २ | राष्ट्रीय काँग्रेस (आयएनसी) | १३ | १३ | २३ |
| ३ | तेलगु देसम (टीडी) | ०३ | -- | -- |

| अ.प्र. | राजकीय पक्ष | महिला एमपी संख्या १३ वी लोकसभा | महिला एमपी संख्या १४ वी लोकसभा | महिला एमपी संख्या १५ वी लोकसभा |
|---|---|---|---|---|
| ४ | समाजवादी पाटी (एसपी) | ०३ | ०३ | ०४ |
| ५ | कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (सीपीआय) | ०३ | ०५ | ०१ |
| ६ | ऑल इंडिया अण्णा मुनेत्र कळघम | ०२ | -- | -- |
| ७ | ऑल इंडिया तृणमूल काँग्रेस | ०२ | ०१ | ०४ |
| ८ | शिवसेना (एसएस) | ०१ | ०२ | -- |
| ९ | बहुजन समाज पार्टी(बसप) | ०१ | -- | -- |
| १० | कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया | ०१ | ०२ | ०२ |
| ११ | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (एनसीपी) | ०१ | ०२ | ०२ |
| १२ | राष्ट्रीय जनता दल (आरजीडी) | ०१ | ०१ | ०१ |
| १३ | जनता दल | ०१ | -- | -- |
| १४ | इंडियन राष्ट्रीय लोकदल | ०१ | -- | ०१ |
| १५ | द्रविड मुन्नेत्र कळघम (डीएमके) | -- | ०३ | ०२ |
| १६ | शिरोमणी अकालीदल (एसएडी) | -- | ०१ | -- |
| १७ | जम्मु आणि काश्मिर जन लोकशाही पक्ष (जेकेपीडीपी) | -- | ०१ | -- |
| १८ | बीजू जनता दल (बीजेडी) | -- | ०१ | -- |
| १९ | लोक जन शक्ती पक्ष (एलजेएसपी) | -- | ०१ | -- |
| २० | राष्ट्रीय लोक दल (रालोद) | -- | ०१ | ०१ |
| २१ | स्वातंत्र्य (इंडिपेन्डन्ट) | ०१ | -- | -- |
| २२ | शिवसेना (एसएस) | -- | -- | ०१ |
| | एकूण | ४९ | ४५ | ५९ |

टीप – १९९९ मध्ये एकूण संसदेतील ५४३ पैकी ४९ जागा महिला आणि २००६ मध्ये संसदेतील ५४५ ५९ जागा महिलांकडे आहेत.

## BANK ACCOUNTS HELD BY WOMEN

### तक्ता १२

| अ.क्र. | राज्य / प्रदेश | पुरुष | महिला | एकूण |
|---|---|---|---|---|
| | भारत | ५८६२३८७ | ७७८६३९ | ६६४१०२६ |
| १ | आंध्रप्रदेश | ४२६६५९ | ६००६२ | ४८६७२१ |
| २ | अरुणाचल प्रदेश | २७३५ | ४७४ | ३२०९ |
| ३ | आसाम | ६१४५९ | ७२८४ | ६८७४३ |
| ४ | बिहार | ८५३०३ | ९७१३ | ९५०१६ |
| ५ | छत्तीसगढ | ५२७०२ | ६५५७ | ५९२५९ |
| ६ | दिल्ली | २५८४५७ | ७७७०५ | ३३६१६२ |

| अ.क्र. | राज्य / प्रदेश | पुरुष | महिला | एकूण |
|---|---|---|---|---|
| ७ | गोवा | २२३४६ | ३५१० | २५८५६ |
| ८ | गुजराथ | २२६४३४ | २२०६७ | २४८५०१ |
| ९ | हरियाना | १७५२६८ | १८९६४ | १९४२३२ |
| १० | हिमाचल प्रदेश | ३४४३२ | ४४०१ | ३८८३३ |
| ११ | जम्मू काश्मिर | ४६३१५ | २९६५ | ४९२८० |
| १२ | झारखंड | ५६३१४ | ५९८७ | ६२३०१ |
| १३ | कर्नाटक | ५०४४२० | ७६८६८ | ५८१२८८ |
| १४ | केरळ | ३०१५५८ | ५५१२९ | ३५६६८७ |
| १५ | मध्यप्रदेश | २५०५८७ | २३१२० | २७३७०७ |
| १६ | महाराष्ट्र | १४५७६३१ | १७४८५४ | १६३२४८५ |
| १७ | मणिपूर | ६७४० | २२४७ | ८९८७ |
| १८ | मेघालय | ७१६९ | ३३६३ | १०५३२ |
| १९ | मिझोराम | ५१९१ | १९७८ | ७१६९ |
| २० | नागालँड | २६५९ | ५४५ | ३२०४ |
| २१ | ओडिसा | १३१३७६ | १०९५५ | १४२३३१ |
| २२ | पंजाब | २४८१८२ | २४५९० | २७२७७२ |
| २३ | राजस्थान | २२३०९४ | २२८७५ | २४५९६९ |
| २४ | सिक्कीम | ६७०७ | ८७९ | ७५८६ |
| २५ | तामिळनाडू | ५४८४६५ | ८४६३४ | ६३३०९९ |
| २६ | त्रिपूरा | ७४११ | ६५७ | ८०६८ |
| २७ | उत्तर प्रदेश | ३८५२०९ | ३८२३१ | ४२३४४० |
| २८ | उत्तराखंड | ४५३३३ | ५३०४ | ५०६३७ |
| २९ | पश्चिम बंगाल | २२६३६७ | २३८५१ | २५२२१८ |
| | केंद्रशासित प्रदेश | | | |
| ३० | अंदमान, निकोबार बेट | १५८१ | ४३८ | २०१९ |
| ३१ | चंदीगढ | ४४७१३ | ४६५७ | ४९३७० |
| ३२ | दादरा, नगर हवेली | ४३९ | ६२ | ५०१ |
| ३३ | दीव व दमण | ४८० | ६३ | ५४३ |
| ३४ | लक्षद्वीप | ७२ | ०३ | ७५ |
| ३५ | पाँडेचरी | ८५७९ | १६४७ | १०२२६ |

तक्ता नं. १२ व तक्ता नं. १३ चा अभ्यास करताना असे दिसून येते की, बँक खाते व जमीन धारणा क्षेत्रातही महिलांची संख्या ही पुरुषांच्या तुलनेत कमी आहे.

## WOMEN WITH LAND HOLDINGS

**तक्ता १३**

| अ.क्र. | राज्य / प्रदेश | जमीन धारणा केलेल्या व्यक्ती (हजारांमध्ये) | |
|---|---|---|---|
| | | पुरुष | महिला |
| | भारत | १३७६३० | १५१३७ |
| १ | आंध्रप्रदेश | ९१८० | ३२४७ |
| २ | अरुणाचल प्रदेश | ९५ | ११ |
| ३ | आसाम मेघालय | २६५६ | ५३ |
| ४ | बिहार | १०४३६ | १११९ |
| ५ | छत्तीसगढ | २९१४ | ३४० |
| ६ | दिल्ली | २४ | ०३ |
| ७ | गोवा | ५० | १४ |
| ८ | गुजराथ | ३७४७ | ४७० |
| ९ | हरियाना | १३७१ | १४२ |
| १० | हिमाचल प्रदेश | ८५ | ६३ |
| ११ | जम्मू काश्मिर | १३२३ | ११६ |
| १२ | झारखंड | -- | -- |
| १३ | कर्नाटक | ५९३२ | ११३४ |
| १४ | केरळ | ५७०२ | १३७४ |
| १५ | मध्यप्रदेश | ६८७४ | ४८३ |
| १६ | महाराष्ट्र | १०१९० | १८७८ |
| १७ | मणिपूर | १४५ | ०४ |
| १८ | मेघालय | १६४ | ५० |
| १९ | मिझोराम | ६९ | ०७ |
| २० | नागालँड | १३२ | ११ |
| २१ | ओडिसा | ३९४० | १२५ |
| २२ | पंजाब | ९८८ | ०८ |
| २३ | राजस्थान | ५६०५ | १९८ |
| २४ | सिक्कीम | ६५ | ०१ |
| २५ | तामिळनाडू | ६४२२ | १४१७ |
| २६ | त्रिपूरा | ४२९ | ५० |
| २७ | उत्तर प्रदेश | २०३८० | १२६६ |
| २८ | उत्तराखंड | ८२८ | ६० |
| २९ | पश्चिम बंगाल | ६५६१ | २२६ |
| | केंद्रशासित प्रदेश | | |
| ३० | अंदमान, निकोबार बेट | ०९ | ०३ |

| अ.क्र. | राज्य / प्रदेश | जमीन धारणा केलेल्या व्यक्ती (हजारांमध्ये) | |
|---|---|---|---|
| | | पुरुष | महिला |
| ३१ | चंदीगढ | ०१ | एनइजी |
| ३२ | दादरा, नगर हवेली | १२ | ०२ |
| ३३ | दीव व दमण | ०५ | ०१ |
| ३४ | लक्षद्वीप | २४ | ०३ |
| ३५ | पाँडेचरी | २९ | ०८ |

वरील सर्व महिला राजकीय सहभागाचा व निर्णय प्रक्रियेचा अभ्यास करताना असे दिसून येते की, सर्व क्षेत्रामध्ये महिलांचा सहभाग हा पुरुषांच्या तुलनेत कमी प्रमाणाचा आहे तर काही ठिकाणी महिलांच्या सहभागामध्ये व निर्णय प्रक्रियेमध्ये थोड्या फार प्रमाणात वाढ झालेली आहे. तसेच असे दिसून येते की राजकीय सत्तेमध्ये महिलांचा सहभाग हा कमी असल्यामुळे राजकीय प्रक्रिया व निर्णय प्रक्रिया यामध्येही महिलांचा सहभाग अल्प प्रमाणात दिसतो.

# उपलब्ध संदर्भ साहित्याचा आढावा : भाग १

Report of Statistics on Women in India - Minakshi Sood, Himani Noutiyal

**प्रस्तावना :**

पन्नास ते ऐंशीच्या दशकांमध्ये संघाची राष्ट्रीय सेविका समिती व जनसंघ महिला आघाडी महिलांचे संघटन करत होती. राष्ट्रीय सेविका समिती हिंदू राष्ट्र उभारणीसाठी महिलांचे संघटन करीत होती, तर जनसंघाच्या महिला आघाडीमध्ये हिंदू राष्ट्र उभारणीदेखील सत्तासंपादन करण्याचा एक मुद्दा होता. महिला आघाडीच्या प्रथम अध्यक्षा मालतीबाई परांजपे या होत्या. (मोगल निशिगंधा , २००६: २२३-२३७) यावरून असे दिसते की, जनसंघाची महिला आघाडीदेखील पांढरपेशी स्वरूपाची होती. मात्र या महिला आघाडीत ब्राह्मणेतर महिलांचे संघटन करण्याचा मुद्दा सत्तरच्या दशकात आला होता. या दशकात राष्ट्रीय सेविका समिती व जनसंघाच्या महिला आघाडीच्या नेतृत्वाने ब्राह्मणेतर महिलांचे संघटन करण्याचा कार्यक्रम राबवला होता. ऐंशीच्या दशकात भाजपच्या महिला मोर्चाने यासाठी प्रयत्न केले व यासाठी वसंतराव भागवत यांनी पाठिंबा दिला. मात्र हे प्रयत्न व्यापक झाले नाहीत. नव्वदीच्या दशकात मात्र मात्र भाजपने महिला मोर्चास जास्त बळ पुरवले त्यानंतर व्यापक पातळीवर महिलांचे संघटन केले गेले. या दशकात हिंदुत्वाच्या चौकटीत शिवसेनेने महिला आघाडी कृतिशील केली. यास नवहिंदुत्वाचा एक संदर्भ आहे; तर दुसरा संदर्भ हा स्थानिक शासन संस्थामधील राजकीय आरक्षणाचा होता.

**नवहिंदुत्वाचा संदर्भ :**

हिंदूधर्म, हिंदुत्व व नवहिंदुत्व या संकल्पनांचा क्रमाक्रमाने विकास झाला आहे. हिंदुधर्म ही संज्ञा एक धर्म, तत्त्वज्ञान, समाजव्यवस्था व विचारप्रणाली आहे. तर हिंदुत्व ही संकल्पना हिंदुत्व विचारप्रणालीची आधुनिक काळात मांडणी करणारी संकल्पना आहे. राजकीय क्षेत्रात सर्व हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी मांडलेला एक मूल्यात्मक संच आहे. १९८० नंतर भारतात आर्थिक व सामाजिक बदल झाले.

मध्यम वर्गाचा विस्तार वाढला व यातून राजकीय सत्तेकडे वाटचाल चालू झाली. हिंदुत्ववादी पक्ष संघटना या बदलत्या परिस्थितीवर आरुढ झाल्या. व बहुजनवादी तोंडवळ्याप्रमाणे स्त्रीवादी चेहराही धारण केला. हिंदुत्व विचारप्रणाली धर्म, रुढी, परंपरा, समाज यांचा नवा आशय शोधून काढला. 'महिलांच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक हितसंबंधांचे संरक्षण केले जाईल, असा एक आदर्श विचार मांडला की, जो महिला वर्गाचं संघटन करतो. यासच 'नवहिंदुत्ववादी' म्हटले जाते. संघपरिवार, संघाचे नैसर्गिक मित्र, जातिसंस्था, धर्मसंस्था यांनी नवहिंदुत्ववादी विचार राबवला. हिंदू देव देवतांचे पुरोहितवादी वातावरण निर्माण केलं व यासाठी इलेक्ट्रॉनिक साधनांचा वापर केला गेला याचा परिणाम महिलांच्या मानसिकतेवर फार मोठ्या प्रमाणावर झाला व त्या संघपरिवाराशी जोडल्या गेल्या.

## महिला सबलीकरणाचा संदर्भ :

नव्वदीचे दशक हे महिला सबलीकरणाचा आरंभबिंदू होते. या दशकात सुरुवातीस महिलांसाठी स्थानिक शासन संस्थामध्ये ३०% आणि नंतर ३३% आरक्षण ठेवले गेले. या दशकात दोन स्थानिक शासनसंस्था निवडणुका झाला त्यामध्ये ३८०६ जागा महिलांसाठी राखीव होत्या व गेल्या दशकातही स्थानिक निवडणुका झाल्या व त्यासाठीही महिलांसाठी वरीलप्रमाणे जागा आरक्षित होत्या. म्हणजेच १५२२५ महिलांना नेतृत्व करण्याची संधी मिळाली होती. यासंदर्भामुळे भाजप व शिवसेना यांनी आपल्या महिला आघाड्या कृतिशील केल्या होत्या.

२०११ मध्ये स्थानिक शासनसंस्थांमध्ये महिला आरक्षणाचे प्रमाण ५०% झाले. यानंतर स्थानिक शासन संस्थांमध्ये सर्व मिळून ५५६० महिला निवडून येणार आहेत. यासंदर्भात भाजपने महिला वर्गाचे राजकीयीकरण केले आहे. त्यास राष्ट्रीय सेविका समिती, जनसंघप्रणीत महिला आघाडी व दुर्गा वाहिनी यांचाही एक संदर्भ आहे.

## राष्ट्रीय सेविका समिती :

या समितीची स्थापना डॉ. हेडगेवार व लक्ष्मीबाई केळकर यांनी वर्धा येथे १९३६साली केली. ईश्वरी शक्तीची ओळख करून देणे आणि राष्ट्रीयत्वाच्या उद्देशासाठी तयारी करणे, हे संघ व समितीत साधर्म्य आहे असे लक्ष्मीबाई केळकरांनी स्पष्ट केले परंतु याबरोबर संघ व समितीत फरकही केला. संघ व समितीच्या नावामध्ये जवळजवळ साम्य आहे. परंतु 'स्वयं'या शब्दामध्ये बदल आहे. त्याचे समर्थन असे केले जाते की, पुरुषांचे स्वत्व व्यक्तिगत असते, तर स्त्रीचे स्वत्व हे व्यक्तिगत नसून सर्व क्षेत्रातील आहे व संपूर्ण समाजाबरोबरची प्रगती असते. समितीच्या सभासदांना सेविका असे संबोधले जाते. समितीच्या शाखा जवळजवळ सोळा राज्यात पसरलेल्या आहेत. संघ व समितीच्या अंतर्गत रचनेत बरेच साम्य आहे. अधिकार-परंपरा न बदलणारी आणि भौगोलिक विभागणीवर आधारित आहे. संघाप्रमाणेच शाखेतील सेविका ह्या मुली, युवती, प्रौढा व ज्येष्ठ महिला या चार गटांत विभागल्या आहेत.

स्त्रियांबद्दलची मूलभूत तत्त्वे आणि भारतीय स्त्रीच्या जीवनाबद्दलचा तत्त्वज्ञान निश्चित करण्याची जबाबदारी डॉ. हेडगेवारांनी केळकरांना सोपविली होती. १९४५ पासून दर तीन वर्षांनी भारतामध्ये परिषद आयोजित केली जाते. समितीमार्फत शिकवण्या, नेमून दिलेल्या संस्कृत विषयावर व्याख्याने, औषधोपचार, भूमिगत जाळं, उपोषणे, प्रजा परिषद चळवळीमध्ये जहाल वक्तव्य करणे हे उपक्रम राबविले होते. चालू काळापेक्षा भूतकाळ किती समर्पक आणि श्रेष्ठ होता, याची आठवण लोकांना करून देण्यासाठी सेविकांचे संघटन करण्यासाठी हिंदु राष्ट्रीयत्वाच्या चौकटीतील पाच 'सण' साजरे केले जातात. १) वर्षप्रतिपदा २) गुरुपौर्णिमा ३) रक्षाबंधन ४) विजयादशमी ५) मकरसंक्रांत.

या उत्सवातून स्त्रियांना हिंदू स्त्री हे आत्मभान प्राप्त करून दिले. वर्षप्रतिपदा व गुरुपौर्णिमासारखे उत्सव विषमतेचे, गुलामगिरीचे प्रतीक आहेत, ही जाणीव महिलावर्गातून दूर

केली जाते. विजयादशमीचा उत्सव म्हणजे रामाचा रावणावरील विजय होय. हा संघाचा अर्थ आहे. तर समितीचा अर्थ म्हणजे दुर्गा देवीचा दुष्टांवरील (राक्षसांवरील) विजय होय.

दुर्गा ही देवता वैदिकपूर्व आहे असे महर्षी वि. रा. यांचे मत आहे व दुर्गेची रुद्र व सौम्य अशी रूपे आहेत. शिव ही देवताही वैदिकपूर्व होती. या देवतेला ब्रह्माचा अवतार मानून तिचे हिंदुकरण केले व सर्व देवींना दुर्गेच्या ठिकाणी एकरूप केले व आधुनिक राष्ट्रवादाची मांडणी करताना तिचे स्वरूप राष्ट्रशक्तीचे प्रतीक म्हणून पुढे आले. राष्ट्राचं शरीर मनोबल, सर्वांगीण समृद्धी आणि अध्यात्म संपदा या तिन्हींचा संयोग दुर्गेच्या प्रतिकात झालेला आहे. स्वामी विवेकानंदांपासून त्यांनी स्त्रिया या राष्ट्रवादाच्या प्रतिनिधी आहेत. ही कल्पना घेतली. वि. दा. सावरकरांची हिंदुत्व संज्ञा समितीच्या साहित्यात कायम आहे. समितीने भारतमातेची प्रतिमा उभी केली आहे. समिती भारतमातेचा उल्लेख ‘पार्वती’ आणि ‘दुर्गादेवी’ असा करते.

भारतमाता हिंदु स्त्रियांची हुबेहुब नक्कल करते. तेव्हा ती मातृत्वाशी आणि धर्मांशी जोडलेली असते. अशी भारतमातेची प्रतिमा समिती उभी करते.

## महिला मोर्चा - दुर्गावाहिनी :

भाजपने १९८० साली महिला मोर्चाची स्थापना केली. महिला मोर्च्यात स्त्रियांची राजकीय भरती ही राष्ट्रीय सेविका समितीतून झाली आहे. राष्ट्रीय पातळीवर प्रथम महिला मोर्चा प्रमुख विजयाराजे सिंधिया होत्या. महाराष्ट्राचे मात्र सुमतीबाई सुकळीकर यांच्याकडे नेतृत्व होते (१९८०). बाळासाहेब देवधरांनी संघाच्या विचारप्रणालीत क्रचिकता आणली. त्यानंतर समितीच्याही विचारप्रणालीतही बदल झाला व संघानेही समितीला प्रोत्साहन दिले. विशेषत: महिला मोर्चा-दुर्गावाहिनी या संघटना कनिष्ठ जातीतील महिलांचे राजकीय संघटन करतात. महिला मोर्चाचे नेतृत्व बिगर महाराष्ट्रीयन स्त्रीकडे देवून मुंबई शहरातील बिगरमहाराष्ट्रीयन महिला वर्गात शिरकाव करण्याचे धोरण स्वीकारले. समिती लक्ष न वेधून घेणारी संघटना होती. तिचा कणा राजकीय व सांस्कृतिक होता, तर महिला मोर्चा व दुर्गावाहिनी या संघटना लक्ष वेधून घेण्याचा आणि संसदीय राजकारणासाठी संघटन करणाऱ्या संघटना आहेत.

महाराष्ट्रात ६६ हजार १७०० सक्रीय महिला सदस्य होत्या. (१९९३) १ लाख १० हजार प्राथमिक सदस्या आणि ७ हजार सक्रिय सदस्या होत्या. (१९९५) गेल्या दशकात २ लाख प्राथमिक सदस्या आणि २० हजार सक्रीय सदस्या होत्या. (२००८) यावरून या संघटनेच्या राजकीय संघटनांची कल्पना करता येते. या संघटनांनी मध्यमवर्गीय महिलांचे शिक्षण नोकरी, हुंडा, रेशनकार्ड वर मिळणारा अपुरा धान्यपुरवठा, महागाई विरोधी आंदोलन हे प्रश्न हाती घेतले. समान नागरी कायदा या प्रश्नाभोवती शहरी भागात हिंदुत्व विचारांची चळवळ राजकीय संघटन करत होती.

नव्वदीच्या दशकात महिला मोर्चा कृतिशील झाला. तरीदेखील भाजपला १९९५ पर्यंत महिलांच्या संदर्भात स्थानिक शासन संस्थांमध्ये फारच कमी यश मिळाले. उदा.भाजपचे महिला सदस्य पंचायत समितीमध्ये ४९, जिल्हा परिषदांमध्ये ९०, नगरपालिकांमध्ये ८७ आणि महानगनरपालिकांमध्ये ५० सदस्य होते. केवळ नागपूर मध्ये जिल्हापरिषदेची एक महिला अध्यक्षा झाली होती. २००२ च्या शेवटी भाजपाच्या पंचायत समितीमध्ये १५ सभापती, पाच उपसभापती

आणि दोन जिल्हा परिषद अध्यक्षा महिला होत्या. २००१-२००२ मध्ये भाजपाच्या १५ महिला नगराध्यक्ष झाल्या होत्या. यावरून असे दिसते की, भाजपने महिला मोर्याने महिला वर्गांच्या राजकीय संघटनांचा प्रयत्न केला. मात्र त्यास मोठे यश आले नाही. १९९५ च्या निवडणुकीत भाजपने ११७ उमेदवारीत १२ महिलांना उमेदवारी दिली होती. त्यापैकी सहा महिला विजयी झाल्या. काँग्रेस दोन, शिवसेना दोन व शेकाप एक अशा महिला निवडून आल्या होत्या. यात भाजपच्या सर्वात जास्त महिला निवडून आल्या.

महिला मोर्चा व दुर्गावाहिनी या संघटनांत समितीतील सेविका पूर्णवेळ संघटनांचे काम करतात. दुर्गावाहिनी ही स्त्रियांची संघटना आहे. दुर्गावाहिनी स्थापनेमागील मुख्य प्रेरणा म्हणजे शारीरिक प्रशिक्षण देणे होय. बजरंग दल आणि दुर्गावाहिनी या संघटना जेव्हा विश्व हिंदू परिषदेने रामजन्मभूमी आंदोलन सुरू केले तेव्हा स्थापन झाल्या आहेत. या पाठीमागील प्रेरणा धार्मिक जागृती करणे ही नाही, तर हिंदू समाजाला शक्तिशाली बनवणे, या दृष्टीने ही संघटना काम करते. तसेच कनिष्ठ जातीतील गरीब महिलांचे संघटन करून ही संघटना महिलांना संघपरिवाराच्या भोवती फिरते ठेवते. महिलांनी आक्रमक व झुंजार होण्याचा संदेश संघटना देते. नवहिंदुत्व आणि जातसंघटनांनी 'आदर्शमाता' किंवा 'आक्रमक वीरांनी' अशा प्रतिमा स्वीकारल्या. तिचे दैवतीकरण केले. 'आदर्श माता पुरस्कार' जाहीर करून मातृत्वाचा गौरव केला.

## महिला आघाडी :

नव्वदीच्या दशकात महिला सबलीकरण धोरण आल्यानंतर शिवसेनेची महिला आघाडी क्रियाशील झाली. आरंभी संरक्षणाच्या मुद्द्यावर महिला शिवसेनेकडे संघटित झाल्या होत्या. सुरेखा गोडांबे यांनी शिवसेनेच्या महिला आघाडीची शाखा आरंभी उभी केली. त्यानंतर मुंबई शहरात २२० शाखा आणि २२० महिला शाखा प्रमुख झाल्या. मुंबई शहरात गटप्रमुखांची संख्या १० हजारावर आहे. त्यामध्ये स्त्रियांचे प्रमाण ४०% आहे. असा दावा केला जातो. मुंबईत सहा विभागप्रमुख आहेत. राज्यात एक महिला प्रमुख होती. त्यानंतर पाच महिला विभागप्रमुख करण्यात आल्या. असा संघटनात्मक व नेतृत्वाचा पसारा आघाडीने वाढविला आहे.

शिवसेनेची महिला आघाडी भाजपच्या मोर्चापेक्षा वेगळी, राजनीती वापरत होती परंतु तिची उद्दिष्ट मात्र राजकीय संघटनांचेच होते. स्थानिक लोकाधिकार समित्या स्थापन झाल्यानंतर बँक, विमा कंपन्या, विविध महामंडळ इथे शिवसेनेने महिलांना नोकरीच्या संधी उपलब्ध करून दिल्या. नोकरीच्या संधीमुळे शिवसेना व महिलांचा संबंध येऊ लागला. या पार्श्वभूमीवर आधारित शिवसेनेने महिला आघाडीची स्थापना केली. सुधाचुरी या महिला आघाडीच्या प्रमुख होत्या (१९९२-१९९८). दुर्गा व शक्ती ही शिवसेना महिला आघाडीची प्रतिके आहेत. ही प्रतिके हिंदू धर्मातून घेतली आहेत. शिवसैनिक महिला दुर्गाउत्सव साजरा करतात. ऐतिहासिक व पौराणिक देखावे प्रदर्शित करून हिंदू मानसिकता तयार केली जाते.

पाणी. वीज, नोकरी यासारख्या नागरी समस्या सोडविण्याचा शिवसेना महिला आघाडीचा मार्ग हिंदू धर्म व संस्कृतीवर आधारलेला आहे. ही त्यांची वैचारिक चौकट आहे. महिला आघाडी सार्वजनिकतेचे तत्त्व नाकरते तर डाव्या स्त्रीवादी चळवळी सार्वजनिकतेचे तत्त्व स्वीकारते. इज्जत,

प्रतिष्ठा  या गोष्टी शिवसेना आघाडी महत्त्वाच्या मानते. त्यामुळे स्त्रियांचे प्रश्न खाजकीरीत्या, व्यक्तिगत पातळीवर गोपनीय पद्धतीने सोडविले जातात. आघाडी 'समान नागरी कायद्याची' मागणी करते व यासाठी आघाडीतील महिला काही ठिकाणी आक्रमक भूमिका ही घेतलेल्या आहेत.

१९८४ नंतर शिवसेनेनं स्त्रीशक्तीचे रूपांतर नवहिंदुत्वामध्ये केले. वैयक्तिक पातळीवर संकटकाळी पुरुषांनी स्त्रियांना सामूहिक संघर्षात उतरविले. यासाठी शिवसेनेही स्त्रियांची प्रतिमा 'कालीदुर्गा' व 'शक्ती' अशा प्रतिकांच्या आधारे स्पष्ट केली. धार्मिक व सांस्कृतिक प्रतिकांच्या शिवसेना महिला आघाडीने वापर केला व यासाठी महाभारताच्या हळदीकुंक, दसरा भेट, दिपावली भेट यांसारखे कार्यक्रम राजकीय संपर्कासाठी वापरले. उच्चवर्गीय व मध्यमवर्गीय महिलांचा पाठिंबा संघटनेस मिळाला.

१९९८ नंतर शिवसेना महिला आघाडी कार्यक्रम, नेतृत्व, संघटना अशा तीन पातळ्यांवर हिंदूत्व चौकटीअंतर्गत बदलली नव्वदीच्या दशकात सामुहिक नेतृत्वाची पद्धती होती व एक पद होते. परंतु त्यानंतर कोकण, मराठवाडा, प. महाराष्ट्र, विदर्भ व दक्षिण महाराष्ट्र अशा पाच महिला संपर्कप्रमुख गेल्या दशकापासून नेमल्या गेल्या. नव्वदीच्या दशकात आघाडीचे स्वरूप शहरी होते. त्यानंतर आघाडीने शहरी पाठिंबा जपत ग्रामीण पाठिंबा मिळविण्याचा प्रयत्न केला. ग्रामीण भागात संघटन करण्यासाठी 'व्हॅलेंटाईन डे' निषेध, शेतकऱ्यांचे प्रश्प, वीजटंचाई, सातारा वासनाकांड, कोठेवाडी अत्याचार (जानेवारी २००१) पाश्चिमात्य संस्कृतीचा निषेध, डोंबिवली येथील अश्लिल कॅसेट व सीडींचा व्यापार आणि स्थानिक शासनसंस्थामधील निवडणुकांमध्ये सहभाग इ. मुद्दे उपस्थित करून राजकीय संघटन करण्याचा प्रयत्न केला.

शिवसेना पक्षाला पुरुषाच्या तुलनेत महिलांचा पाठिंबा कमी मिळतो. लोकसभा व विधानसभा निवडणुकीत या पाठिंब्यामध्ये फरक पडतो. (पाहा - पळशीकर सुहास २०१०:८४) १९९५च्या निवडणुकीत महाराष्ट्र विधानसभेसाठी ६ महिला उमेदवार शिवसेनेनं दिले होते त्यापैकी २ महिला विजयी झाल्या, तर ७२ पुरुष निवडून आले होते. या निवडणुकीत महिला मतदारांचे प्रमाण वाढले होते. महिलांचे मतदान, भाजप शिवसेना युतीस झाले. या निवडणुकीत शिवसेनेच्या पाठीराख्यांमध्ये ३३% स्त्रिया आहेत. असा एक निष्कर्ष नोंदवला आहे. १९९९ मध्ये शिवसेनेच्या चार महिला विधानसभा निवडणुकीत निवडून आल्या होत्या. १९९९ साली पालघर व कळंब या मतदार संघाबरोबर खुल्या दादर व निफाड मतदारसंघातून शिवसेनेच्या महिला उमेदवार विजयी झाल्या. २००४ मध्ये शिवसेनेच्या महिल निवडून येण्याचे प्रमाण घटले. पालघर व नांदेड या दोन मतदार संघातून शिवसेनेच्या महिला निवडून आल्या होत्या.

१९९८ च्या लोकसभा निवडणुकीत निवोदिता माने यांना शिवसेनेने इचलकरंजी येथून उमेदवारी दिली होती. त्यांना ३,३२,६२३ मते मिळाली तर त्यांचा पराभव आवाडे (काँग्रेस) यांनी १२,१३४ मतांनी केला. १९९९च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी निवोदिता माने व शालिनीताई यांनी शिवसेनेतून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात पक्षांतर केले. १९९९च्या लोकसभा निवडणुकीत वाशिम मतदार संघातून भावना गवळी यांना शिवसेनेने उमेदवारी दिली होती व या मतदार संघात शिवसेनेच्या महिला उमेदवार विजयी झाल्या.

निवोदिता माने, शालिनीताई पाटील, भावना गवळी, या मराठी जातीच्या महिलांच्या

शिवसेनेला पाठिंबा होता. विशाखा राऊत  या मागासवर्गीय, तर मनिषा निमकर या अनुसूचित जमातीच्या महिला उमेदवार होत्या. कल्पना नरहिरे यांना शिवसेनेने १९९५ साली शेकाप पक्षाच्या विरोधात व त्यांच्या वडिलांच्या विरोधात उमेदवारी दिली होती. त्यांनी शेकाप पक्षाचा व वडिलांचा पराभव शिवसेना पक्षातून केला.

**सारांश :**

नवहिंदुत्ववादी संघटनांमध्ये ब्राह्मणेत्तर स्त्रियांचा सहभाग गेल्या दोन दशकता वाढला आहे. हिंदुत्वाची ही चळवळ राजकीय चळवळ आहे. सत्तेचा दावा आणि हिंदू स्मिता हे दोन मुद्दे या चळवळीत स्पष्टपणे दिसतात. मराठा, ओबीसी, भटक्या विमुक्त जातीजमाती, चर्मकार, मातंग जातीतील स्त्रियांचा सहभाग दिसतो. नवहिंदुत्ववादी चळवळीत जातीय दृष्टिकोनातून उच्चवर्णीय व उच्चभ्रू स्त्रियांचा सहभाग आहे. हिंदूत्ववादी महिला चळवळींची तत्त्वे महिला-मुक्ती संकल्पनेच्या विरोधी जातात. त्यात आध्यात्मिक मुक्तीची संकल्पना मांडल्याचा भास व्यक्तीपुरता मर्यादित होता. हिंदूत्व महिला चळवळ भांडवलशाहीतून विस्तारलेल्या क्षेत्रावर आधारलेली आहे. ही चळवळ धार्मिक असल्यापेक्षा ती राजकीय आहे व ही चळवळ प्रस्थापित वर्गाचे समर्थन करते.

# उपलब्ध संदर्भ साहित्याचा आढावा : भाग २
## महिला सत्तासंघर्षाचा आलेख – प्रा. डॉ. वैशाली पवार

### उदारमतवादाचा अविष्कार

**प्रस्तावना :**

१९ व्या व २० व्या शतकाच्या पूर्वार्धातील उदारमतवादाचा प्रभाव आणि १९८० ते १९९० च्या दशकता उफाळलेला उदारमत या दोन्हींचा प्रभाव स्त्रियांच्या चळवळींवर होता.

''व्यक्ती स्वातंत्र्यात सर्वोच्च मूल्य मानणारी व व्यक्तीस जास्त स्वातंत्र्य मिळेल. अशा रीतीने समाजाचे संघटन करणे हे मूलभूत योग्य मानणारी विचारप्रणाली म्हणजे उदारमतवाद होय.

१९ व्या व २० व्या शतकाच्या पूर्वार्धात पितृसत्ताकता प्रभाव होता त्याला छेद देऊन रमाबाई रानडे यांनी नवीन कल्पना निर्माण करून स्त्री, अपूर्व मानव, अर्थव्यक्ती, परावलंबी इ. पासून फारकत केली. उदा. स्त्री–सार्वजनिक जीवनात काम करू शकते व विवेकबुद्धीचे तत्त्व स्वीकारले.

विवेकबुद्धीचे वर्तन करताना भावना या दुय्यम स्वरूपाच्या आहेत असे सांगितले. अंधश्रद्धेला विरोध केला. तसेच केशवपनास विरोध केला.

व्यक्तिस्वातंत्र्य, समता ही दोन राजकीय मूल्ये त्यांनी प्रत्यक्ष व्यवहारात राबविली. शासन संस्थेने महिलांसाठी शिक्षण सक्तीचे करावे, तसेच महिलांना मतदानाचा अधिकार द्यावा. अशी राज्याच्या संदर्भात कल्याणकारी भूमिका घेतली होती. म्हणजेच शासनसंस्था कल्याणकारी असावी अशी रमाबाई रानडे यांची भूमिका होती. रमाबाई रानडे यांची भागवत धर्मावर श्रद्धा होती. मात्र, त्यांनी एकेश्वरवादाचा स्वीकार केला होता. मूर्तीपूजा–कर्मकांड या गोष्टींना त्यांनी विरोध केला. न्या. रानडे प्रमाणेच मवाळ धोरण स्वीकारले होते व शिक्षणावर त्यांचा दृढ विश्वास होता. सेवासदन व अनेक चळवळींच्या माध्यमातून विविध कार्य करून महिलांचा पाठिंबा मिळविला होता. स्त्रियांच्या मताधिकाराचा प्रश्न हा स्त्री–राजकारणाचा पाया आहे असे सांगून स्त्रियांचा मताधिकाराचा अधिकार त्यांनी पदरात पाडून घेतला व त्यांना राजकारणात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन दिले. म्हणजेच समकालीन महिलांच्या उदारमतवादी राजकीय समावेशनाचा आरंभ रमाबाई रानडे यांच्या कल्पनांमध्ये दिसतो व त्यांनी आपल्या विचारांमधून उदारमतवादाचा शहरी अविष्कार घडवून आणला.

शारदाबाई पवार यांच्यावरती पुरोगामी व सत्यशोधक विचारांचा प्रभाव पडलेला आहे. सेवासदनातील नैतिक मूल्यांच्या शिकवणुकीमुळे व उदारमतवादी विचारांमुळे शारदाबाई पवार यांची प्रतिमा आधुनिक स्त्रीवादी ठरते. जुन्या चालीरिती, परंपरा यांना झुगारून देऊन ज्ञानाला महत्त्व दिलेले आहे. व विवेकावर विश्वास आहे. तसेच बुद्धीप्रामाण्यवादालाही महत्त्व दिले आहे. विचारांमध्ये स्पष्टता व नेमकेपणा आहे. विचारांचे व व्यक्तीचे स्वातंत्र्य याला आपल्या व्यवहारवादी व दैनंदिन

जीवनात जीवंत ठेवले आहे. उदारमतवादी धोरण स्वीकारून स्त्रियांना आर्थिक स्वावलंबनाचा आधार देऊन कार्य सुरू केले. स्त्रियांचा राजकीय सहभाग व व्यक्ती स्वातंत्र्य यासाठी प्रयत्न केले. ग्रामीण भागांमधील समस्यांना वाचा फोडण्याचे काम शारदाबाई पवारांनी केले. ग्रामीण भागामध्ये परिवर्तन प्रक्रियेला चालना देऊन निर्णय प्रक्रियेमध्ये सहभाग घेण्यासाठी स्त्रियांना प्रोत्साहन दिले.

सर्वधर्मसमभावाचे तत्त्व स्वीकारून जातीव्यवस्थेला विरोध केला. आधुनिक शिक्षणपद्धतीचा स्वीकार करून मुलांना शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले व शिक्षण हे सामाजिक व वैचारिक विचारांचे परिवर्तनाचे मुख्य साधन आहे असे सांगून शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. शारदाबाई पवारांनी शेतकरी कामगार पक्षाच्या माध्यमातून वैचारिक स्वातंत्र्याची जपवणूक केलेली दिसत आहे. परोपकारी वृत्ती असल्यामुळे त्यांनी अनेकांना सहकार्य केले तसेच स्वातंत्र्यलढ्यात व संयुक्त महाराष्ट्र चळवळीत सहभाग घेवून व भूमिगत राहून कार्य केले यातून त्यांचा धाडसीपणा हा गुण दिसून येतो.

शारदाबाई पवारांनी स्वातंत्र्य, समता, न्याय, समान वितरण मूल्य यासाठी तत्त्वांचे पालन त्यांनी केले आहे. रमाबाई रानडे यांच्या सेवासदनमध्येही कार्य करून उदारमतवादी विचार त्यांनी ग्रामीण भागात पसरवला. विवेक, बुद्धिप्रामाण्यवाद यांना प्रमाणभूत मानून त्यांनी ग्रामीण भागात बदल घडविला.

उदारमतवादी विचारांमध्ये कुटुंबसंस्था आणि समाज यांचे ऐक्य व एकोपा जास्त महत्त्वाचा वाटत होता असे दिसून येते.

**साठीच्या दशकातील महिलांचा अराजकीय सहभाग :**

साठीच्या दशकात संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाली. स्थानिक स्वराज्य संस्थांनच्या प्रयोगाचा आरंभ झाला. सहकार चळवळ व शिक्षण संस्था यांनी गती घेतली व यातून निवडणुकीतील महिलांचा सहभाग यावरती अभ्यास चालू झाला. संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर १९६२ची पहिली निवडणूक झाली. या निवडणुकीत तेरा महिला निवडून आल्या होत्या. १९६७ मध्ये नऊ महिला निवडून आल्या होत्या. अशाप्रकारे १९६२–६७ या काळात एकूण २२ महिला निवडून आल्या होत्या. या दोन्ही निवडणुकामध्ये काँग्रेस पक्षाकडून महिला निवडून आल्या होत्या. १९६२ व १९६७ मध्ये निवडून आलेल्या महिलांनी काँग्रेस पक्षासाठी राजकीय संघटन केले. महिलांचे प्रश्न त्यांनी विधानसभेत मांडले नाहीत.

साठीच्या दशकात निवडून आलेल्या महिला राजकीय पक्षासाठी राजकीय कृतिप्रवणतेचे काम करत होत्या. या दशकात सार्वजनिक हिताचे वादविषय राजकारणात आले नाहीत. महिला अस्मितेची चर्चादेखील झाली नाही. यावरून असे दिसून येते की, साठीच्या दशकातील विधानसभेवर एका अर्थाने पुरुषाचे नियंत्रण होते. पुरुषांनी महिलांच्या विधानसभेतील राजकीय सहभागावर बहिष्कार घातला होता. पूर्ण ग्रामीण भागातील महिला निवडून येण्याचे प्रमाण फारच कमी होते. त्यामुळे या काळातील लोकशाहीसमोर महिलावर्गात विस्तार करण्याचे

आव्हान अधोरेखित झाले. कारण स्थानिक शासनसंस्था, सहकार चळवळ ग्रामीण भागात राजकारण सरकणे या घटना घडून महाराष्ट्रातील लोकशाही व्यापक झाली.

अल्पसंख्याक समाजातील महिलांमध्ये लोकशाही महिलांमध्ये लोकशाही विस्ताराचे आव्हान या दशकात अधोरेखित झाले म्हणजेच मतदार या महिला होत्या. मात्र त्यांना राजकीय सहभागाची संधी उपलब्ध नव्हती. साठीच्या दशकात सरंजामी पद्धतीमुळे महिलांना समाजाने राजकारण करण्याचा अधिकार दिला नव्हता, त्यामुळे समाजाच्या विरोधात काँग्रेस पक्षाने महिलांचा राजकीय सहभाग वाढविणे शक्यच नव्हते व ज्या महिला साठीच्या दशकात निवडून आल्या होत्या त्या सत्तरीच्या दशकात राजकारणातून बाहेर आल्या होत्या.

**पक्ष पातळीवरील महिला नेतृत्वाचा आरंभ :**

सत्तरीच्या दशकाचे महिलांच्या संदर्भात महागाई विरोधात आदोलन हे खास वैशिष्ट्य होते. यामुळे महिलांचे वेगळे मुद्दे राजकारणात उपस्थित झाले. परंतु तरीही महिलांच्या राजकीय सहभाग हा साठीच्या दशकाच्या तुलनेत सत्तरच्या दशकात घडलेला दिसतो. परंतु सत्तरीच्या दशकात महिला शहरी आणि काँग्रेसवर निवडून आल्यामुळे वेगळे राजकारण घडण्याची प्रक्रिया सुरू झाली होती. मात्र हे राजकारण शहरी व उच्चवर्णीय व उच्चजातीय स्वरूपाचे होते. ऐंशीच्या दशकात सत्तरीच्या तुलनेत वाढ झालेली दिसते. या दशकात मध्यमवर्गीय व श्रमिक कामगार स्त्रिया एकत्र आल्या होत्या. म्हणजेच १९७८ नंतर महाराष्ट्राच्या विधान सभेसाठीच्या मतदार संघातून महिला उमेदवार निवडून येण्याचे प्रमाण वाढलेले दिसते. उदा. १९७८ मध्ये ०८, १९८० मध्ये १५ व १९८५ मध्ये १६ अशा एकूण ४३ महिला निवडून आल्या होत्या. १९७८ मध्ये काँग्रेस पक्षाकडून केवळ तीन महिला निवडून आल्या होत्या. जे. एन.पी. कडून पाच महिला निवडून आल्या होत्या.

१९८० मध्ये काँग्रेसकडून पुन्हा निवडून आलेल्या महिलांचे प्रमाण वाढलेले दिसते. त्या वर्षी १९ पैकी १७ महिला या काँग्रेस पक्षाकडून निवडून आल्या होत्या. भाजप या पक्षाच्या दोन महिला निवडून आल्या होत्या. काँग्रेसखेरीज भाजपने महिलांचे संघटन या दरम्यान सुरू केले, असे दिसते. १९८५ मध्ये काँग्रेस, जनता पक्ष, काँग्रेस (एस) व अपक्ष अशा तीन पक्षांकडून व अपक्ष या पद्धतीने महिला निवडून आल्या होत्या. महागाई विरोधी आंदोलनामुळे विधानसभेच्या खेरीज महिलांची चळवळ उभी राहत होती. १३ सप्टेंबर १९७२ रोजी महागाई प्रतिकार संयुक्त महिला समिती स्थापन केली होती. त्याच्या अध्यक्षा मृणाल गोरे या होत्या व त्याअंतर्गत लाटने मोर्चा काढण्यात आला होता. दलित पँथर, 'युक्रांद' या चळवळीमध्ये 'स्त्रीवाद' ही महिला प्रश्नांची चिकित्सा करणारी चर्चा सुरू झाली होती. 'पितृसत्ताक संबंध' ही संकल्पना नव्याने महाराष्ट्रात घडली. विचारस्वातंत्र्याचे समर्थन चळवळीमधून केले होते.

**नव्वदीच्या दशकातील महिलांच्या संघटनांचे राजकारण :**

या दशकात महिलांच्या राजकारणास नवीन आर्थिक धोरण, महिला सबलीकरण धोरण,

बदलती पक्षीय स्पर्धा आणि आघाड्यांचे राजकारण असे राजकीय संदर्भ आहेत. त्याशिवाय दलित महिला चळवळ आणि हिंदुत्ववादी महिला चळवळ या दशकात जास्त कृतिप्रवण झाल्या होत्या. महिलांचे राजकीय संघटन करण्यासाठी संघ, समिती, भाजप व शिवसेना या सर्वांनी धार्मिक आधार घेतला व महिलांची मानसिकता बदलण्यासाठी प्रयत्न केले. धार्मिक अस्मिता निर्माण करून महिला मोर्चा दुर्गावाहिनी, यांच्या विचारप्रणालीतून महिलांचे संघटन करण्याचा प्रयत्न केला गेला.

१९९० च्या विधानसभेत २८८ जागांपैकी ०६ महिला निवडून आल्या होत्या. यावरून असे दिसते की ऐंशीच्या दशकातील महिला सहभागाच्या तुलनेत कमी दिसते. १९९० च्या विधानसभा निवडणुकीत केवळ हिंदू धर्माच्या महिला निवडून आल्या होत्या. १९९५ च्या विधानसभा निवडणुकीच्या निकालामधून महाराष्ट्राच्या राजकारणात फेरबदल झाले व भाजपकडून ६ महिला व शिवसेनेकडून २ महिला निवडून आल्या व शेतकरी कामगार पक्षाचे नेतृत्व मीनाक्षी पाटील यांच्याकडे गेले. त्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात नेतृत्व बदल झाले व यावरून असे दिसते की महाराष्ट्राचे राजकारण अस्थिर झाले आहे. काँग्रेसच्या फक्त दोन जागा निवडून आल्या होत्या. त्यामुळे असे दिसते की या दशकात काँग्रेसकडून महिलांचा पाठिंबा शिवसेना आपल्याकडे सरकत गेला. १९९० प्रमाणेच १९९५ च्या निवडणुकीतही ११ महिला या हिंदू धर्माच्याच निवडून आल्या होत्या. तर इतर धर्माची एकही महिला निवडून आली नव्हती.

नव्वदीच्या दशकात काँग्रेस व शिवसेना - भाजप अशी तिरंगी राजकीय स्पर्धा होती. १९९९ मध्ये विधानसभा मतदारसंघातून १२ महिला निवडून आल्या होत्या. यामध्ये शिवसेनेच्या ४, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या २, भाजपच्या ३, काँग्रेस पक्षाची १, रिपब्लिकन पक्षाची १ व शेतकरी कामगार पक्षाची १ महिला निवडून आली होती. या निवडणुकीत १२ पैकी ११ महिला हिंदु धर्माच्या तर १ महिला नवबौद्ध निवडून आली होती. १९९९ मध्ये काँग्रेस - राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेना-भाजप असे राजकीय स्पर्धेचे मोठे चार घटकपक्ष उदयास आले.

### समकालीन दशकातील महिलांचे राजकीय संघटन :

समकालीन दशक हे एकविसाव्या शतकातील पहिले दशक आहे. या दशकात २००४ व २००९ अशा दोन विधानसभा निवडणुका झाल्या. या दोन निवडणुकांमध्ये राजकीय पक्षांनी महिलांचे संघटन केले. मात्र स्वतंत्रपणे महिला राजकारण उभे राहिले नाही. या दशकात विधानसभा व लोकसभा पातळीवर महिला आरक्षणाचा प्रश्न ऐरणीवर आला होता. कारण १९९० च्या दशकात आरक्षणामुळे पक्षीय राजकारणात बरेच फेरबदल झालेले दिसतात. २००९च्या निवडणुकीच गेल्या सहा दशकांच्या तुलनेत फार बदल झाला नाही. मात्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, ओबीसी व ख्रिश्चन अशा विविध समाजगटातील महिला निवडून आल्या, हे या निवडणुकीचे वेगळेपण आहे. याशिवाय मनसे या पक्षाची स्थापना होऊन त्यांचे २ महिला उमेदवार लोकसभा निवडणुकीत निवडून आले होते.

२००४ च्या विधानसभेत २८८ पैकी १२ महिला विधानसभेवर निवडून आल्या होत्या. या निवडणुकीत काँग्रेस पक्षाला इतर पक्षांच्या तुलनेत जास्त यश मिळाले होते. तसेच या

दशकात अल्पसंख्याकांना प्रतिनिधीत्व मिळाले होते.

२००९ च्या विधानसभेत २८८ जागांपैकी ११ महिला विधानसभेवर निवडून आल्या होत्या. एकूणच काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना भाजप, शेकाप आणि मनसे या पक्षांनाही महाराष्ट्रातील पितृप्रधान समाजव्यवस्थेच्या मर्यादा विधानसभा पातळीवर पडल्या होत्या. विधानसभेच्या खाली स्थानिक शासन संस्थांमध्ये किंवा लोकसभा पातळीवर मात्र काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, भाजप आणि मनसे हे पक्ष थोडे जास्त व्यापक होतात. स्थानिक शासन संस्थांमध्ये ५०% आरक्षण असल्याने या पक्षांना पितृप्रधान समाजव्यवस्थेवर मात करता येते.

संवाद कौशल्य, संभाषण कौशल्य, भाषण कौशल्य, चर्चे बोलता येण्याची कला ही कौशल्ये त्यांना अवगत असल्यामुळे लोकसभा पातळीवर त्यांना संधी द्यावी लागते असे दिसते.

**पक्षीय राजकारणात ठरवलेले महिला राजकारण :**

१९६२ ते २००९ या दरम्यान महाराष्ट्राच्या विधानसभेमध्ये ११७ महिला निवडून आल्या होत्या. या निवडून आलेल्या महिला हिताचे राजकारण करीत नाहीत. १९६२ ते २००९ च्या निवडून आलेल्या महिला या राजकीय पक्षांकडून राजकारण करीत आहेत. उदा. काँग्रेस, जनसंघ, भाजप, शिवसेना इ. असे दिसून येते. तसेच राजकारण करताना पक्षाचे हितसंबंध जपतात. स्त्रीवादी मुद्दे गाभ्याचे म्हणून येत नाहीत, महिलांचे राजकारण हे पुरुषसत्ताक पद्धतीच्या चौकटीतील आहे, जात, जमातवाद या चौकटीत घडते. महिलांच्या राजकारणाला सामाजिक, आर्थिक असे स्वतंत्र पाठबळ नाही हेच सर्व काही दिसून आले आहे.

संरचनात्मक आणि लिंगभेद या वैचारिक बळाच्या संयोगातून वगळण्याची प्रक्रिया घडली आहे. महिलांना संधीची समानता दिली गेली नाही. नागरिक या नात्याने संसाधने आणि सुविधा यांच्या संदर्भात निर्णय घेण्याचा अधिकार नाकारण्यात आला. महिला समूहाला समाजात योगदान करण्याच्या विशेष उदारमतवादी प्रारूपापासूनही वगळण्यात आले आहे. याचे मुख्य कारण सामाजिक प्रतिष्ठा आणि आदर्शामध्ये दिसते. उच्च जातीतील महिला जास्त प्रमाणात निवडून आलेल्या आहेत, असे दिसते. यावरून असे दिसते की, निवडून आलेल्या महिलांमध्ये उच्च जाती व कनिष्ठ जाती असा पदसोपानात्मक संबंध राहिला आहे.

महाराष्ट्र विधानसभा पातळीवरील राजकीय सत्ता महिला व पुरुष यांच्यामध्ये विभागली गेली. १९६२ ते १९७० पर्यंत महिलांच्या प्रश्नावर महिला आमदारांनी चर्चा केली नाही. असे मत झाडबुके प्रभा यांचे आहे. या काळात महिलांचा राजकीय सहभाग व संघटन करण्यासाठी विविध पक्षांनी, समित्यांनी, मोर्चानी धार्मिक अस्मितेचा आधार घेवून मानसिकता बदलण्यासाठी प्रयत्न केलेले दिसतात. १९९५ नंतर प्रत्यक्ष पक्ष महिलांची आघाडी स्थापन करून महिलांना राजकीयदृष्ट्या कृतिप्रवण करताना दिसते. त्यामुळे महिला राजकारणाच्या क्षेत्रात बहुसंख्येने आलेल्या दिसतात.

**महाराष्ट्रातील राजकीय सत्तासंघर्षात महिलांची भूमिका :**

१९६२ ते २००९ या कालखंडामध्ये महाराष्ट्र विधानसभेमध्ये एकूण ३१०८ आमदार निवडून आले आहेत. त्यापैकी २९९१ पुरुष आमदार निवडून आले आहेत. तर ११७ महिला आमदार निवडून आल्या आहेत. ३१०८ सदस्यांपैकी ८२३ आमदारांना राजकीय सत्तेमध्ये वाटा मिळाला आहे. त्यामध्ये महिला आमदारांचे प्रमाण हे कमी आहे. यावरून असे दिसते की, महाराष्ट्र विधानसभा पातळीवरील राजकीय सत्ता महिला व पुरुष यांच्यामध्ये विषम पद्धतीने विभागली गेली.

साठ व सत्तरीच्या दशकात महिला सत्तेत होत्या, त्या एकाच गटाच्या नव्हत्या. तर त्या तीन गटात विभागल्या होत्या. या महिला चव्हाण गट, निष्ठावंत गट आणि जनता पक्ष यांचे प्रतिनिधीत्व करत होत्या. निष्ठावंत गट इंदिरा गांधी यांचे समर्थन करणार होता. या दोन दशकांतील महिलांचे सत्ताकारण हे पक्षाचे हितसंबंध ाणि गटांचे समर्थन करणारे राजकारण होते. ऐंशीचे दशक हे अस्थिरतेचे होते. शरद पवार वगळून सर्वच मुख्यमंत्री हे निष्ठावंत गटाचे होते. व त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी शरद पवार मुख्यमंत्री झाल्यानंतर. गटांचा समतोल साधण्यासाठी आणि निष्ठावान गटाचे समर्थन करण्यासाठी कॅबिनेट पातळीवरील सत्ता महिलांना दिली गेली यापूर्वी महिलांना सत्ता दिली नव्हती.

नव्वदीच्या दशकाच्या शेवटी सत्तांतर झाले. दोन्ही काँग्रेस पक्षांच्या आघाडीचे सरकार स्थापन झाले. या दशकात महिलांकडे जास्त प्रमाणात सत्ता देण्यात आली होती. परंतु त्यावरही पुरुष नियंत्रण होते.

गेल्या साठ वर्षांत असे दिसून येते की विधिमंडळावरील सत्तेचे स्वरूप हे पुरुष वर्चस्वाचे राहिले आहे. ज्या महिलांच्या सत्तेत सहभाग होता तो फारच मर्यादित स्वरूपाचा होता. फक्त प्रतिभा पाटील व प्रभा राव यांचा कालावधी एक दशकापेक्षा जास्त होता. साठ वर्षात महिलांचा सहभाग हा पक्ष किंवा गट यांनी निश्चित केलेला होता. महिलांच्या चळवळींशी फारसा संबंध नव्हता. महिलांकडे संपत्तीचा अधिकार नव्हता. सत्ता, संपत्ती आणि अधिकार यांचा एकत्र संबंध असतो, यामुळे राजकीय प्रभाव निर्माण करण्यास त्यांच्याकडे साधन सामग्री अपुरी ठरली आहे व महिलांचे राजकारण हे पोकळ स्वरूपाचे राहिले आहे.

**राजकीय समावेशनाची प्रारूपे :**

भारतात १८१८ मध्ये आंग्लाई स्थापन झाली, त्यानंतर भारताच्या इतिहासात आधुनिक युगाला व भारतीय स्वातंत्र्यचळवळीस सुरुवात झाली व यातूनच महिलांच्या राजकीय समावेशनाची चर्चा भारतीय समाजात सुरू झाली. भारतीय चळवळींच्या इतिहासात स्त्रीची प्रतिमा आदर्शवादी अभ्यासपद्धतीप्रमाणे लिहिली आहे. स्त्रीच्या भूमिकेची वस्तुनिष्ठ मांडणी केली नाही. एकोणिसाव्या शतकात भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील महिलांची वैचारिक भूमिका स्पष्ट झाली होती. या दशकात म. फुलें उदारमतवादी सीमारेषा पार करून पुढे गेले आणि त्यांनी स्वातंत्र्य कोणासाठी असा प्रश्न विचारून समाजातील शेतकरी, कामगार, महिला व शुद्रअतिशुद्र यांच्या स्वातंत्र्याचा विचार मांडला. यामुळे भारतीय स्वातंत्र्य चळवळीला व्यापक आशय प्राप्त झाला.

१९३१ पासून पुढे काँग्रेसने महिलांचे स्वतंत्रपणे संघटन सुरू केले परंतु निर्णय निश्चिती करणाऱ्या संस्थांपासून त्यांना वेगळे ठेवले होते. परंतु असे असूनही महिलांनी स्वातंत्र्यकाळात एकत्र येऊन सहभाग घेतला होता आणि आपली भूमिका जपलेली दिसते.

१९७५ साली आंतरराष्ट्रीय स्त्री-वर्ष जाहीर झाले. जागतिक पातळीवर स्त्रीवादाची चर्चा सुरू झाली. उदारमतवादी, स्त्रीवाद, समाजवादी स्त्रीवाद, मार्क्सवादी, स्त्रीवाद, जहाल स्त्रीवाद, उत्तर आधुनिक स्त्रीवाद, असे विचारप्रवाह स्त्रीवादात उदयाला आले. सबलीकरणाची संकल्पना आर्थिक, सामाजिक व मानसशास्त्रीय स्वरूपाची असते. सबलीकरणाचा सत्ता, समता, विकास, वाटपात्मक न्याय या संकल्पनेबरोबर संबंध येतो. विषमता, आर्थिक व सामाजिक शोषण व गुलामगिरी यांच्या विरोधातील संघर्ष असतो. सबलीकरणाचा मानवी हक्कांसाठीचा लढा आहे. समाज विविध स्तरांचा असतो. या स्तरांमध्ये भारतीय समाजाचे उभ्या व आडव्या रेषांमध्ये विभाजन झाले आहे. त्यामुळे महिला या वर्गाचे देखील उभ्या व आडव्या रेषांमध्ये विभाजन झाले होते.

नव्वदीच्या दशकात, महिलांचा राजकीय क्षेत्रात समावेश राज्यसंस्थेने पुढाकार घेवून केला. महाराष्ट्र सरकारने जुन १९९३ मध्ये महिला आयोगाची स्थापना केली. राज्य महिला आयोगाने पुढाकार घेऊन महिलांच्या विकासासाठी कायद्याच्या व प्रशासनाच्या क्षेत्रात सुधारणा करण्याचा विचार मांडला व यामुळे महिला धोरण हे जून १९९४ मध्ये जाहीर झाले. महिलांवरील अत्याचाराविरुद्ध कायदा झाला व महिला सबलीकरण प्रक्रिया गतिमान झाली. स्थानिक शासन संस्था मध्ये दिले गेलेल्या ३३% आरक्षणामुळे २००३ पर्यंत ४५१६ महिलांचे राजकीय समावेशन झाले. २००४ ते २००९ या काळात ५०% आरक्षणामुळे सर्व गटातील महिलांचे राजकीय समावेशन जास्त मोठ्या प्रमाणावर झाले.

राजकीय समावेशनाच्या प्रारूपामध्ये व्यक्तिस्वातंत्र्य याला महत्त्व दिले आहे व हाच विचार उदारमतवादी विचार मूल्य आहे. सामाजिक, राजकीय व आर्थिक बंधने व्यक्तीवर लादल्यास उदारमतवादाचा विरोध असतो. समाजसुधारकांनी स्त्री-शिक्षणावर भर दिला व विविध चळवळी घडून आल्या. यातून महिला सबलीकरणास शक्ती मिळाली व महिलांच्या राजकीय समावेशनाचा मुद्दा चळवळीतून पुढे आला. संघर्ष करून महिलांचा राजकारणात समावेश होईल अशी दिशा महिलांच्या राजकारणाला मिळाली होती.

**सार्वजनिक धोरण आणि महिला :**

भारतातील १९५० ते २०१० या दरम्यान महिलाविषयक सार्वजनिक धोरणाचे तीन गटांमध्ये वर्गीकरण झालेले दिसते.

१) कल्याणकारी चौकटीत कायदे तयार करणे व आयोगांची नेमणूक करणे.

२) महिला संघटना, दबाव गट, राजकीय पक्ष, आंतरराष्ट्रीय वातावरण यांच्या प्रमाणामुळे भारत सरकारने कल्याणकारी धोरणाच्या जागी विकासलक्ष्मी महिला धोरण आले.

३) महिला सबलीकरण धोरण आणले.

महिला धोरणाद्वारे स्त्रियांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा व त्यांना सत्ताधारी बनविण्याचा प्रयत्न राज्यसंस्था करताना दिसते. महिलांचे आर्थिक, सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक पातळीवर सबलीकरण व सक्षमीकरण करण्यासाठी विविध धोरणांद्वारे प्रयत्न केले जात आहेत.

**राष्ट्रीय पातळी : महिलांना राजकीय वगळण्याची प्रकिया :**

१९५२ ते २००९ या काळात महिलांचा राजकीय सहभाग, संघटन करण्यासाठी तसेच महिलांचे सबलीकरण व सक्षमीकरण करण्यासाठी विविध प्रकारे प्रयत्न केले गेले तरी देखील त्याचा प्रभाव हा जास्त प्रमाणात नाही. परंतु महिला सबलीकरण धोरणामुळे २००९ नंतर राजकारणात फेरबदल झालेले दिसून आलेले आहे. राजकारणाची प्रक्रिया ही काही अंशी गतिमान झाली आहे तसेच व्यापकही झाली आहे. परंतु असे असूनही पुरुष वर्चस्व काही प्रमाणात सत्तेवर आहेच असे दिसून येते. यावरून विधानसभा राजकारणात स्त्रियांना वगळल्याची प्रक्रिया झालेली आहे. त्याचबरोबर लोकसभा पातळीवर देखील महिलांना राजकीय क्षेत्रातून वगळल्याची प्रक्रिया झालेली दिसून येते. लोकसभा पातळीवर ३४% ते १०.८६% दरम्यान महिलांचा राजकीय सहभाग मर्यादित करण्यात आला आहे. कायद्याद्वारे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ५०% आरक्षण तर लोकसभा पातळीवर मात्र ६.१३ टक्के सहभाग. याचाच अर्थ कायद्याद्वारे महिलांचा सहभाग वाढविता येतो. परंतु कायद्यासाठी हा सहभाग मर्यादित होतो किंवा त्यांना त्यांच्या न्याय हक्कांपासून बहिष्कृत केले जात आहे.

**सारांश :**

१९ व्या व २० व्या दशकात उदारमतवादाचे धोरण स्वीकारले गेले त्यामुळे स्त्रियांमध्ये सर्व बाजूने जागृती होण्यास सुरुवात झाली. यातून विविध चळवळी उदयास आल्या. व या चळवळींचे नेतृत्व महिलाच करत होत्या. त्यातून महिलांचे नेतृत्व गुण विकसित झाले. ९० च्या दशकात महिलांच्या संघटनांच्या राजकारणामुळे नवीन आर्थिक धोरण व महिला सबलीकरण यांचा जास्त प्रमाणात विचार केला गेला. महिलांनी राजकीय सहभागामध्ये सकारात्मकदृष्ट्या सहभाग घेतला. पक्षीय राजकारणाला छेद देऊन महिलांनी क्रांतिकारी भूमिका घेतलेली दिसते.

## प्रकरण ३

# पुणे महानगरपालिकेतील महिलांचा राजकीय सहभाग (२०११-२०१२ निवडणूक)

**प्रस्तावना :**

महिलासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेत ५०% आरक्षण जाहीर झाले आणि महिलांचा राजकारणातील सहभाग वाढला. २००७ मध्ये महिलांचा केवळ ३०% सहभाग होता. पण २०१२ च्या निवडणुकीत तो ५०% च्या वर गेला आहे. पुणे महानगरपालिकेत ७८ महिला नगरसेवक आहेत. त्यामध्ये व्यावसायिक, गृहिणी, नोकरदार या सर्व क्षेत्रांतून आलेल्या महिलांचा समावेश आहे. आज महिलांसाठी प्रत्येक ठिकाणी व्यासपीठ खुले आहे.

निवडणुकीच्या माध्यमातून महिलांना अजून एक व्यासपीठ मिळाले आहे. आपल्या कार्याची व बुद्धीची ओळख करून देण्याची एक नवीन संधी महिलांना मिळाली आहे असे म्हणावे लागेल. महिला महानगरपालिकेत अधिक प्रमाणात आल्यावर त्यांना राजकीय प्रक्रियेत व निवड प्रक्रियेत समान संधी मिळेल या उद्देशाने आरक्षण देण्यात आले.

**चंदननगर परिसर :**

खराडी गावठाण परिसर हा पूर्वी माळराण म्हणून ओळखला जात होता त्याचा सध्या कायापलट होतो आहे. आयटी कंपन्या आणि पंचतारांकित हॉटेल या भागात अधिक आहेत. या भागाचे नेतृत्व संजिला पठारे करणार आहेत. महापालिकेत नगरसेवक म्हणून काम करण्याची त्यांना प्रथम संधी मिळालेली आहे. आमदार बापूसाहेब पठारे यांच्या त्या पत्नी आहेत. त्यामुळे त्यांना राजकारणाची पार्श्वभूमी आहे. याशिवाय कल्पवृक्ष महिला उन्नती संस्थेमार्फत महिलांना रोजगार प्रशिक्षणाचे माध्यम त्यांनी सुरू केले आहे. प्रभाग क्र. २ मध्ये मध्यमवर्गीय बहुसंख्य असल्याने सोसायट्यांमध्ये कचरा व्यवस्थापन, उत्कृष्ट आरोग्याची हमी, खराडीतील नागरिकांना देण्यासाठी पसिराची स्वच्छता आणि महानगर पालिकेचे रुग्णालय पूर्ण क्षमतेने सुरू करण्यासाठी प्रयत्न करणार आहेत. प्रभागातील राखीव जागांवर उद्यान आणि सांस्कृतिक भवन उभारण्यास

प्राधान्य देणार आहेत. तुळजाभवानी परिसरात पाण्याचा प्रश्न आहे तो मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करणार आहेत.

महानगरपालिका निवडणूक येरवडा कारागृह परिसरातून रिपब्लिकन आठवले पक्षाच्या सुनंदा देवकर यांनी महिला गटातून विजय मिळविला. आई ग्रामपंचायतीच्या सदस्या, माहेरी आणि सासरीही राजकारण आणि समाजकारणाचा वारसा मिळाल्याने समाजकार्याची ओठ पूर्वीपासूनच होती.

सासरे उत्तमराव देवकर हे विश्रांतवाडी, हौसिंग बोर्ड परिसरात १९७४ पासून दहा वर्षे नगरसेवक होते. पी.एम.टी.चे अध्यक्षपदही त्यांच्याकडे होते.

घरातील जबाबदारी सांभाळत महिला बचत गटांच्या माध्यमातून सामाजिक कार्य सुरूच होते. पती संजय देवकर यांनी शांतीनगर परिसरातून अपक्ष म्हणून निवडणूक लढविली होती. त्यामुळे त्यांचाही जनसंपर्क चांगलाच होता. श्रमिकनगर, कामगार नगर, पंचशीलनगर, हिरामणनगर मौजे नगर आणि इतर वस्त्यांमधील नागरिकांना झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या माध्यमातून स्वत:चे घर मिळवून देण्यासाठी प्रयत्न चालू आहेत. या प्रभागात रस्ते, पाणी, स्वच्छता या सुविधांसोबतच विशेषत: महिलांचे प्रश्न सोडविण्यास प्राधान्य देणार आहेत.

युवक काँग्रेसच्या माध्यमातून बोपोडीतील एका बुडाच्या अध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळणाऱ्या अर्चना रमेश कांबळे या आता बोपोडी प्रभागाच्या नगरसेविका म्हणून पुणे महानगरपालिकेत मनसेचे प्रतिनिधित्व करणार आहेत. लग्न होवून अवघे दोन महिने झाले असतानाच त्यांना आता प्रभागाचाही नवा संसार पहावा लागणार आहे. त्यांचे वडील रमेश कांबळे हे काँग्रेसचे निष्ठावान कार्यकर्ते, अनेक वर्षे पक्षाची सेवा केल्यानंतर त्यांनी महापालिकेत जाण्याची पक्षाकडे इच्छा व्यक्त केली, पण काँग्रेसने तीनदा त्यांना उमेदवारी नाकारली. मग युवक काँग्रेसच्या माध्यमातून राजकीय क्षेत्रात काम सुरू झाले. २०१२ च्या निवडणुकीत पक्षाने तिकीट दिले नाही म्हणून त्यांनी मनसेची लेखी परीक्षा दिली आणि वडिलांच्या कामामुळे अर्चनास मनसेची उमेदवारी मिळाली आणि अत्यंत चुरशीच्या लढतीत अर्चना ३७० मतांच्या फरकाने विजयी झाल्या.

झोपडपट्टी आणि सोसायटी असा संमिश्र असणाऱ्या या भागात पिण्याची पाण्याची सोय करणे गरजेचे आहे. तसेच कचऱ्यासाठी बायोगॅस प्रकल्प, महिलांसाठी स्वच्छता गृह ह्या विषयांना त्या प्राधान्य देऊन त्यामध्ये सुधारणा करण्याचा प्रयत्न करणार आहेत.

तीस वर्षापासून करीत असलेल्या सार्वजनिक कामाची पावती मोठ्या संघर्षानंतर शशिकला गायकवाड यांना अखेर मिळाली. पुणे विद्यापीठ प्रभाग क्र. ७ अ मधून त्या आता महानगरपालिकेचे

प्रतिनिधित्व करणार आहेत. पती डी. जी. गायकवाड हे काँग्रेसच्या माध्यमातून अनेक वर्ष काम करीत आहेत. त्यांच्या जोडीने शशिकलाताई सामाजिक कामात उतरल्या. वॉर्डमधील नागरिकांच्या विविध समस्यांसाठी आंदोलने, मोर्चे यात भाग घेतला. पतीच्या कामामुळे व कपडे विक्री व्यवसायामुळे जनसंपर्क होता. शशिकला ताईंनी दोनदा अपक्ष म्हणून निवडणूक लढविली होती. पण त्यांना यश आले नाही. यावेळी त्यांना आमदार विनायक निम्हण यांच्यामुळे काँग्रेसची उमेदवारी मिळाली आणि त्या विजयी झाल्या.

**पुणे विद्यापीठ परिसर :**

पुणे विद्यापीठ हा प्रभाग मोठ्या सोसायट्यांपासून झोपडपट्टीपर्यंत असा संमिश्र आहे. या प्रभागातील पाणी, कचरा, सांडपाणी व्यवस्थापन, झोपडपट्टी पुनर्वसन हे प्राधान्याचे विषय आहेत. याशिवाय नाल्यात झालेले अतिक्रमण त्यामुळे पावसाळ्यात घरांमध्ये पाणी घुसल्याचे प्रमाण या भागात आहे त्यामुळे भुयारी गटारे चेंबरही संख्या वाढविणे यावर भर दिला जाणार आहे.

महानगरपालिका निवडणूक औंध गावठाण परिसरातून सौ. गायकवाड संगिता या प्रतिनिधीत्व करणार आहेत. संगिता ताई यांना त्यांच्या कार्यात त्यांचे पती दत्तात्रय गायकवाड यांची मोलाची साथ मिळाली आहे. गेली अनेक वर्षे श्री. गायकवाड हे राजकारणात आहेत व ते समाजकार्याच्या माध्यमातून कार्य करत आहेत. संगितताई यांनी प्रथम निवडणूक लढविली होती. पण त्यामध्ये त्यांना यश आले नाही. परंतु त्यांनी दुसऱ्यांदा निवडणूक लढवली व त्या विजयी झाल्या.

औंध गावठाण हा परिसर पुणे विद्यापीठ लगत आहे. परंतु त्या ठिकाणी आता वेगळेच वळण निर्माण झाले आहे. औंध मधील शासकीय रुग्णालयामुळे त्या परिसराची रहदारी ही जास्त आहे.

या परिसरात अतिक्रमण असल्यामुळे अगदी छोटी -छोटी असे घरे निर्माण झाली आहेत व सोयी-सुविधांचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे अतिक्रमण हटविण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. त्याचबरोबर ट्रॅफिक ही देखील प्रामुख्याने मुद्दा आहे. यासाठी विशेष प्रयत्न केले जाणार आहेत.

बाणेर-बालेवाडी गावठाण या प्रभागातून मुरकुटे रंजना अशोक या प्रतिनिधीत्व करणार आहेत. घरी वडील हे पुणे जिल्हा परिषदेवर कृषी सभापती म्हणून कार्यरत होते. तेव्हापासूनच समाजकार्याची ओढ निर्माण झाली व शेती व्यवसाय करत करत समाजकार्य करण्याचा निर्णय घेतला. लग्नानंतर पती श्री. अशोक मुरकुटे यांचाही समाजकार्यात सहभाग घेतला व त्याचाच

परिणाम म्हणून त्यांची पहिली निवडणूक लढविली त्यात त्यांना यश आले.

वडील श्री. तुकाराम हागवणे हे कृषी सभापती असताना विविध मोर्चे, आंदोलने यामध्ये सहभागी होत. त्यांच्यासोबत रंजनाताई या देखील सहभागी होत असे. नगरसेवक म्हणून विजयी झाल्यानंतर प्रथम त्यांनी त्यांच्या प्रभागातील $P_1$ आणि $P_2$ या औंधमधील पार्किंगचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न सुरू केले.

त्याचबरोबर कचरा प्रकल्प हे कचरा व्यवस्थापनासाठी सुरू करण्यात आलेले आहेत. औंधमध्ये दवाखाना मंजूर करण्यात आलेला आहे. तसेच विविध प्रशिक्षण व शिबिरे आयोजन करून महिलांचा विकास साधण्यासाठी प्रयत्न करणार आहेत.

पाषाण, सुतारवाडी प्रभाग क्र. १० अ मधील चिमटे रोहिणी या महानगरपालिकेत प्रतिनिधीत्व करणार आहेत. त्या पदवीधर असून ARDE मध्ये नोकरी करत आहेत. नोकरी करत असताना समाजकार्य देखील त्या करत होत्या आणि त्यांनी प्रथम निवडणूक लढविली. परंतु त्यामध्ये त्यांना यश आले नाही. तरीसुद्धा त्यांनी समाजकार्य करत राहिले आणि दुसऱ्यांदा निवडणूक लढविली. त्यात त्यांना यश आले व त्या २०११-१२ मध्ये नगरसेवक म्हणून निवडून आल्या. रोहिणी ताई यांना कोणत्याही प्रकारचा राजकीय वारसा नाही.

कचरा व्यवस्थापन आणि ट्रॅफिक (हायवेवरील) समस्या या प्रश्नांचा त्या गंभीरपणे विचार करत आहेत व त्यासाठी प्रयत्न चालू केले आहेत. तसेच वीजेचा प्रश्न हाही गंभीर स्वरूपाचा आहे. पूर्वी त्यांच्याकडे कसल्याही प्रकारचे बचत गट नव्हते किंवा त्या सहभागी देखील नव्हत्या. परंतु त्या आता महानगरपालिकेचे बचत गट चालवतात व महिलांसाठी रोजगार व योजना यांचा पाठपुरावा करतात.

महानगरपालिका निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या निम्हण सुषमा प्रभाग क्र. १० ब सुतारवाडी पाषाण मधून निवडून आल्या. गेली अनेक वर्ष त्यांचे पती मी. प्रमोद निम्हण हे राजकारणात आहेत व त्या त्यांच्याबरोबर त्यांच्या कार्यात सहभागी होत असे व त्यांना पूर्ण पाठिंबा देत असत. याच्या माध्यमातून त्यांचा जनसंपर्क वाढला व हळूहळू त्यांनी नवीन नवीन कार्यक्रम व योजना निर्माण करून महिलांना सामाजिक व आर्थिक आधार देण्याचे प्रयत्न सुरू केले.

प्रथम निवडणूक लढवून त्या त्यामध्ये यशस्वी झाल्या आहेत. त्यांच्या समाजकार्यामुळे त्यांना ओळखले जात होते. त्यांच्या प्रभागातील अतिक्रमण ट्रॅफिक या गंभीर स्वरूपाच्या समस्या आहेत. यासाठी त्यांनी सुधारणा करण्याचा प्रयत्न चालू केला आहे.

तसेच वृक्षारोपण योजना व उदयाने निर्माण करण्याचा त्यांचा मानस आहे.

**गोखलेनगर परिसर :**

पाचपांडव सोसायटी व प्रभाग क्र. ११ अ गोखलेनगर, जनवाडी या विभागातील शारदा ओरसे या महानगरपालिकेत त्यांच्या प्रभागाचे प्रतिनिधीत्व करणार आहेत. त्यांचा मुलगा रविंद्र ओरसे हे गेल्या दोन वर्षापासून समाजकार्य व राजकारण करत आहेत. शारदाताई, यांनी निवडणूकी अगोदर अवघ्या दोन महिन्यापूर्वी राजकारण व समाजकार्य करण्यास सुरुवात केली व त्यानंतर त्यांना राष्ट्रवादी काँग्रेसची उमेदवारी मिळाली व त्या निवडून आल्या. त्या स्वत: पदवीधर आहेत तर त्यांचा मुलगा इंजिनिअर आहे. त्यांच्या प्रभागातील ड्रेनेज लाईन चोकॉप होणे ही प्रमुख समस्या होती त्यासाठी त्यांनी नवीन चेंबर टाकण्याचे काम चालू केले आहे. तसेच रोडचे काम चालू झाले आहे. बचत गटाच्या माध्यमातून त्यांनी महिलांसाठी नवीन उद्योग सुरू केले आहेत व ते पूर्ण करण्यासाठी त्या सतत प्रयत्नशील राहणार आहेत.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे प्रभाग क्र. १३ (मॉडेल कॉलनी) मधून निलम कुलकर्णी यांनी पालिकेची निवडणूक लढविली आणि जिंकली. त्या वनस्पती शास्त्राच्या पदवीधर आहे. घरातल्या जबाबदाऱ्या पेलताना अनुवादीकेचा व्यवसायही त्या सांभाळतात. जपान फौंडेशनच्या विविध परीक्षांमध्ये त्या उत्तीर्ण झाल्या आहेत. पती सॉफ्टवेअर क्षेत्रात कार्यरत आहेत. मुलगा अमेरिकेच्या स्टॅनफ्लोड विद्यापीठात गणित विषयामध्ये पदवी पूर्व शिक्षण घेत आहे.

त्या म्हणाल्या की, अनपेक्षित नव्हते तर जाणीवपूर्वक राजकारणात आले. दोन वर्षापूर्वी कामास सुरुवात केली. विद्यार्थ्यांना जपानी भाषा शिकविणे आणि भाषा अनुवाद या व्यवसायापलीकडे जाऊन नगरसेविका म्हणून निवडून आल्याने जबाबदारी आणखी वाढली आहे. नागरिकांच्या प्राथमिक समस्या सोडविण्यासाठी त्यांनी निवडणूक लढविली. या निर्णयाला मतदारांनीही साथ दिली, विश्वास दाखवला त्यामुळेच मी नगरसेविका झाले. महिला म्हणून पालिका सभागृहात जाण्याची मला भीती वाटत नाही. त्यापेक्षा माझ्या मनात कुतूहल आणि उत्सुकताच अधिक आहे असे त्यांनी सांगितले.

निवडून आलेल्या सर्व नगरसेवकांबरोबर एकत्र काम करण्याचा प्रयत्न करणार आहेत. नागरिकांना सुखकारक आणि सुरक्षित जीवन देण्यासाठी तसेच प्रभागातील पालिकाशाळेच्या दर्जा सुधारणे, महिलांच्या स्वच्छता गृहांची संख्या वाढविण्याचा प्रयत्न करणार आहेत.

**शिवाजीनगर परिसर :**

महापालिका निवडणूक कमलनयन बजाज उद्यान परिसरातून मनसेच्या साने आशा यांनी विजय मिळविला. आशा ताईंचे शिक्षण जेमतेम ३ री पर्यंत परंतु त्यांचे पती गेली अनेक वर्षे

समाजकार्य व राजकारणात आहेत. त्यामुळे सामाजिक कार्याची ओढ निर्माण झाली व त्यांनी प्रथम निवडणूक लढविली व त्यामध्ये त्यांना यश आले.

बचत गटाच्या माध्यमातून महिलांसाठी विविध उपक्रम व प्रशिक्षण चालू करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. तसेच काही भागात झोपडपट्टी आहे. त्या ठिकाणी स्वच्छता, ड्रेनेजची व्यवस्था करण्यासाठी प्रयत्न चालू केले आहेत. त्याबरोबर मुंबई हायवे असल्यामुळे वाहतूक व पार्किंगचा प्रश्न नेहमीच येतो तो सोडविण्यावर त्यांचा भर आहे.

महापालिका निवडणूक जयजवाननगर, येरवडा पसिरातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या मीना परदेशी यांनी महिला गटातून विजय मिळविला. त्यांचे पती रवी परदेशी हे गेली अनेक वर्षे राजकारण व समाजकार्यात आहेत. मीनाताई यांनी घरातील जबाबदारी सांभाळत केबल व्यवसाय देखील त्या सांभाळत होत्या. या व्यवसायातून त्यांनी समाजकार्य करण्याचा निर्णय घेतला तसेच पती राजकारणातून आहेत त्यांना त्यांनी पाठिंबा दिला व त्यांच्या कार्यात सहभागी झाल्या. मीनाताई यांचे शिक्षण जेमतेम पाचवी पर्यंतच झाले आहे.

येरवडा हा भाग झोपडपट्टी म्हणून ओळखला जातो त्यामुळे त्याठिकाणी सोयी-सुविधांचा अभाव दिसून येतो व हेच लक्षात ठेवून त्यांनी निवडणुकीला उभे राहण्याचा निर्णय घेतला व त्यात त्या प्रथम प्रयत्नात यशस्वी झाल्या. ड्रेनेजची व्यवस्था करणे, पाणी व कचरा यांचे व्यवस्थापन करण्यासाठी त्या प्रयत्नशील राहणार आहेत त्यासाठी त्यांनी नवीन ड्रेनेज पाईपलाईन टाकण्यासाठी प्रस्ताव पालिकेत सादर केला आहे.

लग्नानंतर काही वर्षातच नवऱ्याचे छत्र हरपले व तीन मुलांना शशिकला ताईंनी लहानाचे मोठे केले. त्यात त्यांचे शिक्षण जेमतेम ४ थी पर्यंत अशा वेळेस त्यांच्यावर जबाबदारी ही मोठी होती. परंतु त्यांनी खचून न जाता धैर्याने अडचणीला सामोरे जाण्याचे ठरविले व मालधक्का या ठिकाणी ते सिमेंट पोती उतरविण्याचे काम करू लागल्या व त्यांच्या संसाराला सुरुवात झाली व मुलांना शिकविले. त्यांचा एक मुलगा - श्री संतोष सुदाम आरडे हे माजी नगरसेवक आहेत. तर एक मुलगा व्यवसाय करतो तर मुलगी विवाहित आहे.

अडचणी या जवळून पाहिल्यामुळे त्या कमी करण्यासाठी प्रयत्न चालू केले व मुलाला समाजकार्य व राजकारणाचे धडे दिले. त्यातून ते नगरसेवक पदापर्यंत गेले व समाजकार्य चालू ठेवले. २०११-१२ च्या निवडणुकीत त्या स्वत: उभ्या राहिल्या व निवडून आल्या. गेली अनेक वर्षे केलेल्या कामाची पावतीच आहे. असे त्यांनी सांगितले.

जयजवानगर परिसरातील पाणीप्रश्न त्यांनी मार्गी लावला. ड्रेनेजची व्यवस्था केली. विधवा

स्त्री पेन्शन योजना सुरू केली. ज्यांना राहण्यासाठी घरे नाहीत त्यांना वार्डस्तरीय निधीतून घरकूल योजना राबविण्यासाठी प्रयत्न चालू केले आहेत.

विज्ञान शाखेची पदवी घेतलेल्या सावंत शितल यांना समाजकारणाचे बाळकडू माहेरीच मिळाले होते. लग्नानंतर पती व सासरे हे देखील समाजकारणात सक्रीय आहेत त्यांच्याबरोबर शितल ताईंनी देखील समाजकार्यात सहभाग घेतला. त्यांचे सासरे भारत सावंत हे माजी महापौर होते तर पती अजय हे गेली १३ वर्षे समाजकार्य व राजकारण यामध्ये सक्रीय आहेत. शितलताईंना समाजकार्याची आवड असल्यामुळे त्यांनी २०११-१२ च्या पालिका निवडणुकीत उभे राहण्याचा निर्णय घेतला व त्या विजयी झाल्या.

बचतगटच्या माध्यमामार्फत महिलांसाठी असलेल्या पालिकेच्या योजना यांचा पाठपुरावा करतात. ई-सेवा केंद्रामार्फत दाखले देतात. शांतीनगर परिसरातील ड्रेनेज लाईनची पूर्ण पाईप लाईन बदलली आहे तसेच एकता सोसायटी इंद्रायणी नगर येथील पाणी पाईप लाईनची सुधारणा केली आहे व यापुढे विविध, योजना, सुधारणा कशा होतील व त्या लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी प्रयत्नशील राहणार आहेत.

शैक्षणिक क्षेत्राची पाश्वभूमी असलेल्या मीनल सरवदे यांना महापालिकेत नगरसेवक म्हणून संधी मिळाली. वडगाव शेरी मतदार संघातील प्रभाग क्र.१७ चे त्या प्रतिनिधीत्व करणार आहेत. पती आनंद सरवदे हे राष्ट्रवादी काँग्रेसच्या माध्यमातून राजकारणात आहेत. मीनल यांनी त्यापूर्वी अध्यापनाचे काम केले आहे. परंतु मुलांचे संगोपनासाठी नंतर त्यांनी गृहिणीची भूमिका बजावली. पुढे त्यांनी (मातृभूमी फौंडेशन) च्या माध्यमातून सामाजिक कार्यास सुरुवात केली. नागरी सुविधांचे प्रश्न मांडले त्यामुळे त्यांना यावेळी नगरसेवक पदाची संधी मिळाली. काँग्रेसच्या उमेदवार सिंधू सकट यांचा पराभव करून त्या निवडून आल्या.

या प्रभागात ४ मोठ्या वसाहती आहेत त्याचे नागरी आणि पुनर्वसनाचे प्रश्न आहेत ते सोडविण्यावर भर देणार असल्याचे मीनल सरवदे यांनी सांगितले. यशवंतनगर आणि कंजारभटनगर येथील नागरिकांसाठी पक्की घरे आणि प्रभागातील सर्वच वसाहतीमधील तरुणासाठी रोजगाराच्या योजना राबविण्यासाठी प्रामुख्याने प्रयत्न केला जाईल. कल्याणीनगर, शास्त्रीनगर भागात वाहतुकीच्या कोंडीचा मोठा प्रश्न आहे. त्यामुळे नागरिकांना रस्ता या भागात पादचारी पूल आणि भूयारी मार्ग करण्यासाठी प्रयत्न करणे. कल्याणीनगर परिसरात पार्किंगची समस्या आहे. रस्त्यावर गाड्या लावण्याचे प्रमाण मोठे आहे हा प्रश्न मार्गी लावला जाईल. त्यावर संपूर्ण प्रभागात महिलांसाठी स्वच्छता गृह ही समस्या महत्त्वाची आहे. ती तातडीने सोडविण्यास प्राधान्य दिले जाईल असे

त्यांनी सांगितले.

समाजसेवेची ६० वर्षापासूनही परंपरा सांभाळत चंचला कोद्रे यांनी पती संदीप कोद्रे यांच्यामुळे राजकारणात प्रवेश केला. पहिल्याच प्रयत्नात त्या नगरसेविका झाल्या. रस्ते, पाणी पुरवठा, सांडपाण्याची व्यवस्था यासारख्या मूलभूत सुविधांकडे लक्ष देण्याचा त्यांचा प्रयत्न असेल. घरात असलेली राजकारणाची परंपरा सांभाळताना समाजकार्याकडे लक्ष द्यावे लागेल यांची पुरेपूर कल्पना असल्याचे या सांगतात.

मगरपट्टा सिटी, मुंढवा गाव, या प्रभाग क्र. २० अ मधून राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे चंचल कोद्रे विजयी झाल्या. १९५२ पासून सखाराम कोद्रे त्यानंतर सलग दोन पंचवार्षिक मध्ये राजाराम कोद्रे आणि त्यानंतर २५ वर्षे सासरे कैलास कोद्रे यांचा नगरसेवक म्हणून पालिकेतील सहभाग यामुळे समाजसेवेचे मोठे आव्हान त्यांच्यापुढे असेल. मुंढवा गावातील रस्त्याचा प्रश्न बिकट बनला असून सांडपाण्याच्या पाईपलाईनची दुरुस्ती करण्याकडे प्राधान्याने लक्ष द्यावे लागेल असे त्यांचे म्हणणे आहे.

पालिकेच्या दवाखान्यास दोन एकर  जागा देवून सासऱ्यांनी गरिबांना रुग्णसेवा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केल्याचे त्या सांगतात. याच रुग्णालयात उत्तम सुविधा कशा मिळतील. चांगले डॉक्टर आपल्या अनुभवाचा फायदा गरीब रुग्णाना कसे देतील याकडे लक्ष द्यावे लागेल असेही त्या सांगतात. खराडी बायपास रस्त्यावरील वाहतूक कोंडीचा प्रश्न गंभीर स्वरूप धारण करत असून रुंदीकरणासाठी खासगी मालमत्ताधारकांना योग्य तो मोबदला देवून हा प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न त्यांनी करावा लागणार आहे असे कोद्रे यांचे म्हणणे आहे.

महापलिका निवडणुकीत मनसेच्या विनिता वागसकर कोरेगाव पार्क (२१ब)  मधून निवडून आल्या. आप्पा बळवंत चौकात लहानाची मोठी झालेल्या विनिता यांचे दहावी पर्यंतचे शिक्षण हुजूरपागा शाळेत झाले तर महाविद्यालयीन शिक्षण एस.पी. कॉलेजमध्ये झाले. वडील बँक ऑफ महाराष्ट्रामध्ये नोकरीत असल्याने त्यांना घरातून बँकींगचे धडे मिळाले. त्यामुळे त्यांनी कॉसमॉस बँकेच्या लक्ष्मी रोड शाखेत स्वागत कक्षात नोकरीला सुरुवात केली. योग झेम प्रतिष्ठानच्या माध्यमातून सामाजिक सेवेत कार्यरत असलेले राजेंद्र वागसकर यांच्याबरोबर १९९९ मध्ये विवाह झाला. यानंतर त्यांची कॉसमॉस बँकेच्या कोरेगाव शाखेत बदली झाली. तेथे काम करत असताना या परिसरात जनसंपर्क वाढला. (Helping Nature) म्हणून ओळखले जाणारे राजेंद्र वागसकर यांनी २००७ मध्ये मनसेकडून कोरेगाव पार्क मधून महानगरपालिका निवडणूक जिंकली. या काळात हळदीकुंकू कार्यक्रम, गौरी-गणपती स्पर्धा आणि महिला बचत गटांच्या माध्यमातून जनसंपर्क वाढला. दरम्यानच्या

काळात वेकींजच्या फ्रेश फ्रोझन चिकन व्यवसायाची डिस्ट्रिब्यूटरशिप मिळाल्याने बँकेची नोकरी सोडली.

नुकतेच स्थानिक स्वराज्य संस्था महिलांना ५०% आरक्षण मिळाले. या निवडणुकीत पॅनलमध्ये सुशिक्षित महिला असावी असा विचार पुढे आला. परंतु बहुतांश सुशिक्षित महिला राजकारणात येत नाही. त्यामुळे आपणास एकत्रित काम केले तर असा विचार करून घरातूनच त्यांची सुरुवात केली. मतदारांनीही मोठ्या प्रमाणात विश्वासाने दोघांना निवडून दिले. त्याचा हा विश्वास सार्थ करून दाखविण्यासाठीही कोरेगाव सोबतच ताडीवाला रोड, बोट क्लब भागात नागरिकांना पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करणार आहेत.

महानगरपालिका निवडणुकीत डेक्कन जिमखाना या प्रभागातून खाडे निलिमा या विजयी झाल्या आहेत. पती- दत्तात्रय सखाराम खाडे हे गेली अनेक वर्षे समाजकार्य व राजकारण यामध्ये सक्रीय आहेत. निलिमा खाडे यांनी त्यांच्या पतीच्या समाजकार्यात सक्रीय सहभाग घेतला व बरोबरीने कार्य चालू केले.

प्रथम निवडणूक लढवून त्या विजयी झाल्या. अर्थशास्त्र विषयामध्ये पदवी संपादन केल्यानंतर घरची जबाबदारी सांभाळली आणि त्याचबरोबर समाजाचे प्राथमिक प्रश्न/समस्या सोडविण्यासाठी त्यांना संधी मिळाली. निलिमा खाडे यांच्या प्रभागाअंतर्गत कामगार पुतळा हा भाग देखील येतो. त्या ठिकाणी राहणाऱ्या रहिवाशांचा प्रश्न हा गंभीर स्वरूपाचा आहे. तेथील लोकांना शिक्षण मिळत नाही, आरोग्याची काळजी घेण्यासाठी वेळेवर औषधे मिळत नाहीत. दवाखाना नाही, त्यामुळे त्या ठिकाणातील गरोदर स्त्रियांना अनेक संकटांना सामोरे जावे लागत आहे. अस्वच्छता, आरोग्य या समस्यांमुळे भावी पिढीही कुपोषित निर्माण होत आहे व हा गंभीर स्वरूपाचा प्रश्न आहे.

शिक्षणाचा अभाव असल्यामुळे अनेक शैक्षणिक अडचणी निर्माण झाल्या आहेत. नदीच्या किनारी राहणाऱ्या लोकांचा पुनर्वसनाचा प्रश्न गंभीर आहे व त्यासाठी देखील निलिमा ताई प्रयत्न करणार आहेत.

केळेवाडी कुठल्याही महिलेकडे अश्विनी जाधव यांच्याबद्दल चौकशी केली तर ती फंडवाली बाई का? असेच उत्तर मिळते. केळेवाडीत लहानाची मोठी झालेली माया उर्फ अश्विनी फंड बचत गट साक्षरता अभियानाच्या माध्यमातून घराघरात पोहोचली. या वस्तीनेही तिला आपण प्रभाग क्र. २६ मधून थेट महानगरपालिकेत पाठविले.

टाटा मोटर्सचे कर्मचारी व केळेवाडीतील भाजपचे कार्यकर्ते तुकाराम जाधव यांची पत्नी

एवढ्या एकाच निकषावर त्यांना उमेदवारी मिळालेली नाही किंबहुना तळागाळातील महिलांसाठी पाच ते सात वर्ष त्याकरिता असलेले काम पाहुनच काँग्रेसने त्यांची निवड केली आणि त्यांनीही ती सार्थ ठरविली. जाधव चालवित असलेल्या बचतगटांची सदस्य संख्या ३५० हून अधिक आहे. त्याखेरीज केळेवाडीतील साईनाथ मित्र मंडळ ट्रस्टच्या त्या सक्रीय सदस्या आहेत. ट्रस्टच्या महिला साक्षरता वर्ग, आरोग्य शिबिर, मोफत दवाखाना, साईनाथ जीम, क्रिकेटचे सामने तसेच सुंदर माझे घर, रांगोळी स्पर्धा अशा उपक्रमात त्यांचा सहभाग उल्लेखनीय असतो.

केळेवाडीतील महिलांचा फंड तसा तीस वर्ष जुना, त्याद्वारा धुणी, भांडी, केरफरशी अशी कामे करून उपजीविका करणाऱ्या हजारो महिलांना त्यामुळे आधार मिळाला आहे. काही वर्षापूर्वी हा फंड चालविण्यास कोणच पुढे येईना तेव्हा वस्तीतच वाढलेल्या मायाला (अश्विनी) महिलांनी पुढाकार घेण्यास भाग पाडले. गोरगरिबाला, अडल्या नडल्याला वेळीच मदत पुरविणारा हा फंड बंद पडू नये असे त्यांना वाटले. तेथूनच त्यांची फंडवाल्याबाई अशी ओळख झाली.

विद्यार्थीनी घडविण्याचे काम करणाऱ्या पुष्पा-कनोजिया आता हातात छडी घेवून महापालिकेला वळणावर आणणार आहेत. कोथरूडमधील मतदारांनी बहुधा याच हेतूने त्यांना महापालिकेत पाठविले असावे. अहिल्यादेवी प्रशालेतील मराठी विभागाच्या प्रमुख आणि विद्यार्थीप्रिय शिक्षिका अशी ख्याती असलेल्या कनोजिया सहकाऱ्यांमध्येही लोकप्रिय आहेत.

लोकसंग्रह आणि सामाजिक कार्याची आवड असलेल्या कनोजिया अगदी सहज राज ठाकरे यांच्या परीक्षेला बसल्या आणि चांगल्या गुणांनी पासही झाल्या. त्यानंतरही उमेदवारीसाठी आपली निवड होईल असे त्यांना वाटले नव्हते. त्यामुळेच नंतरच्या दोन मुलाखतीही त्यांनी सहज म्हणूनच दिल्या. परंतु २९ तारखेला मनसेने त्यांना उमेदवारी देण्याचा निर्णय घेतला आणि राज ठाकरेंच्या इंजिनबरोबर कनोजिया बाईंचाही राजकीय प्रवासाला सुरुवात झाली.

जन्माने पुणेकर असलेल्या कनोजिया यांचे बालपण शिवाजीनगरच्या भांबुर्डा परिसरात गेले. भारत इंग्लिश स्कूल आणि मॉर्डन महाविद्यालयातून शिक्षण घेतल्यानंतर अध्यापन शास्त्राचाही त्यांनी अभ्यास केला. उमेदवारी जाहीर झाल्यानंतर बारा दिवसात पंचवीस हजार रहिवाशांशी त्यांनी संपर्क साधला. त्यातून परिसरातील अनेक प्रश्न पुढे आले असून ते सोडविण्याचा प्रयत्न पुष्पा कनोनिया करणार आहेत.

**वारजे माळवाडी परिसर :**

महापालिका निवडणुकीत पॉप्युलरनगर वारजे या प्रभागातून मनसेच्या दांगट भाग्यश्री या विजयी झाल्या व त्या त्यांच्या प्रथम निवडणुकीत यशस्वी झाल्या. त्यांचे पती कैलास महादेव

दांगट हे राजकारण व समाजकार्य यामध्ये गेली अनेक वर्षे कार्यरत/सक्रीय आहेत. त्यामुळे राजकारण व समाजकारण अगदी जवळून पाहिले आहे. त्यातूनच त्यांनी घरची जबाबदारी सांभाळत समाजकार्याची जबाबदारी ही अगदी चोखपणे निभावण्याचा प्रयत्न केला व पतीच्याबरोबर राजकारण व समाजकारण या मध्ये सक्रीय सहभाग घेतला. निवडणुकीपूर्वी बचत गटाच्या माध्यमातून अनेक उपक्रम राबविले. लोकांचा जनसंपर्क वाढला. विविध प्रश्न समोर आले व त्यांनी मिळालेल्या संधीचा समाजकार्यासाठी फायदा करून घेऊन परिसरातील प्राथमिक समस्यांवर लक्ष केंद्रित केले. यामध्ये त्यांचे पती कैलास महादेव दांगट यांनीही त्यांना मदत केली.

वारजे मधील काही भाग हा रहदारीचा आहे त्यामुळे त्याठिकाणी नेहमीच काही कारणांमुळे वाहतूक कोंडी होत असते. तसेच त्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची सोयही कमी प्रमाणात आहे. या समस्या निवारण करण्यासाठी भाग्यश्री दांगट प्रयत्नशील आहेत. त्याचबरोबर कचरा प्रश्न हा भेडसावत आहे व तो सोडविण्यासाठी त्याचे व्यवस्थापन करण्याचा प्रयत्न करत आहेत.

वारजेमधील गेली २० वर्षापासूनची परंपरा सांभाळत दुधाने लक्ष्मी यांनी त्यांचे चुलते - श्री. माणिक तुळशीराम दुधाने यांच्या सहकार्यामुळे राजकारणात प्रवेश केला. त्यांचे चुलते यांनी २००७ मध्ये अपक्ष म्हणून निवडणूक लढविली होती. परंतु त्यामध्ये त्यांना यश आले नाही. लक्ष्मी दुधाने यांनी चुतल्यांसोबत समाजकारण व राजेकारण यामध्ये सक्रीय सहभाग घेतला व प्रथम निवडणूक लढवून त्या मध्ये त्या विजयी झाल्या. लक्ष्मी दुधाने या वारकरी संप्रदायातील अहेत.

वारकरी संप्रदायात असताना त्यांनी विविध प्रकारे समाजकार्य केले. त्यामध्ये त्यांचे स्वत:चे विठ्ठल-रुक्मिणी महिला भजनी मंडळ आहे. बचत गट आहेत तसेच त्या ओंकार चॅरिटेबल ट्रस्टच्या अध्यक्षा आहेत. या सर्व कार्यातून त्यांचा जनतेचा संपर्क हा नेहमीच येत असतो.

लक्ष्मीबाई संत तुकाराम नागरी सहकारी पतसंस्थेच्या माजी संचालिका आहेत. त्यांनी शिक्षणासाठी व गरीबांना शिक्षण घेता यावे या दृष्टिकोनातून शाळा काढली आहे व त्या शाळेचे नाव संत तुकाराम प्रतिष्ठान असे आहे. जनतेला मनोभावे मंदिरात जावून पूजा-अर्चा करता यावी यासाठी ३००० स्वे. फूटमध्ये स्वत:चे असे विठ्ठल, रुक्मिणी मंदिर उभारले आहे.

त्यांच्या परिसरातील कचरा समस्या ही गंभीर स्वरूपाची आहे. व तो सोडविण्यासाठी त्या प्रयत्न करत आहेत. तसेच राजाराम पूल ते वारजे येथील प्रलंबित राहिलेला १०० फूट डी.पी. रोड पूर्ण करण्यात यावा यासाठी प्रयत्नशील आहेत.

महिलांचे प्रमाण वाढत आहे. पण बहुतांश महिला पतीच्या पाठिंब्यामुळे किंवा घरातून मिळालेल्या वारसामुळे राजकारणात येतात. सुरेखा मकवान या राजकारणात आल्या त्या

बचतगटामुळे! जिद्दीने आणि स्वबळावर त्यांनी विविध ठिकाणी बचत गट सुरू केले. वेगवेगळ्या स्तरातील महिलांना जोडून घेतले. सामाजिक कार्य हा एकच उद्देश डोळ्यासमोर ठेवून त्यांनी बचत गटाचा विचार केला.

बचतगटाच्या माध्यमातून जनसंपर्क वाढला, प्रभागातील अनेक महिला नागरिकांची इच्छा आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेवेने दिलेल्या संधीमुळे त्या महापालिकेच्या रिंगणात उरतल्या. प्रभाग क्र. ३२ अ मधून त्यांनी उमेदवारी अर्ज भरला. मतदारांनीही त्यांच्यावर विश्वास टाकला. त्यामुळे या निवडणुकीत विजयी झाल्या. याचे सारे श्रेय सुरेखाताई बचत गटाच्या माध्यमातून केलेल्या कार्याला देतात. बचत गटांमुळेच त्यांना सामाजिक कार्याची आवड लागली. ते कार्य त्या यापुढेही चालू ठेवणार आहेत.

महानगरपालिकेत नगरसेविकांचे प्रमाण जास्त आहे. जेव्हा सामाजिक प्रश्न पुढे येतील तेव्हा आम्ही सर्व महिला पक्ष भेद विसरून एकत्र येवू असेही त्या सांगतात. त्यांच्या प्रभागात वस्त्या, पाणी या दोन मुख्य समस्या आहेत. त्या सोडविण्याबरोबर कचरा व्यवस्थापन, आरोग्य सुविधा, महिला सक्षमीकरण, पालिका शाळांची अवस्था, उद्याने, रुग्णालय याकडे लक्ष देण्याचा त्यांनी संकल्प केला आहे.

**कोथरूड परिसर :**

महापालिका निवडणुकीत प्रभाग क्र. ३२ ब मधून शिवसेना पक्षाच्या देशपांडे संगिता या विजयी झाल्या आहेत. त्यांचे पती - श्री. शाम प्रभाकर देशपांडे हे गेली अनेक वर्षे राजकारण व समाजकार्य यामध्ये सक्रिय आहेत तसेच ते माजी नगरसेवक ही होते. संगिता ताई यांनी प्रथम निवडणूक लढविली होती. परंतु त्यांना यश आले नाही. संगिता देशपांडे यांनी पतीच्या कार्यात पूर्णपणे स्वत:ला झोकून देवून सहभागी झाल्या.

संगिता देशपांडे यांनी घरची जबाबदारी सांभाळत त्यांनी स्वत:ची समाजकार्याची आवड जपली. त्यांनी विविध मोर्चे, आंदोलने यामध्ये सहभाग घेऊन महिलांचे प्रश्न सोडविण्यासाठी विशेष प्रयत्न केले आहेत. ज्या परिसरात त्या निवडून आल्या त्या ठिकाणी महिलांना रोजगार मिळावा यासाठी प्रयत्नशील आहेत. वस्ती विभाग असल्याकारणामुळे त्या ठिकाणी स्वच्छतेला प्राधान्य देणार आहेत. तसेच सुलभ शौचालय बांधण्यासाठी प्रयत्न करत आहेत. त्याचबरोबर पालिका शाळा निर्मिती करण्याचा प्रस्ताव आहे.

भूगावमधील जि.प.च्या प्राथमिक शाळेत धडे गिरवतानाच थोरा-मोठयांच्या जयंत्यांना जोरदार भाषणे ठोकणाऱ्या मोनिका आत्ता पुणे महानगरपालिकेचे सभागृह दणाणून सोडणार आहेत.

इंगवलेच्या काँग्रेस-राष्ट्रवादीच्या संस्कृतीत वाढलेल्या मोनिका मोहोळ लग्नानंतर भाजपवासी झाल्या. कोथरूडच्या यशवंतराव चव्हाण - गुजरात कॉलनी या भागातून मोठ्या फरकाने निवडून आल्या.

भूगावचे नेतृत्व करणाऱ्या इंगवले कुटुंबात वाढताना वडील, काका व राजकीय क्षेत्रातील कार्यरत असलेल्या नातेवाईकांचे भाषणे व चर्चा ऐकताना त्यांच्यातील नेतृत्व गुणांचेही संवर्धन झाले. त्यामुळे शाळेत नेतृत्व करण्याची संधी सोडत नसत.

कबड्डी, खो-खो अशी मैदानी खेळांच्या आवडीतून संघ भावनेची जोपासना होत गेली. त्यातूनच मैत्रिणी जोडण्याचा छंद जोडला गेला. संस्कृती प्रतिष्ठाणच्या माध्यमातून माणसे जोडण्याचा छंद त्यांनी लग्नानंतरही जोपासला. ४०-५० मैत्रिणींशी भिशी चालविताना महिलांच्या अडचणींवर त्या काम करू लागल्या आणि हळदी-कुंकू समारंभाच्या निमित्ताने रामबाग कॉलनीच्या परिसरातील घराघरात पोहोचल्या. भाजपचे नेते मुरलीधर मोहोळ यांची पत्नी म्हणून एकत्र कुटुंबाची धुरा सांभाळतानाच आपल्यातील सामाजिक जाणीवही त्यांनी जिवंत ठेवल्या. भिशी -हळदी-कुंकू अशा कार्यक्रमातून भेटणाऱ्या अनेकांच्या अडचणी त्यांनी आपुलकीने सोडविल्या त्यामुळे प्रभागातील नागरिकांनी धडपडणाऱ्या या कार्यकर्तीला मोठ्या मनांची आघाडी देत विजयी केले. मतदारांनी दाखविलेला विश्वास सार्थ ठरविण्यासाठी आपण मनापासून प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

महापालिका निवडणूक लढवावी असा भारतीय जनता पक्षाने आग्रह धरला. संघ परिवाराने माझे नाव उचलून धरले. त्यामुळे त्या निवडणुकीला उभ्या राहिल्या. नगरसेवकांच्या कामाकडे माधुरी सहस्रबुद्धे या राजकारण म्हणून न पाहता समाजकारणाचा भाग म्हणूनच पाहतात. त्यांनी महाविद्यालयात निवडणूक लढविली होती. तो अनुभव त्यांना आता उपयोगी पडला होता. त्यांच्या प्रभागात कचरा आणि पाणी समस्याने नागरिक हैराण झाले आहेत. याचबरोबर टेकड्या, वृक्ष संपदा वाचविण्यासाठी काम करणार आहेत. या भागात रस्ते छोटे असल्याने मिनी बस असाव्यात यासाठी प्रयत्न करणार आहेत. पाईपलाईन द्वारे गॅसही योजना पोचवायची आहे. वस्तीत राहणाऱ्यांना अनेकांना खाजगी दवाखान्याचे शुल्क परवडत नाही. या नागरिकांसाठी प्रभागात महापालिकेचा दवाखाना असणे गरजेचे आहे. त्यासाठी त्या काम करणार आहेत.

आतापर्यंत लहान मुलांबरोबर काम केले आहे. मुलांना खेळायला मैदाने मिळाली पाहिजेत. मुलांमधील ऊर्जेला चांगली वाट न मिळाल्यास ते विघातक गोष्टीकडे वळतात. मुले भरपूर खेळली तरच मन, शरीराने सदृढ पिढी होऊशकते. प्रत्येक प्रभागात मुलांना एक क्रिडांगण हवे. पुणे चाईल्ड फ्रेंन्डली झाले पाहिजे. विकास करताना मुलांचा प्राधान्याने विचार झाला पाहिजे. रस्ता ओलांडणे,

शाळेत जाणे सुरक्षित झाले पाहिजे. मुलांची संख्या ४०% आहे त्याकडे लक्ष दिले पाहिजे असे त्यांनी सांगितले.

**कसबा पेठ परिसर :**

कसबा पेठ प्रभागात पाण्याचा प्रश्न आहे. त्याचबरोबर महिलांच्या सुरक्षिततेचा ही प्रश्न गंभीर आहे. या प्रश्नांकडे त्या प्रामुख्याने लक्ष देणार आहेत असे त्यांनी सांगितले. प्रभाग क्र. ३४ अ कसबा गणपती येथून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या उमेदवार डाखवे प्रथम विजयी झाल्या. ५०% महिला आरक्षण आणि मनसेकडून संधी मिळाल्याने निवडणुकीच्या रिंगणात उतरल्याचे डाखवे यांनी सांगितले.

गृहिणी असलेल्या डाखवे यांचे पती दिनेश डाखवे यांना समाजकार्याची आवड आहे. अनिता डाखवे यांचे शिक्षण बी.कॉम झाले असून त्यांनी संगणकाचेही प्रशिक्षण घेतले आहे. विजयाचे श्रेय त्या त्यांच्या पतीला देतात. डाखवे म्हणतात नगरसेविका झाल्याने आता अधिक व्यापक प्रमाणात समाजकार्य करता येईल. या संधीचा फायदा प्रभागातील अधिकाधिक महिला व ज्येष्ठ नागरिकांना कसा देता येईल यासाठी प्रयत्न करणार आहेत. प्रभागातील महिलांना प्रामुख्याने पाण्याची समस्या भेडसावत आहे. तो सोडविण्याबरोबर प्रभागातील ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्राची गरज आहे यासाठी प्रयत्न करणार आहेत.

गेली २५ वर्षे पती श्री. दिलीप विठ्ठल बहिरट राजकारण व समाजकार्य करत आहेत व त्यांचाच वारसाहक्क कल्पना बहिरट पुढे चालवत आहेत. कल्पना यांनी यापूर्वी दोनदा निवडणूक लढविली होती आणि आता त्यांनी तिसऱ्यांदा निवडणूक लढविली आहे. जिल्हा परिषद हा भाग नेहमीच रहदारीचा आहे कारण त्याच्याजवळच रेल्वे स्टेशन कलेक्टर कचेरी आहे. त्यामुळे त्याठिकाणी नेहमीच रहदारी असते व वाहतूक कोंडी देखील असते. पतीच्या कार्यात पाठिंबा देऊन त्यांनी समाजकार्य करण्यास सुरुवात केली. समाजकार्य करत असताना त्यांना अनेक समस्या दिसून आल्या व त्या दूर करण्यासाठी त्यांनी मनसेकडून निवडणूक लढविली व त्यात त्या विजयी झाल्या.

प्रभागातील परिसरातील लहान मुलांना खेळण्यासाठी पटांगण नाही, बचत गट साठी हॉल नाही. वीज ही नेहमीच खंडित झालेली असते. पावसामध्ये झाडेही उन्मळून पडलेली असतात. ड्रेनेज हे नेहमीच चॉकोप झालेले असते तसेच पाणी हीदेखील समस्या आहे. यासाठी त्या विशेष प्रयत्न करणार आहेत.

प्रभागामध्ये विविध नवीन अपार्टमेंट आहेत व त्यांच्याकडून मालमत्ता कर हा जास्त प्रमाणात होतो परंतु त्या ठिकाणी सोयी सुविधांचा अभाव असल्यामुळे तेथील नागरिकांमध्ये असंतोष निर्माण

होतो. तो कमी करण्यासाठी व सुधारणा करण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत.

दत्तवाडी, दांडेकर पूल या प्रभागातून भाजपच्या उमेदवार मनिषा घाटे या विजयी झाल्या. मनिषा घाटे यांचे दिर श्री. धीरज घाटे राजकारण व समाजकार्य करण्यात सक्रिय आहेत. त्यांनी प्रथम निवडणूक लढविली होती. पण त्यात त्यांना यश लाभले नाही. आता महिला आरक्षणाचा फायदा घेत त्यांनी पुन्हा निवडणूक लढविली व त्यात त्या त्यांच्या समाजकार्यामुळे निवडून आल्या.

त्यांच्या प्रभागात वाहतुकीची समस्याही प्रमुख समस्या आहे व ती सोडविण्यासाठी त्या प्रयत्नशील राहणार आहेत. तसेच महिलांचे प्राथमिक स्वरूपाचे प्रश्नही सोडविण्याचा प्रयत्न करणार आहेत. महिलांना पालिकेच्या विविध योजनांची माहिती सांगून त्यांचा फायदा महिलांसाठी कसा होईल याचाही विचार करून त्या जनतेपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न करणार आहेत.

देसाई वीटभट्टी हा भाग वस्तीचा भाग म्हणून ओळखला जातो. या ठिकाणी पालिकेतील निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या मनिषा बोडके या महिला गटातून निवडून आल्या. त्यांनी घरातील जबाबदारी सांभाळत समाजकार्य देखील सुरू केले. त्यासाठी त्यांना दीर - दीपक बाळासाहेब बोडके यांचे सहकार्य लाभले. दीपक बोडके हे गेली अनेक वर्ष राजकारण व समाजकार्य यामध्ये सक्रीय आहेत. निवडणुकीपूर्वी मनिषा घाटे या स्वत: बचत गट चालवत होत्या. त्यामुळे त्यांचा जनसंपर्क चांगलाच होता. याचाच विश्वास म्हणून त्यांना २०११-१२ च्या निवडणुकीत विजय मिळाला.

त्यांच्या परिसरात वस्तीचा काही भाग हा उतार असल्यामुळे पाणी व्यवस्थापन व्यवस्थित नाही, स्वच्छता ही कमी प्रमाणात आहे, (Toilets) व्यवस्था नव्हती तर त्यांनी ती व्यवस्था केली. ड्रेनेज लाईन ही खराब होती ती पूर्णपणे बदलली आहे. रोडवरून पाणी जात असल्यामुळे रोड हा नेहमी खराब होत असतो त्यासाठी ते रस्ता रुंदीकरणाचा प्रयत्न करणार आहेत. महिलांना बचत गटाच्या माध्यमातून विविध प्रशिक्षण व रोजगार मिळावा यासाठी प्रयत्न करणार आहेत.

उच्चशिक्षित मंडळी राजकारणात येत नाही. त्यामुळे मत नक्की कोणाला द्यावे, असा प्रश्न मतदारांना पडतो. मात्र द्विपदवीधर आणि एम.बी.ए. असे शिक्षण झालेल्या उमेदवाराला मत देण्याची संधी प्रभाग क्र. ५३ येथील नागरिकांना यंदाच्या महापालिका निवडणुकीत मिळाली. ती मंजुषा नागपुरे यांच्यामुळे भारतीय जनता पक्षामार्फत नागपुरे ११ हजार ४६४ मतांनी विजयी झाल्या.

हिंजवडी येथील एका आयटी कंपनीत एक्झिक्युटिव्ह असिस्टंट टू डीन या पदावर त्या कार्यरत होत्या. ३० जानेवारी हा त्यांच्या नोकरीचा शेवटचा दिवस ठरला. मात्र महिला संघटन अन अडचणीतील नागरिकांसाठी धावून जाताना माणसे जोडण्याचे काम त्या अनेक दिवस करत होत्या.

शिवसमर्थ प्रतिष्ठानच्या माध्यमातून महिला संघटन, नदीला पाणी सोडल्यास आनंदनगर येथील विस्थापित नागरिकांना धीर देणे, त्यांच्या स्वयंपाकाची जबाबदारी घेणे, महिलांना समुदपदेशन, जेष्ठांसाठी हेल्पलाईन, अनाथ मुलांसाठीचे कार्यक्रम यात त्यांचा सहभाग होताच. मात्र याचे श्रेय त्या त्यांच्या कुटुंबाला देतात.

समाजकारण करायचे असेल तर राजकारणाच्या भक्कम पायाची जोड त्याला हवी असे सांगत नागपुरे म्हणाल्या. कोणाचाही राजकीय वरदहस्त नाही. मात्र पतीचे काम माझेसाठी मोठी प्रेरणा होती. महिला सबलीकरण व युवक युवतींसाठी काम करायचे आहे. तरुणांना कामाची वेगळी दृष्टी असते. त्यामुळे त्यांचा सहभाग मोलाचा ठरतो.

पुणे महानगरपालिकेत वडगाव धायरी सनसिटी या प्रभागातून प्रथम लढवून आणि सर्वात कमी वयाची नगरसेविका होण्याचा मान मनसेच्या भारती चाकणकर यांना मिळाला आहे. त्यांची आई व वडील गेली २५ वर्षे शिवसेना पक्षाच्या माध्यमातून राजकारण व समाजकार्य यामध्ये सक्रिय आहेत. परंतु २००२ साली आई-प्रतिभा कुंडल यांना पराभव पत्करावा लागला आणि वडिलांना तिकीट मिळाले नाही. याचाच परिणाम म्हणून त्यांनी मनसेच्या माध्यमातून मुलीला उमेदवारी मिळाली व त्यांनी निवडणूक जिंकली. शिक्षण करत असताना समाजाबद्दलची जागृकता होती म्हणून का होईना त्यांनी निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला व त्यांच्या या निर्णयाला तेथील जनतेने सार्थ ठरविले.

निवडणुकीपूर्वी, वाहतूक कौंडी, पाणी समस्या, रस्ता या प्राथमिक स्वरूपाच्या समस्या होत्या. तसेच डी. पी. रोड होणे आवश्यक आहे. यासाठी त्या प्रयत्न करत आहेत. राजयोग सोसायटी मध्ये दवाखान्याचे काम चालू केले आहे. तो विशेष करून कर्करोगाचा दवाखाना होणार आहे. सनसिटी मधील भाजी मंडई रस्ता हा ताब्यात घेण्यासाठी व त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी प्रयत्न चालू केले आहेत. स्त्री-भ्रूण हत्या थांबविण्यासाठी जनजागृती अभियान सुरू करणार आहेत. अनधिकृत बांधकाम हटवून रस्ता रुंदीकरण करण्यासाठी प्रयत्न चालू आहेत. महानगरपालिकेच्या योजनांचा काम जनतेला कसा मिळेल यासाठी विशेष प्रयत्न करणार आहेत. महिलांसाठी व मुलींसाठी सांस्कृतिक कार्यक्रम सामाजिक कार्यक्रम यामधून प्रोत्साहन देवून त्यांची मानसिकता बदलविण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. त्याचबरोबर सर्व प्राथमिक स्वरूपाच्या गंभीर समस्यांचे निवारण करण्याचे प्रयत्न चालू आहेत.

सिंहगड इन्स्टिट्यूट, वडगाव या प्रभागातून महापालिका निवडणुकीत कुदळे संगीता या प्रतिनिधीत्व करणार आहेत. संगीता कुदळे यांचे शिक्षण जेमतेम नववीपर्यंत झाले आहे. परंतु

लग्नानंतर त्यांना समाजकार्याची आवड निर्माण झाली. याचे सर्व श्रेय त्या त्यांच्या पती श्री. अक्रुर बबनराव कुदळे यांना देतात कारण ते गेली अनेक वर्षे समाजकार्य व राजकारण यामध्ये सक्रीय आहेत. १९९५ साली वडगाव गावचे ते सरपंच म्हणून निवडून आले तर २००७ मध्ये नगरसेवक म्हणून कार्यरत होते.

निवडणूक लढविण्याअगोदर संगीता कुदळे यांचा त्यांच्या पतीच्या समाजकार्यात पूर्णपणे पाठिंबा होता व त्या स्वत: सहभागी होत्या. महिलांसाठी हळदी-कुंकू, गौरी-गणपती, सक्रांत या सणांच्या माध्यमातून जनसंपर्क देखील वाढविला होता. त्यांच्या प्रभागातील कचरा समस्या व वाहतुक कोंडी समस्या या प्रमुख समस्या आहेत त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी सतत प्रयत्न करणार आहेत.

पूणे महानगरपिकेत जनता वसाहत प्रभागातून कु. प्रिया गदादे या विजयी झाल्या आहेत. त्यांनी वाणिज्य शाखेतून पदवी प्राप्त केली आहे. त्यांची आई सौ. छायाताई गदादे पाटील या २००७-१२ या काळात नगरसेविका होत्या व वडील गेली अनेक वर्षे समाजकार्यात सक्रीय आहेत त्यामुळे समाजकार्याचे बाळकडू अगदी लहानपणापासून घरातच मिळाले होते. त्यांची आई या शिवसेना पक्षाच्या माध्यमातून कार्यरत होत्या.

महाविद्यालयात असताना सामाजिक प्रश्न समोर  येत होते व तो कशाप्रकरे सोडविता येतील यासाठी प्रयत्न सुरू केले व त्यांनी त्यांच्या आईंना निवडणुकीत उभे राहायचे आहे असे सांगितले. त्यानंतर त्यांनी मनसेची परीक्षा दिली व त्यांना उमेदवारी मिळाली.

निवडून आल्यानंतर विविध योजनांचा पाठपुरावा करण्याचा निर्णय त्यांनी घेतला आहे. बचत गटाच्या माध्यमातून महिलांना रोजगार व प्रशिक्षण देण्यासाठी विविध उपक्रम राबविण्याचा प्रयत्न आहे. वाहतूक व्यवस्था सोडविण्याचा प्रयत्न करणार आहेत.  जनता वसाहतमध्ये जे अनधिकृत बांधकाम आहे ते पाहून त्याठिकाणी जनतेसाठी दवाखाना, उद्यान बांधण्याचा त्यांचा मानस आहे. वस्त्यांमध्ये पाणी साचू नये यासाठी देखील त्या प्रयत्न करणार आहेत. यापैकी काही कामामध्ये सुधारणा सुरू झालेली आहे.

**धानोरी परिसर :**

रेखा टिंगरे या आता फक्त नगरसेविका नसून त्या स्थायी समिती सदस्या देखील आहेत. त्यांची ही दुसरी निवडणूक आहे व त्या विजयी देखील झाल्या आहेत. त्यांचे पती हे चंद्रकांत टिंगरे हे कमल foundation चे  अध्यक्ष असून समाजकार्य देखील करतात. तसेच त्यांचे दीर अनिल टिंगरे हे देखील पुणे महानगरपालिकेत नगरसेवक आहेत. तसेच रेखा टिंगरे या देखील २००७ सालच्या

माजी नगरसेविका देखील आहेत. युवती मंच अंतर्गत विविध कार्यक्रम व उपक्रम राबवितात.

त्यांच्या प्रभागातील रस्ता रुंदीकरणाचे काम करण्यासाठी विशेष प्रयत्न चालू केले आहेत. आधारकार्ड देखील पुरविले जाते. नियमित पाणीपुरवठा करण्यात यावा यासाठी प्रयत्न चालू केले आहेत. ख्रिश्चन व मुस्लिम समाजातील लोकांच्या दफन भूमी जागासाठी आरक्षित जमन द्यावी यासाठी विशेष प्रयत्न चालू केले आहेत तसेच निवृत्तधारक लोकांनी कष्टातून मिळविलेली जमीन आहे ती भूईसपाट करू नये व त्यांना घरे मिळावी यासाठी देखील विशेष प्रयत्न चालू केले आहेत. गुरूद्वारा संतनगर, दादाजी पडळ याठिकाणी रात्री-अपरात्री आठवड्याला एकदाच पाणीपुरवठा करण्यात येतो. त्याठिकाणी दररोज पाणीपुरवठा करण्यात यावा यासाठी ही प्रयत्न चालू केले आहेत. पीएमपीएमएलच्या बसेस ची संख्या वाढवावी यासाठी तरतूद करण्यात आली आहे. आणि कचरा व्यवस्थापनाचे काम हे रोजच्या रोज करण्यासाठी प्रयत्न करत आहेत.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे प्रभाग क्र. ५ अ मधून सविता साळुंके यांनी प्रथम निवडणूक लढविली आणि जिंकली. सविता यांनी त्यांचे पती अनिल साळुंके यांच्या समवेत समाजकार्य करत आपल्या कार्याची सुरुवात केली. यातून त्यांचा जनसंपर्क वाढला व बचत गट चालू केले. त्यांच्या विभागातील ड्रेनेज लाईन नवीन टाकली आहे. पाणीसमस्या ही कमी कमी करता येईल यासाठी विशेष प्रयत्न चालू केले आहेत. भीमनगर झोपडपट्टीत अस्वच्छता व आरोग्याच्या समस्या आहेत. तसेच शिक्षणाचा अभाव असल्यामुळे बचत गटाच्या माध्यमातून महिलांना शिक्षण देण्यासाठी विशेष प्रयत्न चालू केले आहेत.

प्रभाग क्र. १३ ब मधून राष्ट्रवादी काँग्रेसच्या रेश्मा भोसले या पुणे महानगरपालिकेत प्रतिनिधीत्व करणार आहेत. त्यांचे पती अनिल भोसले हे गेल्या १५ वर्षांपासून समाजकारणात व राजकारणात आहेत. रेश्मा या स्वत: गृहिणी असून निवडणूक लढविण्याअगोदर शेती व समाजकार्य करत असत. हळदी-कुंकू, सण-उत्सव यांच्या माध्यमातून त्यांनी जनसंपर्क साधला होता व विविध उपक्रम राबवून बचत गटाना सहाय्य केले आहे.

त्यांच्या प्रभागात अतिक्रमण व वाहतुक कोंडी या महत्त्वाच्या समस्या आहेत व त्या सुधारण्यासाठी पालिकेकडे निवेदन दिले आहे. तसेच पाटील इस्टेटच्या शेजारील जी झोपडपट्टी आहे त्या ठिकाणी सर्व मूलभूत सोयी-सुविधांचा अभाव आहे. त्यासाठी विशेष प्रयत्न चालू केले आहेत. बचत गटाच्या माध्यमातून महिलांचे आर्थिक सबलीकरण व्हावे यासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत.

नायडू रुग्णालय या विभागातून श्रीमती लताबाई राजगुरू या पुणे महानगरपालिकेत प्रतिनिधीत्व

करणार आहेत. या अगोदर त्यांनी तीन वेळेस निवडणूक लढली आहे. त्यामध्ये एका वेळेस यश प्राप्त झाले आहे. तर दोन वेळेस पराभव स्वीकारावा लागला आहे. ही त्यांची चौथी निवडणूक आहे. त्यांचे सासरे प्रभाकर जनार्दन दयाराम हे माजी आमदार आहेत.

तर पती माजी नगरसेवक व पीएमपीएमएलचे सदस्य तसेच नॅशनल बँकेचे अधिकारी होते.

त्यांच्या प्रभागातील त्यांनी ड्रेनेज लाईन पूर्ण बदलली आहे. पाण्याचे नळ घरोघरी पोहचविण्याचे काम पूर्ण केले आहे तसेच कैलास स्मशानभूमी चे काम सुरू केले आहे. नायडू रुग्णालय या ठिकाणी मेडिकल कॉलेज सुरू करण्यासाठी प्रयत्न चालू केले आहेत. त्याबरोबर झोपडपट्टी विभाग १ रेल्वे विभाग या ठिकाणी सोयी सुविधांचा अभाव आहे तो परिपूर्ण करावा यासाठी पाठपुरावा करण्यात येत आहे. संगम ब्रीजचे काम व्यवस्थितपणे करण्याचा प्रयत्न चालू झालेले आहेत.

पुणे महानगरपालिकेत काँग्रेसच्या मराठे वैशाली या किशीगंधानगर, शिवतीर्थनगर या प्रभागाचे प्रतिनिधित्व करणार आहेत. पाच वर्षापूर्वी (२००७) साली त्यांनी अपक्ष म्हणून निवडणूक लढविली होती परंतु त्यामध्ये त्यांना यश प्राप्त झाले नाही. परंतु २०१२ मध्ये दुसऱ्यांदा निवडणूक लढवून त्या विजयी झाल्या आहेत.

त्यांचे दीर - संजय नथुराम मराठे व पती राजेंद्र मराठे हे समाजकार्य व राजकारणात आहेत. यापूर्वी त्या पतींना त्यांच्या कामात सहकार्य करत असत.

किष्किंकधानगर, सुतारदार, सहयोगनगर या ठिकाणी पाणी वेळेवर नाही व पूर्ण दाबाने येत नाही तसेच एक दिवसा आड पाणी येते ही सर्वात महत्त्वाची समस्या आहे ती दूर करण्यासाठी विशेष प्रयत्न चालू केले आहेत. महिलांसाठी बचत गट चालू केले आहेत. बचत गटाच्या मिटींगला बसण्यासाठी महिलांना प्रोत्साहन दिले जाते. शिवर्तीर्थनगर, किष्किंधानगर या विभागात एकही मनपा शाळा एकच आहे दुसरी शाळा सुरू करण्यात यावी यासाठी निवेदन दिले आहे. तसेच शाळेतील मुलांना गणवेश व शालेय साहित्य वेळेवर मिळत नाही ते मिळावे यासाठी देखील प्रयत्न चालू केले आहेत. तसेच सुतारदरा, किष्किंधानगर येथील झोपडपट्टी विभागात सुविधांचा अभाव आहे यासाठी कामे चालू केली आहेत.

नोकरी करत असताना समाज कार्य करण्याची आवड निर्माण झाली व त्यासाठी त्यांनी त्यांचे पती विश्राम कुलकर्णी यांच्याबरोबर समाजकार्य करण्यास सुरुवात केली. त्यामुळे त्यांचा जनसंपर्क वाढला व त्यांनी विविध उपक्रम राबविण्यास सुरुवात केली. यामध्ये गौरी-गणपती सजावट, हळदी-कुंकू रक्तदान शिबिरे आयोजित केली. मेधा कुलकर्णी या प्रथम निवडणूक लढवून विजयी झाल्या आहेत.

सध्या त्यांनी नोकरील राजीनामा दिला आहे व पूर्ण वेळ समाजकार्य करत आहेत. त्यांच्या प्रभागातील कचरा समस्या व पाणी समस्या या महत्त्वपूर्ण समस्या आहेत. त्या कमी करण्यात यासाठी जनतेमध्ये जनजागृती करण्याचा प्रयत्न चालू केला आहे. ड्रेनजची पाईप लाईन बदलण्यासाठी पालिकेकडे निवेदन दिले आहे. तसेच मनपाचा दवाखाना चालू करावा यासाठीही विशेष प्रयत्न चालू केले आहेत. गरज असेल तेव्हा वेळोवेळी विविध मोर्चे व आंदोलने करण्याचा देखील मानस आहे.

नारायण पेठ, या प्रभागातून पुणे महानगर पालिकेत भाजपच्या मुक्ता टिळक या प्रतिनिधीत्व करणार आहेत. नगरसेवक पदाबरोबर त्या भाजप पक्षाच्या गटनेत्या म्हणूनही कार्यरत आहेत. शिक्षणाने परिपूर्ण असून ही त्यांनी नोकरी न करता समाजकार्य करण्याचा मार्ग स्वीकारला व समाजकार्य चालू केले. त्यांचे सासरे जयवंतराव टिळक हे गेली अनेक वर्षे राजकारणात आहेत. तसेच एकंदरीत असेही म्हणता येईल की परंपरेने त्यांची सर्वच पिढी राजकारणात आहेत. मुक्ता टिळक यांनी यापूर्वी २००२ व २००७ साली निवडणूक लढविली होती त्यातही त्या विजयी झाल्या होत्या.

त्यांच्या भागातील वाहतूक कोंडी ही सर्वात महत्त्वाची समस्या आहे. कारण रस्ते हे फारच अरुंद आहेत कचरा व्यवस्थापनाचे काम देखील चालू केले आहेत. त्याचबरोबर जुने वाड्यांचा प्रश्न नव्याने निर्माण झाला आहे. यासाठी पालिकेकडे निवेदन दिले आहे.

शिवसेना पक्षाच्या सोनम झेंडे या के.ई.एम. हॉस्पिटल प्रभागातून पुणे महानगर पालिकेत प्रतिनिधीत्व करणार आहेत. सोनम यांनी प्रथम निवडणूक लढविली आहे व त्या विजयी झाल्या आहेत. सोनम यांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी प्रथम मतदान हे स्वत:साठी केले आहे. त्यांचे पती- मयूर सुधाकर झेंडे हे गेली १३ वर्षे शिवसेना पक्षाच्या माध्यमातून कार्यरत आहेत व ते शाखाप्रमुखही आहेत. त्यांच्या सोबत सोनम यांनी देखील समाजकार्य करण्यास सुरुवात केली आहे.

ड्रेनेजची समस्या ही महत्त्वाची आहे. त्यामध्ये आता सुधारणा करण्यात आली आहे. काही ठिकाणी अर्धवट बांधकामाच्या बिल्डींग आहेत त्यांना टॅक्स tax न लावता ते काम Builder कडून पूर्ण करून घेतले आहे व (Complietion Certificate) देण्यात येत आहेत. आणि वेळेत जर पूर्ण नाही केले तर त्यांना ५,०००, १०,००० व १५,००० याप्रमाणे स्वे. फूटनुसार दंड आकारला जातो.

बचत गट चालू केले आहेत. बचत गटाच्या माध्यमातून शिव. वडा पाव केंद्र चालू करणार आहेत. तसेच दिवाळीसाठी ना नफा ना तोटा हा उद्देश ठेवून फराळ केंद्र चालू करण्याचा प्रयत्न आहे.

हरकानगर, राजेवाडी या प्रभागातून काँग्रेसच्या श्रीमती जिल्लेहुया खान या पुणे महानगर पालिकेत प्रतिनिधीत्च करणार आहेत.

त्यांचे शिक्षण दहावीपर्यंत झाले आहे परंतु समाजकार्याची आवड असल्यामुळे गेली २० वर्षापासून त्या त्यांचा भाऊ रशीद शेख यांच्या बरोबर समाजकार्य करत आहेत. जिल्लेह्युमा खान यांनी प्रथम निवडणूक लढविली आहे व त्यात त्या विजयी देखील झाल्या आहेत.

त्यांच्या प्रभागात ड्रेनेज व पाणी समस्या या महत्त्वाच्या समस्या आहेत व त्या सुधारण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले आहेत. बचत गट चालू केलेले आहेत. व त्यांच्या माध्यमातून महिलांचे सबलीकरण करण्याचे प्रयत्न चालू केला आहे.

डोके तालीम या प्रभागातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राजश्री आंदेकर या पुणे महानगरपालिकेत प्रतिनिधीत्व करणार आहेत. ज्यांचे शिक्षण जेमतेम ९ वी पर्यंत झाले आहे असे असूनही त्यांनी शिक्षणाची तमा न बाळगता समाजकार्य चालू केले. यामध्ये त्यांचे दीर उदयकांत राणोजी आंदेकर यांनी त्यांना मोलाचे सहकार्य केले. विविध उपक्रमांच्या माध्यमातून लोकसंघटन केले व समाजकार्य चालूच ठेवले. प्रथम निवडणूक लढवून त्या विजयी झाल्या आहेत. त्यांचे दीर ही सध्या नगरसेवक आहेत. डोके तालीम या ठिकाणी घरे अगदी लहान आहेत, रस्ते ही लहान आहेत, त्यांचे रुंदीकरण करण्यासाठी निवेदन केले आहे. त्याचबरोबर पाणी व स्वच्छता या समस्यांकडेही विशेष करून लक्ष देण्यात येत आहे.

पुणे महानगरपालिकेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या मोमीन हीना या प्रभाग क्र. ६०अ मधून प्रतिनिधीत्व करत आहेत. त्यांचे शिक्षण १२ वी असून त्यांनी (camp edcuation society) येथून प्राथमिक शिक्षण घेतले आहे तर ११ वी १२ वी चे शिक्षण वाडिया कॉलेजमधून घेतले आहे. यापूर्वी त्यांनी गृहिणी म्हणून कार्य करत असताना समाजकार्य सुरू केले आहेत. प्रथम निवडणूक लढवून त्या विजयी झाल्या आहेत. त्यांचे भाऊ श्री भारत दत्तात्रय कांबळे यानी २००७ ला निवडणूक लढविली होती परंतु त्यांना यश आले नाही. तसेच त्यांनी विद्यार्थी संघटनेचे काम देखील केले आहे.

मोमीन हिना यांनी त्यांच्या भाऊ यांच्या कार्यात मोलाचे सहकार्य केले आहे. त्यांच्या प्रभागात अतिक्रमण, दारू अड्डा, मटका, जुगार या महत्त्वाच्या समस्या आहेत. तसेच लहान मुले ही जास्त प्रमाणावर व्यसनाधिन आहेत त्यासाठी (Additional Commishner) यांची भेट घेऊन त्यांच्यासाठी उपाययोजना चालू करणार आहेत व पालिकेतही निवेदन दिले आहे. झोपडपट्टी विभागातील एजंटगिरी बंद करून प्रशासन व नागरिक यांच्यामध्ये दुवा साधला आहे. मुस्लिम

महिलांमध्ये शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी त्यांना शिक्षण देण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. तसेच पडदा पद्धत बंद करून त्यांना स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठीही प्रयत्न चालू आहेत. याचबरोबर मूलभूत गरजा उदा. पाणी, ड्रेनेज, रस्ता शिक्षण, लाईट या सर्व सुखसोयी सर्वांना देता येतील यासाठी प्रयत्न केलेले आहेत.

**कोंढवा परिसर :**

सहकारी बँकेतील नोकरी सांभाळत नंदा लोणकर आता महापालिकेत पोचल्या आहेत. नगरसेवक होण्याची त्यांची गेल्या १५ वर्षांपासूनची इच्छा यंदा पूर्ण झाली. त्यासाठी त्यांनी सहा महिने रजा घेवून निवडणुकीची तयारी केली होती.

राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे नंदा लोणकर या वानवडी शिंदे छत्री प्रभागातून नुकत्याच निवडून आल्या. शारदा सहकारी बँकेच्या सातारा शाखेत त्या काम करत होत्या. या बँकेत १९८८ पासून त्या कार्यरत असून सदाशिव पेठ, बिबवेवाडी, सातारा रोड आदी शाखांमधून लिपिक म्हणून काम करता करता त्या आता अधिकारी झाल्या आहेत. थोरला मुलगा अभियंत्रिकीच्या पदवीचे शिक्षण घेत असून धाकटा मुलगा यंदा १२ वीत आहे.

वाणिज्य शाखेची पदवी घेतलेल्या नंदा लोणकर यांना समाजकारणाचे बाळकडू वडील बाबासाहेब लोणकर यांच्याकडून मिळाले. लग्नानंतर पती नारायण लोणकर हे देखील समाजकारणात सक्रीय आहेत. शिक्षण मंडळ, पीएमपीएमएल आदी समित्यांवर काम करण्याची संधी त्यांना मिळाली. त्यामुळे सक्रीय राजकारणात जायचे हे त्यांनी पूर्वीपासूनच ठरविले होते. मात्र महिलांना मिळणारी मर्यादित संधी प्रभाग आरक्षण यांच्या अडचणी समोर होत्या. प्रभाग निश्चित झाल्यावर निवडणूक लढविण्याचा निर्णय त्यांनी घेतला. उपनगरांचा विकास याबाबत काही कल्पना आहेत त्या साकारण्याची संधी राष्ट्रवादी काँग्रेसकडून मिळाली याचा आनंद होत असल्याचे त्या सांगतात.

पुणे महानगरपालिकेत मनसे पक्षाच्या संगीता ठोसर या नुकत्यास निवडूक आल्या आहेत. त्या प्रभाग क्रमांक ६२ ब (कोंढवा बु.) चे प्रतिनिधीत्व करणार आहेत. त्यांचे पती राजेंद्र ठोसर व पुतणे - प्रवीण बाळासाहेब ठोसर हे पूर्वीपासून समजकार्यात सक्रीय आहेत. त्यांच्याच सोबतीने संगीता ठोसर हे गेली १५ वर्षापासून समाजकार्यात सक्रीय आहेत. यापूर्वी त्यांनी बचत गटाच्या माध्यमातून समाजकार्य केले आहे. त्यांची ही प्रथम निवडणूक आहे व त्यात त्या विजयी झाल्या आहेत.

त्यांच्या विभागात रस्ता ठीक करण्याचे काम चालू केले आहे. कात्रज-कोंढवा रोडवर जी स्मशानभूमी आहे ती बाजूला घेण्यासाठी व त्याच्या जागेसाठी निवेदन सादर केले आहे. पाण्याची

सुविधा पूर्ण व्यवस्थित केली आहे. तसेच ड्रेनेजचे चोकोप हे होत राहतात ते होऊ नये म्हणून पाईप लाईन बदलण्यासाठी विशेष प्रयत्न चालू केले आहेत.

बचत गटाच्या माध्यमातून महिलांसाठी विविध व्यवसायांची माहिती सांगणे. त्याचे प्रशिक्षण देणे व आर्थिक मदत करून त्यांनी व्यवसाय सुरू करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते व यातून महिलांचे सबलीकरण करणे हाच महत्त्वाचा उद्देश आहे असे त्यांनी सांगितले.

कोंढवा प्रभागातून निवडणूकीतून आता पदावर आले असले तरी सामाजिक कार्य चार वर्षापासून  करत आहेत. त्यामुळे आता नगरसेविका झाल्या असल्या तरी मुख्य तर सामाजिक कार्यांवरच राहणार आहे. या प्रभागात पाणी, कचरा, रस्ता हे तीन मुख्य प्रश्न आहेत. त्याचबरोबर काही लोकांकडे अजून विजेचाही प्रश्न आहे. कचऱ्याचा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने तीन-चार महिन्यांपूर्वी घंटागाडी सुरू होण्यासाठी प्रयत्न केले आणि गाडी सुरू केली. जेष्ठ महिलांनाही अनेक प्रश्न असतात. विशेषत: आर्थिक परिस्थिती बिकट असलेल्या महिलांना अधिक प्रश्न भेडसावतात. त्यामुळे वयाने ६० वर्षापेक्षा अधिक ५१ महिलांसाठी पेन्शन प्लॅन वर्षभरापूर्वी सुरू केला आहे. त्यातून महिलांना दर महिना ५०० रु मिळतात. महिला, मुली, तरुण यांना स्वयंरोजगार मिळावा यासाठी केंद्रात वेगवेगळे अभ्यासक्रम शिकविले जातात.

स्वयंरोजगार, शिवणक्लास, पार्लर, मेहंदी, रांगोळी, संगणक बेसिक कोर्स आदी शिकविले जातात. या प्रभागात ४०% मुस्लिम समाजाचे नागरिक आहे. त्यांच्यासाठी ऊर्दू शाळेची गरज आहे. त्याचबरोबर कब्रस्तान बांधायचे आहे. तसेच वाद टाळून कामाकडे जास्त लक्ष देणार आहेत.

आरती बाबर यांनी प्रथमच निवडणूक लढविली आहे व त्या विजयी झाल्या आहेत. त्यांचे पती राजकारणात नाहीत परंतु त्यांचे दिर महादेव बाबर हे राजकारण व समाजकार्यात आहेत.

प्रभाग क्र. ६४ ब मधून सॅलेसबरी पार्क मधून कविता वैरागे या पुणे महानगरपालिका प्रतिनिधीत्व करणार आहेत. त्यांनी २००७ साली प्रथम निवडणूक लढविली होती. परंतु त्यात त्यांना यश आले नाही तरीदेखील त्यांनी समाजकार्य चालूच ठेवले. त्यांची ही दुसरी निवडणूक लढविली व त्यात त्या विजयी झाल्या. त्यांचे पती भारत वैरागे हे समाजकार्यात आहेत.

त्यांच्या प्रभागात अतिक्रमण, वाहतूक कोंडी, रस्ता रुंदीकरण, झोपडपट्टी विभागातील आरोग्य व स्वच्छता  या समस्या आहेत. महिलांसाठी प्रशिक्षण केंद्र निर्माण करून त्यांचे सबलीकरण करण्याचा प्रयत्न आहे. रस्ता रुंदीकरण करण्यासाठी पालिकेत निवेदन दिले आहे.

कमल व्यवहारे यांचे नाव घेताच सर्वांना जिजाई प्रतिष्ठान आठवते. जिजाई प्रतिष्ठान मध्ये कम्प्यूटरचे क्लासेस चालविले जातात. तसेच पार्लर चालविले जाते.

खाद्यपदार्थाचे स्टॉल लावले जातात व महिलांसाठी रोजगार उपलब्ध करून देतात. २००२ साली कमलताई या महापौर होत्या तर २००७ साली देखील त्या नगरसेवक होत्या. जिजाऊ प्रतिष्ठानच्या माध्यमातून त्या महिलांचे सबलीकरण करण्यासाठी प्रयत्न करतात.

त्यांच्या प्रभागात विजेची समस्या ही प्रथम समस्या आहे. loadshading कमी व्हावेत यासाठी लेखी निवेदन पालिकेकडे दिले आहे. पाणी हे देखील वेळेवर येत नाही ते नियमित व पूर्ण दाबाने यावे यासाठी ते प्रयत्न करत आहेत. महिलांसाठी स्वच्छता गृहे निर्माण करण्यासाठी देखील प्रयत्नशील आहेत.

गोखले हॉल, मंडई या प्रभागातून रुपाली पाटील या पुणे महानगरपालिकेत प्रतिनिधीत्व करणार आहेत. त्यांची ही प्रथम निवडणूक आहे व त्या विजयी झाल्या आहेत. त्यांचे पती श्री चंद्रशेखर ठोंबरे हे देखील समाजकार्य व राजकारणात आहेत. त्यांच्या विभागात वाहतूक कोंडी ही मुख्य समस्या आहे ती सुधारण्यासाठी मंडई रस्ता हा चौपदरीकरण करण्यासाठी प्रयत्न चालू आहेत. त्याचबरोबर भावी काळात महिलांसाठी शिक्षण देऊन त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी प्रयत्न करणार आहेत. वकिली व्यवसाय करत करत त्यांनी समस्या जाणून घेतल्या व तो सोडविण्यासाठीही समाजकार्यात पदार्पण केले.

घोरपडी गाव हा प्रभाग कवडेवाडी म्हणून देखील ओळखला जातो कारण या ठिकाणी बहुतांश रहिवासी हे कवडे आहेत. नगरसेविका सुरेखा कवडे यांनीही प्रथम निवडणूक लढविली आहे. त्यांचे पती चंद्रकांत कवडे हे देखील समाजकार्य व राजकारण करतात. निवडणूक लढविण्याअगोदर सुरेखा कवडे ह्या त्यांचे पती चंद्रकांत कवडे यांना सहकार्य करत असत. बचत गटाच्या माध्यमातून महिलांना आर्थिक रोजगार उपलब्ध करून देत असत. यातूनच त्यांचा जनसंपर्क वाढला.

सोपानबाग येथील समस्या म्हणजे पाणी व कचरा व्यवस्थापन आहे त्यासाठी घंटागाडी (कचरा व्यवस्थापक) सुरू करण्यात आलेली आहे. पाणी वेळेवर व नियमित यावे यासाठी पालिकेकडे निवेदने दिली आहेत. तसेच वाहतुक कोंडीही देखील नेहमी असते यासाठी रस्त्यावरील पदपथारी व दुकानदार यांना नवीन जागा देण्यासाठी प्रयत्न चालू आहेत. घोरपडीगाव ते काळूबाई मंदिर पर्यंतचा रस्ता हा पूल बांधून व्यवस्थित करण्यात आला आहे व यापुढेही नवीन योजना राबविण्याचा विचार आहे.

**हडपसर परिसर :**

हडपसर प्रभागातील वैदुवाडी हा भाग विशेष करून झोपडपट्टी वसाहत व किर्लोस्कर कंपनी त्याचबरोबर भारत फोर्स कंपनी म्हणून देखील ओळखला जातो. या प्रभागातून विजया कापरे ह्या

पुणे महानगर पालिकेत प्रतिनिधीत्व करणार आहेत. त्यांनी ही प्रथमच निवडणूक लढविली आहे. त्यांचे पती श्री हनुमंत कापरे हे गेली अनेक वर्षे समाजकार्य व राजकारण करत आहेत.

वैदुवाडी येथील प्रमुख समस्या ही झोपडपट्टी वसाहत येथे आहे. त्याठिकाणी आरोग्य व स्वच्छात या समस्या प्रमुख आहे. वेळेवर पाणी न येणे. दवाखाना नसणे या सर्व समस्यामुळे तेथील नागरिकांचे बरेचसे हाल होत आहते यासाठी सध्या पाठपुरावा केला जात आहे. त्याचबरोबर येथील लहानमुले ही व्यसनाधिन आहेत. मगरपट्टा येथील अण्णासाहेब मगर दवाखान याचे नुतनीकरण करण्यात आले आहे. महिलांना व मुलींना शिक्षण मिळावे यासाठी पुणे मनपाची नवीन शाळा सुरू करण्यासाठी निवेदन दिले आहे. शंकरमठ येथील अनाधिकृत बांधकामे पाहून तेथील लोकांना घरे मिळवून देण्यासाठी प्रयत्न चालू केले आहेत. व सध्या असलेली मनपा शाळेचे नुतनीकरण केले आहे.

आकाशवाणी साधना विद्यालय या प्रभागातून रंजना पवार या प्रतिनिधीत्व करणार आहेत. रंजना यांनी प्रथम निवडणूक लढवून त्या विजयी झाल्या आहेत. त्यांचे पती श्री शिवाजी पवार हे समाजकार्य करतात. त्याचबरोबर इतर व्यवसाय ही करतात. रंजना यांनी गृहिणी असून देखील समाजकार्य सुरू ठेवले कारण त्यांनी त्याची आवड होती व नगरसेविका होण्याची इच्छा होती.

सर्व्हे नं. १५ या ठिकाणी सर्वात पहिली समस्या आहे की वाहतूक कोंडी, सोलापूर रोड असल्यामुळे तसेच मांजरीला जाण्यासाठी रोड असल्याकारणामुळे वाहतूक कोंडी ही होते. त्या ठिकाणी प्रथम पोलिस यंत्रणा नव्हती ती आता बसविण्यात आली आहे. आकाशवाणी या ठिकाणी पीएमपीएलचा बसथांबा नव्याने उभारला आहे व रस्त्याच्या कडेला जड वजनाची वाहने यांना थांबण्यास मनाई केली आहे. डवरीनगर या झोपडपट्टी किंवा वसाहतीमध्ये स्वच्छता अभियान राबविले आहे. तसेच घंटागाडी देखील सुरू करण्यात आली आहे. कॅनालमध्ये कचरा व इतर वस्तू टाकून प्रदूषण होऊ नये म्हणून कॅनालच्या बाजूने संरक्षण जाळी बसविण्यात आली आहे.

वानवडी, रामटेकडी या प्रभागातून कविता शिवरकर या पुणे महानगरपालिकेत प्रतिनिधीत्व करणार आहेत. त्यांनी प्रथम निवडणूक लढविली व विजयी झाल्या आहेत. त्यांचे पती श्री चंद्रकांत शिवरकर हे गेली अनेक वर्षे राजकारण व समाजकार्य करत आहेत. कविता यांनी आपल्या कार्यास बचत गटाच्या माध्यमातून सुरुवात केली व जनसंपर्क वाढविला.त्यातूनच त्यांनी महिलांच्या समस्या व अडचणी जाणून घेण्यास सुरुवात केली. प्रथम त्यांनी महिलांसाठी शिक्षण देण्यासाठी सर्व शिक्षा अभियान चालू केले. वानवडी परिसरातील विकासकामे ही अपूर्ण होती ती पूर्णत्वाला नेली. ई-दाखले देण्यासाठी नवीन केंद्र चालू केले व लोकांना मदत केली. शिवरकर उद्यान हे व्यवस्थितपणे

केले आहे. की जेणेकरून लहान मुलांना व्यवस्थित जाता येते , विविध सोयी सुविधा त्या ठिकाणी निर्माण केल्या.

महंमदवाडी व काळेपडळ या प्रभगातून विजया वाडकर या प्रतिनिधीत्व करणार आहेत. त्यांनी दुसऱ्यांदा निवडणूक लढविली व त्या विजयी झाल्या आहेत. त्यांनी प्रथम निवडणूक २००२ साली लढविली होती. परंतु त्यात त्यांना यश प्राप्त झाले नाही. त्यांचे पती पोपट वाडकर हे समाजकार्यात आहेत. त्यांनी त्यांच्या पतीसोबत समाजकार्य करण्यास सुरुवात केली.

त्यांच्या प्रभागात पाणी समस्या ही सर्वात प्रथम व महत्त्वाची आहे. पाणी हे वेळेवर व नियमित येत नव्हते ते वेळेवर व नियमित पणे येण्यासाठी पालिकेकडे निवेदन देवून त्याचा पाठपुरावा करण्यात आला आहे. हडपसर गावात ट्रॅफिक सिग्नल बसवून वाहतूक कोंडी कमी करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच रिक्षा व्यावसायिकांना रिक्षा स्टॅन्ड निर्माण करून दिले आहे. काळेपडल ते महंमदवाडी पर्यंतचा रस्ता हा डांबरीकरण करण्यात आले आहे.

उषा कळमकर यांनी बचत गटाच्या माध्यमातून समाजकार्याला सुरुवात केली व आज त्या पुणे महानगर पालिकेत नगरसेविका म्हणून करत आहेत. त्यांनी प्रथम निवडणूक लढवून यशस्वी झाल्या आहेत.त्यांचे पती राजकारणात होते. त्यांच्या प्रभागात प्रमुख समस्या म्हणजे विजेची आहे. या प्रभागात विजेचे (loadshading) हे वारंवार होत राहते. त्यामुळे त्यावर पर्यायी मार्ग काय करता येईल याचा विचार करून लोकांमध्ये जनजागृती मोहीम राबविली. विजेची बचत करण्यासाठी पथनाट्याच्या माध्यमातून मोहीम राबविली. तसेच बस सुविधा वाढविल्या, बसथांब्याची नवीन मांडणी केली. पाणी हे वेळेवर व नियमित यावे यासाठी त्यांनी प्रयत्न केले. सांडपाण्याची सुधारणा केली.

**खराडी परिसर :**

वडगाव शेरी या प्रभागातून सौ. सुनिता गलांडे या नव्याने विजयी झालेल्या पुणे महानगरपालिकेत प्रतिनिधीत्व करणार आहेत. घरातूनच त्यांनी समाजकार्य करण्यास सुरुवात केली. निवडणूकपूर्वी त्यांनी अनेक उपक्रम व कार्यक्रम राबविले व लोकांचे संघटन केले. त्यांचे पती मारुती चंद्रकांत गंलाडे हे राजकारण व समाजकार्य करतात. लग्नानंतर गृहिणी म्हणून घर सांभाळत असतात. समाजकार्याची आवड असल्यामुळे समाजकार्यात सहभाग घेतला व समाज कार्य करण्यास सुरुवात केली.

स्वत:च्या प्रभागातील वीजसमस्या व पाणी समस्या वेळेवर पूर्ण करण्यासाठी त्यांनी वारंवार आपल्या मागण्या पालिकेवर सादर केल्या व त्याचा पाठपुरावा केला. तसेच माजी सैनिकांना सर्व

सोयी सुविधा मिळाव्यात यासाठी वेळोवेळी प्रयत्न केले. विधवांसाठी पेन्शन योजना चालू केली. मुलींना विविध कोर्सेस मोफत चालू केले.

सुमन पठारे यांनी प्रथम निवडणूक लढविली व त्या विजयी झाल्या आहेत. त्यांचे पती बाळासाहेब पठारे व जाऊ संजिला पठारे (नगरसेवक) हे समाजकार्य व राजकारण करत आहेत. तसेच रेखा टिंगरे (नातेवाईक व नगरसेविका) त्या देखील अनेक वर्षे राजकारणात आहेत.

त्यांच्या प्रभागातून वारंवार एकच समस्या आहे ती म्हणजे रस्ता व वाहतूक कोंडी, ती समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न चालू केले आहेत. महिलांसाठी व मुलींसाठी रांगोळी, मेहंदी, पार्लर, इ. कोर्सेस चालू केले आहेत व त्यांना प्रशिक्षण दिले जाते.

प्रभाग क्र. २३ ब या विभागातून संगीता तिकोने या पुणे महानगरपालिकेत प्रतिनिधीत्व करणार आहेत. त्यांची ही प्रथम निवडणूक आहे व त्या विजयी झाल्या आहेत. त्यांचे पती राहूल तिकोने समाजकार्य व राजकारण करतात. निवडणूक लढविल्या अगोदर संगीता बचत गट चालवत होत्या. विविध मोर्चे, आंदोलने यामध्ये सहभागी होत होत्या. व आपले समाजकार्य करत होत्या. याच्या माध्यमातूनही त्यांचा जनसंपर्क वाढला व जनसंघटन झाले. नंतर हळूहळू पती सोबत समाज राजकारणात सहभाग घेऊ लागल्या. त्यांनी रक्तदान शिबिरे आयोजित करून युवकांमध्ये जनजागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला. कसबा पेठेतील मानाचा गुरुजी तालीम मंडळ गणपती आहे. त्या मंडळाला दरवर्षी देणगी देऊन ती देणगी गरीब व गरजू लोकांना वाटण्यासाठी सांगतात. पोलीस यंत्रणा अधिक सक्षम व्हावी म्हणून पोलीस चौकीचेही नुतनीकरण केले. पती राहूल तिकोने यांच्या मदतीने वाहतूक कोंडी व कचरा समस्या या वरती पर्याय काढण्यासाठी पालिकेत निवेदन सादर केले.

**वनाज कंपनी परिसर :**

वनाज कंपनी प्रभागातून जयश्री मारणे या प्रतिनिधीत्व करणार आहेत. त्यांची ही प्रथम निवडणूक आहे व त्यात त्या विजयी झाल्या आहेत. त्यांचे पती गजानन मारणे हे समाजकार्य व राजकारणात आहेत.

शास्त्रीनगर हा भाग झोपडपट्टी व वस्त्यांचा भाग म्हणून ओळखला जातो. त्याचबरोबर वनाज कंपनी मुळेही महत्त्व आले आहे. या प्रभागात पूर्वी सोयी-सुविधाचा अभाव होता. पण त्या आता काही प्रमाणात पूर्ण झाल्या आहेत. निवडणुकीपूर्वी या पतीच्या कार्यात सहभागी होत्या व त्यांना सहकार्य करत होत्या. परमहंसनगर मध्ये पाण्याची व ड्रेनेजची पाईपलाईन बदलली आहे. वेळोवेळी जनतेच्या समस्या जाणून घेण्यासाठी फिरते जनसंपर्क केंद्र चालू करण्याचा विचार आहे.

प्रतिभा ढमाले यांचे शिक्षण बी.कॉम झाले असून त्यांची ही प्रथम निवडणूक आहे व त्या मामलेदार कचेरी या प्रभागातून पुणे महानगरपालिकेत प्रतिनिधीत्व करणार आहेत. त्यांचा स्वत:चा कपडे विक्रीचा व्यवसाय असून त्या त्याचबरोबर समाजकार्य देखील करतात. त्यांच्या माहेरी त्यांचे काका व काकू राजकारणात व समाजकार्यात आहेत.

त्यांच्या प्रभागातील जवळजवळ सर्वच समस्यांचे निवारण केले आहे. परंतु सध्या भेडसावणारी एकच समस्या आहे. ती म्हणजे पाणी समस्या. पाणी हे वेळेवर व नियमित येत नाही. कमी दाबाने पाणी येते व काही भागात सकाळी लवकर पाणी जाते. यासाठी त्यांनी आंदोलने व मोर्चे काढून त्याच पाठपुरावा करण्याचा प्रयत्न केला आहे.

मार्केटयार्ड प्रभागातून भारतीय जनता पक्षाच्या सौ. मनिषा चोरबेले या पुणे महानगरपालिकेत प्रतिनिधीत्व करणार आहेत. त्यांनी प्रथम निवडणूक लढविली आहे आणि त्यामध्ये त्या विजयी झाल्या आहेत. त्यांचे पती-श्री. प्रवीण माणिकचंद चोरबेले हे शिक्षण मंडळ सदस्य पुणे मनपा असून समाजकार्य व राजकारणातआहेत. मनिषा निवडणूक लढविण्याअगोदर पती समवेत त्यांच्या समाज कार्यात सहभाग घेत होत्या. सादरीक ग्रुप त्या चालवत असत व त्याच्या माध्यमातून महिलांसाठी आर्थिक धोरणे राबवत असत. Geo International Government group of Women याच्या त्या सदस्य होत्या. तर सत्य साधना महिला मंडळाच्या अध्यक्षा म्हणून कार्यभार सांभाळत होत्या.

त्यांच्या प्रभागात झोपडपट्टी वस्ती आहे त्या ठिकाणी साफ, सफाई, पाणी, ड्रेनेस लाईन इ. समस्या आहेत. त्यांचा पाठपुरावा त्यांनी केला आहे. पाणी वेळेवर व नियमित चालू केले आहे. ड्रेनेज लाईनचे पाईप बदलले आहेत. त्याचबरोबर पूरग्रस्त लोकांची पुनर्वसन केले आहे. परंतु त्यांची स्वत:च्या नावावर घरे होत नाही ती व्हावीत यासाठी पालिकेकडे निवदेन दिले आहे. कचरा व्यवस्थापनासाठी घंटागाडी सुरू करण्याचे प्रयत्न केले आहेत. तसेच बचत गट चालू केले आहेत.

शिवदर्शन, अरणेश्वर या ठिकाणी सौ. कदम अश्विनी या विजयी झाल्या आहेत. त्यांची ही दुसरी निवडणूक आहे. २००७ साली त्यांनी निवडणूक लढविली होती. परंतु त्यात त्यांना यश झाले नाही. २०११-१२ लाही एकाही पक्षाचे तिकीट न मिळाल्याने त्यांनी अपेक्ष म्हणून निवडणूक लढविली व विजयी झाल्या. त्या आता पुणे महानगरपालिकेत प्रतिनिधीत्व करणार आहेत व आर्थिक हिशोब लावणार आहेत. त्यांचे पती नितीन कदम हे गेली अनेक वर्षे राजकारणात आहेत. अश्विनी निवडणूक लढविण्यापूर्वी एका सहकारी बँकेत नोकरी करत होत्या. परंतु आता त्या नगरसेविका म्हणून कार्य करत आहेत. बॅकेत काम करत असताना नवीन नवीन योजना महिलांना

सांगत असत. स्वत:चे बचत गट चालवत असत यातूनच त्यांचा जनसंपर्क वाढला.

त्यांच्या प्रभागात पाणी समस्या ही फार बिकट व महत्त्वाची समस्या आहे. पाणी हे कमी दाबाने येते त्याचबरोबर त्याचा पुरवठा ही नियमित व वेळेवर होत नाही त्यामुळे नागरिक नेहमीच त्रस्त असतात. यासाठी त्यांनी पाणी फुल प्रेशरने द्यावे व वेळेवर द्यावे असे पालिकेकडे निवेदन केले आहे व त्यासाठी प्रयत्न चालू केले आहेत. त्याचबरोबर पूर आल्यावर पुराचे पाणी लोकांच्या घरात घुसते व नुकसान होते. त्यानंतर त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी नवीन घरे बांधून दिली जातात. तसेच त्यांच्या आवश्यक त्या गोष्टी पुरविल्या जातात. महिलांसाठी बचत गटाच्या माध्यमातून पार्लर, रांगोळी, मेहंदी असे विविध प्रकारचे कोर्सेस कमी दरात व माफक दरात उपलब्ध करून दिली जातात. व त्यांचे आर्थिक सादरीकरण करण्याचा विचार केला जातो.

महात्मा गांधी सोसायटी, सहकारनगर या प्रभागाचे वैशिष्ट्य म्हणजे पूर्वी हा भाग अतिशय दयनीय अवस्थेत ओळखला जायचे. रस्ते, पाणी, वीज व शिक्षण या समस्या त्या ठिकाणी कायमच असायच्या. परंतु २००२ पासून यामध्ये बदल झाला आहे. कारण आहे. सौ. उषा जगताप व त्यांचे पती श्री. सुभाष दिगंबर जगताप.

सुभाष जगताप हे माजी नगरसेवक होते आणि सध्याही नगरसेवक आहेत. त्यांच्या पत्नी उषा जगताप या देखील २००७ साली नगरसेविका होत्या. त्यांची ही तिसरी निवडणूक आहे. २००२ साली त्यांनी निवडणूक लढविली होती परंतु त्यात त्यांना यश प्राप्त झाले नाही. त्यांनी त्यांचे पती सुभाष जगताप यांच्या सोबत समाजकार्याला सुरुवात केली आहे.

नगरसेविका झाल्यानंतर त्यांनी रस्ते डांबरीकरण केले. पाणी समस्या आहे त्यावर सुधारणा केली आहे. (e-learning) सेवा सुरू करून दाखले दिले जातात. झोपडपट्टी भागातील लोकांचे पुनर्वसन केले आहे. तळजाई झोपडपट्टीतील आरोग्य व सोयी सुविधांचा पाठपुरावा केला आहे. बचत गट चालू केले आहेत व त्यामार्फत स्टॉल लावले जातात व स्त्रियांचे सबलीकरण केले जाते. वि. स. खांडेकर शाळा काढली आहे. या शाळेमार्फत महिलांसाठी पार्लर, रांगोळी, मेहंदी आणि इतर कोर्सेसचे मोफत प्रशिक्षण दिले जाते.

**धनकवडी परिसर :**

राऊतबाग, धनकवडी या प्रभागातून सौ. वर्षा तापकीर या निवडूनआल्या आहेत व पुणे महानगरपालिकेत प्रतिनिधीत्व करणार आहेत. त्यांची ही प्रथम निवडणूक आहे. त्यांचे पती विलास तपकीर हे गेली अनेक वर्षे राजकारणात व समाजकार्यात आहेत त्याचबरोबर मा. आमदार भिमराव तापकीर हे त्यांचे सासरे आहेत.

त्यांच्या प्रभागात पूर्वी रस्ता हा व्यावसायिक नव्हता त्यांनी तो आता सुधारणा करून व्यवस्थित केला आहे. धनकवडी मधील चाळी असल्यामुळे त्यांना केशवनगर, सह्याद्रीनगर, आदर्शनगर, सहयोग नगर असे नामकरण केले आहे. पाणी व्यवस्था सुरळीत चालू केला आहे. व्यक्ती व समाज यांच्यामधील दुवा बनण्याचे काम वर्षा तापकीर यांनी केले आहे. बचत गट चालू केले आहेत. व्यसनमुक्ती कार्यक्रम राबविले जातात व जनजागृती मोहीम काढली जाते.

निवडणूक लढविण्या अगोदर अस्मिता शिंदे या मुंबईमध्ये ऑबेरॉय या हॉटेलमध्ये काम करत होत्या. परंतु हे काम त्या लग्नापूर्वी करत होत्या. लग्नानंतर त्यांनी त्यांचे चुलत सासरे यांच्या हॉटेलमध्ये काही काळ नोकरी केली. परंतु नंतर त्यांनी ती नोकरी सोडली व पती विशाल शिंदे यांच्या व्यवसायात मदत केली व समाजकार्य करण्यास सुरुवात केली.

**बिबवेवाडी परिसर :**

अस्मिता शिंदे यांचे सासरे गोकुळ शिंदे हे गेली अनेक वर्षे शिवसेना पक्षामार्फत समाजकार्यात होते. तसेच ते पर्वती येथील शाखेचे अध्यक्ष देखील होते. पती स्वत:चा व्यवसाय करतात व ते मालक म्हणून काम पाहतात. पती मनसेचे पर्वती विभागातील शाखांचे उपाध्यक्ष म्हणून काम पाहतात.

के. के. मार्केट या प्रभागातील प्रमुख समस्या म्हणजे वाहतूक कोंडी ही आहे. ती सुधारण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. महिलांसाठी सार्वजनिक शौचालय बांधण्यासाठी पाठपुरावा केला जात आहे. कचरा व्यवस्थापक करण्यासाठी बायोगॅस प्रकल्प राबविण्याचा विचार आहे. त्याचबरोबर बचत गट चालू करून महिलांना प्रशिक्षण व मार्गदर्शन दिले जात आहे.

महेश सोसायटी या प्रभागातून मानसी देशपांडे या विजयी झाल्या आहेत व त्या आता पुणे महानगरपालिकेत त्यांच्या प्रभागाचे प्रतिनिधीत्व करणार आहेत. त्यांनी प्रथमच निवडणूक लढविली आहे. निवडणूक लढविण्यापूर्वी त्या केबलिंगच्या व्यवसाय करत होत्या. त्यांचे पती हे समाजकार्य करतात. व स्वीकृत सदस्य, बिगर क्षेत्रीय कार्यालय बिबवेवाडी येथे आहेत.

त्यांच्या प्रभागातील मूलभूत समस्याचे त्यांनी निवारण केले आहे. परंतु जे कर भरतात व त्यांना सुखसोयी मिळत नाही अशा लोकांसाठी सुधारणा व प्रयत्न चालू केले आहेत.

अप्पर इंदिरा नगर मधील महिलांसाठी बचत गट चालू केले आहेत व त्या मार्फत त्यांना विविध प्रकारचे प्रशिक्षण दिले जाते. रक्तदान शिबिराचे आयोजन केले जाते. प्रशिक्षण दिले जाते. रक्तदान शिबिराचे आयोजन केले जाते. आर्थिक विकास व्हावा यासाठी नोकरी सहाय्य मार्गदर्शन देखील केले जाते. सांस्कृतिक कार्यक्रम राबविले जातात. यामध्ये नृत्य स्पर्धा, गौरी गणपती

सजावट, पदार्थ तयार करणे, रांगोळी, मेहंदी इ. कार्यक्रम राबविले जातात. नवरात्रात दांडीया रास खेळला जातो.

प्रभाग क्र. ७२ ब या विभागातून दिपाली ओसवाल या प्रतिनिधीत्व करणार आहेत. त्यांचे पती - श्री प्रमोद प्रेमचंद ओसवाल व सासरे प्रेमचंद अनुपमचंद ओसवाल हे समाजकार्य करत होते. सासरे हे माजी आमदार होते तर पती सध्या राजकारण व समाजकार्य करतात. दिपाली यांनी प्रथम निवडणूक २००७ साली लढविली होती. परंतु त्यात त्यांना यश प्राप्त झाले नाही. त्यांची ही दुसरी निवडणूक आहे व त्या विजयी झाल्या आहेत.

राजीव गांधी नगर मधील पाणी, ड्रेनेज, रस्ता व वीज समस्या होत्या. त्यांनी त्यामध्ये आता सुधारणा केल्या आहेत. व विकास केला आहे. सध्या त्यांच्याकडे १५ बचत गट आहेत. पूर्वी त्या ३५० बचत गट चालवत होत्या व याच्याच माध्यमातून समाजकार्य करत होत्या. सासरे त्यांच्या नावाने अप्पर इंदिरा नगर मध्ये चौक निर्माण करून त्याला त्यांचे नाव देण्यात आले आहे.

ग्लायडिंग सेंटर म्हटले की सातववाडी हे नाव प्रथम आठविते व याच बरोबर आठवते ती बनकर कॉलनी. या कॉलनीत वैशाली बनकर यांचे निवासस्थान आहे. व त्यांनी ही प्रथमच निवडणूक लढविली आहे व विजयी झाल्या आहेत. वैशाली ताई या फक्त नगरसेविका नसून त्या पुणे महानगरपालिकेत ‘महापौर’ म्हणून कार्यरत आहेत. त्यांचे पती श्री. सुनिल बनकर हे गेली अनेक वर्षे समाजकार्यात आहेत तसेच सासरे हे देखील समाजकार्य करत होते.

निवडणूक लढविण्याअगोदर वैशाली बनकर या समाजकार्य करत होत्या. त्यांनी बचतगट, सांस्कृतिक कार्यक्रम याच्या माध्यमातून जनसंपर्क वाढविला होता. वैशालीताई यांनी एक महिला म्हणून पद दिले नाही तर त्यांचे कार्य पाहून त्यांना पद दिले आहे. त्यांनी कचरा व्यवस्थापक करण्यासाठी उरळी देवाची व फुरसुंगी या भागातील कचरा व्यवस्थापक करण्याचे काम हाती घेतले आहे. घंटागाडी सुरू केली आहे. TUCCER VIHAR या ठिकाणी पुणे महानगरपालिकेची शाळा सुरू केली आहे. ग्लायडिंग सेंटर या ठिकाणी चहूबाजूने संरक्षणजाळी बसविली आहे. मूलभूत गरजांची पूर्तता केली आहे व एक महापौर म्हणून इतर समस्यांचाही जाणीवपूर्वक विचार करून त्या सोडविण्याचा प्रयत्न करणार आहेत.

चुलते सरपंच असताना लग्नापूर्वी ग्रामपंचायतीच्या जवळून पाहिलेल्या राजकारणाच्या बळावर सुवर्णा पायगुडे या आता महापालिका गाजवणार आहेत. महिला आरक्षणामुळे बालाजीनगर, पुण्याईनगर या प्रभाग क्र. ७३ मधून पती रोहिदास यांच्या गळ्यात पडणारी उमेदवारी माळ सुवणा पायगुडे यांच्या गळ्यात पडली आणि त्यांनी विजय मिळविला. आता गुंडगिरीच्या छायेखाली

वावरत असलेल्या बालाजीनगरला बाहेर काढून महिलांची पाण्यासाठीची वणवणही थांबविण्याचे प्रयत्न त्यांना करावे लागणार आहे.

मुंबई-पुणे रस्त्यावरील बदलापूर हे सुवर्णा पायगुडे यांचे माहेर. चुलते गावचे सरपंच असल्यामुळे राजकारणाचा संबंध लहानपणापासून आला. पती रोहिदास पायगुडे यांच्यामुळेही हा वारसा सासरीही मिळाला. परंतु हा वारसा स्वत:च चालवावा लागेल याची कल्पना नसताना महिला आरक्षणामुळे मिळालेल्या संधीचे सोने करण्यासाठी प्रयत्न करावे लागणार आहेत. याबाबत बोलताना महिलांना एकही भाजी आणायला जायचीही भीती वाटत असल्याचे सुवर्णा पायगुडे यांनी स्वत: कबूल केले. असमान पाणी पुरवठ्यामुळे येथील काही महिलांच्या तोंडचे पाणी पळाले आहे. त्यामुळे पाण्यासाठी होणारी महिलांची वणवण थांबविणे आणि त्यांना सुरक्षित वातावरण निर्माण करणे याला प्राधान्य देणार असल्याचे सांगितले. याशिवाय ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र, प्रशिक्षणाच्या माध्यमातून बचत गटांसाठी सक्षमीकरण, अंतर्गत रस्ते, कचऱ्याचा प्रश्न, नोकरदार महिलांच्या सोयीसाठी पाळणाघर इ. समस्या त्यांच्या समोर आहेत.

इच्छा असूनही सरकारी नोकरीमुळे अपूर्ण राहत असलेली पतीची समाजसेवा पूर्ण करण्याची संधी धनकवडी भारती विद्यापीठ त्या प्रभागात मोहिनी देवकर यांना महिला आरक्षणाच्या निमित्ताने मिळाली आहे. परंतु पतीच्या खंबीर पाठिंब्यामुळेच ही संधी मिळाल्याचे त्या सांगतात.

देवकर यांनी यापूर्वी कोणतीही निवडणूक लढविली नाही. यंदा पहिल्यांदाच या महापालिकेत दाखल झाल्या आहेत. बचत गटाच्या माध्यमातून टेलरिंग प्रशिक्षण वर्ग, खाद्य पदार्थ मसाल्याचे पदार्थ बनविणे यांचे प्रशिक्षण त्यांनी अनेक महिलांना दिले आहे. भारती विद्यापीठ रस्ता आंदोलन, अपुरा पाणीपुरवठा, यासाठीच्या आंदोलनामध्ये सहभाग घेऊन समाजसेवेचे धडे गिरवले आहेत.

ॲमिनेशन फॅक्टरीत नोकरी करत असलेले पती राजेंद्र यांना समाजसेवेची आवड असूनही नोकरीमुळे ती पूर्ण होऊ शकत नाही यामुळे माझ्या माध्यमातून काम करणाऱ्यासाठी त्यांनी साथ दिल्याचे सांगितले. त्यांच्या भागात त्यांना विशाल तांबे या अनुभवी खेळाडूची साथ मिळाली आहे. प्रभागातील दोन्ही जागा या एकाच पक्षाकडे असल्यामुळे विकास कामांनाही निश्चित गती मिळेल. प्रामुख्याने महिलांच्या सुरक्षततेची समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न चालू आहेत. कचरा आणि मंडई, भूमिगत केबल या समस्या भेडसावत आहेत.

वडील हवाई दलात असल्याने घरी शिस्तीचे वातावरण होते. आजोबा सातारच्या तत्कालीन जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्ष होते त्यामुळे राजकारणाचा वारसा आहे. समाजकार्याची आवड आणि पतीचीही साथ मिळाल्याने समाजाबरोबर राजकारणालाही गती मिळाली. महिला बचत

गट, सार्वजनिक उत्सव यांच्या माध्यमातून सुमारे १५ वर्षापासून सुरू केलेल्या कामाचे फळ आंबेगाव दत्तनगर या प्रभाग क्र. ७५ मधून कल्पना थोरवे नगरसेविका म्हणून निवडून आल्या.

महिलांसाठी आरोग्य तपासणी, नेत्र तपासणी शिबिरे, वृद्धाश्रम आणि (HIV, Positive) मुलांच्या संस्थेला कपडे वाटप आणि आदी कार्यक्रमांच्या माध्यमातून थोरवे यांचे सामाजिक काम सुरू असते. प्रभागातील सुमारे १०० पेक्षा अधिक बचत गटातील महिलांसाठी ब्युटी पार्लर, डिझायनिंग, नक्षीकाम इ. प्रकारचे विविध कोर्सेस चालविले जातात.

प्रभागात पोलीस चौकी अथवा ठाणे नसल्यामुळे गुंडगिरी फोफावली आहे. शहराचा टोकाचा भाग असल्यामुळे पाण्याचेही दुष्परिणाम आहेत. अंतर्गत रस्ते, संतोषनगर, आंबेगाव पठारावर महापालिकेची शाळा, संतोषनगर मधील भाजीमंडई हे प्रमाणातील मुख्य प्रश्न आहेत. त्यापैकी या परिसरात महापालिकेची शाळा सुरू करण्याचा तसेच महिलांसाठी रोजगार मिळवून देण्याचा प्रयत्न करणार असल्याचे थोरवे यांनी सांगितले आहे.

राजस सोसायटी हा भाग काही वर्षापूर्वी कोणाच्या परिचयाचाही नव्हता. परंतु सध्या तो सर्वांना परिचित झाला आहे. कारण आहे. सौ. कदम भारती. भारती ताईनी या विभागातून प्रथमच निवडणूक लढविली आहे व विजयी झाल्या आहेत. राजकीय वारसा असलेल्या भारती ताईचे शिक्षण १० वी झाले आहे. परंतु शिक्षण कमी आहे म्हणून जिद्द व चिकाटी सोडली नाही. दीर-सुरेश विठ्ठलराव कदम यांच्या सहाय्याने समाजकार्यास सुरुवात केली. सुरुवात करताना प्रगती फाऊँडेशन स्थापन केले व समाजकार्य चालू केले. चुलत सासरे हे देखील समाजकार्य व राजकारण करतात. त्याचबरोबर चुलत सासू मंगला अशोक कदम ह्या माजी महापौर व सध्या पिंपरी चिंचवड येथे नगरसेविका म्हणून कार्यरत आहेत. चुलत सासरे तात्यासाहेब शंकरराव कदम हे देखील माजी नगरसेवक होते.

कात्रज -कोंढवा रोडवर मुख्य समस्या ही रस्त्याची आहे. त्यामुळे मात्र त्या ठिकाणी रस्ता रुंदीकरण करून पूल बांधण्यात आला आहे. पाणी समस्या, वीज समस्या यांच्यावरती काम चालू केले. प्रगती फाऊंडेशनच्या माध्यमातून, दृक्षारोपण, उद्यान, बसण्यासाठी बेचेंस उपलब्ध करून दिले आहे. बचत गट चालू करून महिलांचे सबलीकरण करण्याचा प्रयत्न करणार आहेत. दरवर्षी गणेश चतुर्थीला शिलाई मशीन वाटप व विद्यार्थ्यांना सायकल वाटप केले जाते. नवीन योजना राबवून विकास कामे मार्गी लावणार आहेत.

पुणे महानगरपालिकेतील पक्ष निहाय निवडून आलेल्या महिलांचे वर्गीकरण

**तक्ता नं. १**

| क्र. | पक्ष | संख्या |
|---|---|---|
| १ | काँग्रेस | ११ |
| २ | राष्ट्रवादी काँग्रेस | २७ |
| ३ | भाजप | १३ |
| ४ | मनसे | १९ |
| ५ | शिवसेना | ०६ |
| ६ | अपक्ष | ०१ |
| ७ | इतर (रिपाई) | ०१ |
| ८ | एकूण | ७८ |

पुणे महानगर पालिकेतील पक्ष निहाय निवडून आलेल्या महिलांच्या व्यवसायाचे वर्गीकरण

**तक्ता नं. २ : १) काँग्रेस पक्ष**

| क्र. | पक्ष | नगरसेविकांची नावे | व्यवसाय |
|---|---|---|---|
| १ | काँग्रेस | सौ. गायकवाड शशिकला धोंडीराम | कडे विक्री |
| २ | | सौ. गायकवाड संगिता दत्तात्रय | सुखवस्तू विक्री |
| ३ | | श्रीमती शशिकला आरडे | समाजकार्य |
| ४ | | सौ. शितल अजय सावंत | व्यवसाय व समाजसेवा |
| ५ | | सौ. सुनिता गलांडे | गृहिणी व समाजकार्य |
| ६ | | श्रीमती राजगुरू लताबाई दयाराम | शेती व व्यापार |
| ७ | | सौ. जाधव अश्विनी तुकाराम | गृहिणी |
| ८ | | सौ. मराठे वैशाली राजू | गृहिणी |
| ९ | | सौ. शिवरकर कविता चंद्रकांत | गृहिणी |
| १० | | श्रीमती खान जिल्लेहुम मोशरिक | समाजकार्य |
| ११ | | सौ. गडाळे सुनंदा सतीश | - |

## २) राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष

| क्र. | नगरसेविकांची नावे | व्यवसाय |
|---|---|---|
| १ | सौ. टिंगरे रेखा चंद्रकांत | केटरिंग |
| २ | सौ. पठारे संजिला बापू | शेती व व्यवसाय |
| ३ | सौ. कळमकर उषा ज्ञानेश्वर | गृहिणी |
| ४ | सौ. मुरकुटे रंजना अशोक | शेती |
| ५ | सौ. चिमटे रोहिणी सुधीर | समाजकार्य व व्यवसाय (नोकरी) |
| ६ | सौ. निम्हण सुषमा प्रमोद | गृहिणी |
| ७ | सौ. ओरसे शारदा शंकर | गृहिणी |
| ८ | सौ. भोसले रेखा अनिल | शेती व व्यवसाय |
| ९ | सौ. परदेशी मीना रवी | गृहिणी |
| १० | सौ. सरवदे मीनल आनंद | व्यापार |
| ११ | सौ. पठारे सुमन बाळासाहेब | शेती |
| १२ | सौ. कोद्रे चंचला संदीप | समाजसेवा |
| १३ | सौ. दुधाने लक्ष्मी देवराम | गृहिणी व समाजसेवा |
| १४ | सौ. कवडे सुरेखा चंद्रकांत | समाजकार्य |
| १५ | सौ. कापरे विजया हनुमंत | गृहिणी |
| १६ | सौ. पवार रंजना शिवाजी | समाजसेवा |
| १७ | सौ. बनकर वैशाली सुनिल | समाजसेवा |
| १८ | सौ. आंदेकर राजश्री सूर्यकांत | गृहिणी |
| १९ | सौ. बोडके मनिषा संतोष | समाजकार्य |
| २० | सौ. कुदळे संगीता अक्रूर | गृहिणी |
| २१ | सौ. मोमीन हिना शफीक | गृहिणी |
| २२ | सौ. लोणकर नंदा नारायण | नोकरी |
| २३ | सौ. व्यवहारे कमल ज्ञानराज | शेती व व्यापार |
| २४ | सौ. जगताप उषा सुभाष | समाजसेवा व व्यापार |
| २५ | सौ. पायगुडे सुवर्णा रोहिदास | गृहिणी |
| २६ | सौ. देवकर मोहिनी राजेंद्र | गृहिणी |
| २७ | सौ. कदम भारती प्रकाश | शेती व व्यापार |

## ३) भारतीय जनता पक्ष (भाजप)

| क्र. | नगरसेविकांची नावे | व्यवसाय |
|---|---|---|
| १ | सौ. खाडे निलीमा दत्तात्रय | व्यवसाय कपडे विक्री |
| २ | सौ. मोहोळ मोनिका मुरलीधर | गृहिणी |
| ३ | सौ. कुलकर्णी मेधा विकास | नोकरी |
| ४ | सौ. सहस्त्रबुद्धे माधुरी श्रीराम | व्यवसाय - बचत गट |
| ५ | सौ. टिळक मुक्ता शैलेश | गृहिणी व समाजसेवा |
| ६ | सौ. घाटे मनिषा धनंजय | गृहिणी |
| ७ | सौ. नागपुरे मंजुषा दीपक | नोकरी |
| ८ | सौ. वस्ते स्मिता पद्माकर | नोकरी |
| ९ | सौ. ढमाले प्रतिभा नितीन | कपडे विक्री |
| १० | सौ. वैरागे कविता भारत | गृहिणी |
| ११ | सौ. चोरबेले मनिषा प्रवीण | गृहिणी व समाजकार्य |
| १२ | सौ. तापकीर वर्षा विलास | समाजसेवा |
| १३ | सौ. मानसी देशपांडे | केबलिंग व्यवसाय |

## ४) शिवसेना

| क्र. | नगरसेविकांची नावे | व्यवसाय |
|---|---|---|
| १ | सौ. मंजाळकर निता | - |
| २ | सौ. देशपांडे संगीता शाम | व्यापार |
| ३ | सौ. झेंडे सोनम मयूर | गृहिणी व समाजकार्य |
| ४ | सौ. दिपाली ओसवाल प्रमोद | गृहिणी |
| ५ | सौ. थोरवे कल्पना संभाजी | व्यापार व समाजसेवा |
| ६ | सौ. वाडकर विजया पोपट | गृहिणी |

## ५) अपक्ष

| क्र. | नगरसेविकांची नावे | व्यवसाय |
|---|---|---|
| १ | सौ. कदम अश्विनी नितीन | नोकरी |

## ६) रिपाई

| क्र. | नगरसेविकांची नावे | व्यवसाय |
|---|---|---|
| १ | सौ. देवकर सुनंदा संजय | गृहिणी |

## ७) महाराष्ट्र नवनिर्माण सेना पक्ष (मनसे)

| क्र. | नगरसेविकांची नावे | व्यवसाय |
|---|---|---|
| १ | सौ. साळुंके सविता उर्फ सुनिता अनिल | गृहिणी व समाजसेवा |
| २ | सौ. कांबळे अर्चना रमेश | गृहिणी व समाजसेवा |
| ३ | सौ. कुलकर्णी निलम अविनाश | व्यापार |
| ४ | सौ. साने आशा राजेश | गृहिणी |
| ५ | सौ.वागस्कर विनिता राजेंद्र | नोकरी व गृहिणी |
| ६ | सौ. तिकोने संगीता राहूल | गृहिणी व समाजकार्य |
| ७ | सौ. मारणे जयश्री गजानन | ब्युटी पार्लर व्यवसाय |
| ८ | सौ. कनोजिया पुष्पा कैलास | नोकरी |
| ९ | सौ. दांगट भाग्यश्री कैलास | गृहिणी |
| १० | सौ. मखवान सुरेशा अविनाश | गृहिणी |
| ११ | सौ. डाखवे अनिता दिनेश | गृहिणी व समाजसेवा |
| १२ | सौ. बहिरट कल्पना दिलीप | व्यवसाय |
| १३ | सौ. पाटील रुपाली चंद्रशेखर | वकिली व्यवसाय |
| १४ | कु. भारती चाकणकर | शिक्षण |
| १५ | कु. प्रिया गदादे | शिक्षण |
| १६ | श्रीमती नेटके सुशिला ओसवाल | - |
| १७ | सौ. ठोसर संगीता राजेंद्र | गृहिणी |
| १८ | सौ. बाबर भारती साईनाथ | गृहिणी |
| १९ | सौ.शिंदे अस्मिता विशाल | नोकरी व समाजसेवा |

### व्यवसायाचे एकूण वर्गीकरण व संख्या

| व्यवसाय | संख्या | व्यवसाय | संख्या |
|---|---|---|---|
| शिक्षण | ०२ | व्यापार | १२ |
| शेती + व्यापार | ०७ | समाजकार्य | १० |
| गृहिणी व समाजसेवा | ०८ | व्यवसाय व समाजकार्य | ०३ |
| गृहिणी | २५ | माहिती न मिळालेले | ०४ |
| नोकरी | ०७ | **एकूण** | **७८** |

## पुणे मनपामधील पक्ष निहाय निवडून आलेल्या महिलांच्या जातीचे निकष अथवा वर्गीकरण

### तक्ता नं. ३

### १) काँग्रेस पक्ष

| क्र. | महिला नगरसेविकांची नावे | धर्म व जात |
|---|---|---|
| १ | सौ. गायकवाड शशिकला धोंडीराम | हिंदू - महार |
| २ | सौ. गायकवाड संगीता दत्तात्रय | हिंदू - महार |
| ३ | श्रीमती शशिकला आरडे | हिंदू - मातंग |
| ४ | सौ. सावंत शितू अजय | हिंदू - मराठा |
| ५ | सौ.गलांडे सुनिता | हिंदू - कुणबी मराठा |
| ६ | श्रीमती राजगुरू लताबाई दयाराम | हिंदू - महार |
| ७ | सौ. जाधव अश्विनी तुकाराम | हिंदू - मराठा |
| ८ | सौ. मराठे वैशाली राजू | हिंदू कुणबी मराठा |
| ९ | सौ. शिवरकर कविता चंद्रकांत | हिंदू -फूलमाळी |
| १० | श्रीमती खान जिल्लेहुमा मोशीरफ | मुस्लिम-सुन्नी |
| ११ | सौ. गडाळे सुनंदा सतीश | - |

### २) राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष

| क्र. | महिला नगरसेविकांची नावे | धर्म व जात |
|---|---|---|
| १ | सौ. टिंगरे रेखा चंद्रकांत | हिंदू मराठा |
| २ | सौ. पठारे संजिला बापू | हिंदू मराठा |
| ३ | सौ. कळमकर उषा ज्ञानेश्वर | हिंदू कुणबी मराठा |
| ४ | सौ. मुरकुटे रंजना अशोक | हिंदू मराठा |
| ५ | सौ. चिमटे रोहिणी सुधीर | हिंदूं महादेव कोळी |
| ६ | सौ. निम्हण सुषमा प्रमोद | हिंदू मराठा |
| ७ | सौ. ओरसे शारदा शंकर | हिंदू वडारी |
| ८ | सौ. भोसले रेशमा अनिल | हिंदू मराठा |
| ९ | सौ. परदेशी मीना रवी | हिंदू रजपूत |
| १० | सौ. सरवदे मीनल आनंद | हिंदू बौद्ध |
| ११ | सौ. पठारे सुमन बाबासाहेब | हिंदू मराठा |
| १२ | सौ. कोद्रे चंचला संदीप | हिंदू फुळमाळी |
| १३ | सौ. दुधाने लक्ष्मी देवराम | हिंदू मराठा |

| | | |
|---|---|---|
| १४ | सौ. कवडे सुरेखा चंद्रकांत | हिंदू मराठा |
| १५ | सौ. कापरे विजया हनुमंत | हिंदू फुळमाळी |
| १६ | सौ. पवार रंजना शिवाजी | हिंदू मराठा |
| १७ | सौ. बनकर वैशाली सुनिल | हिंदू फुलमाळी |
| १८ | सौ. आंदेकर राजश्री सूर्यकांत | हिंदू मराठा |
| १९ | सौ. कुदळे संगीता अक्रूर | हिंदू फुलमाळी |
| २० | सौ. लोणकर नंदा नारायण | हिंदु फुलमाळी |
| २१ | सौ. मोमीन हीना शफीक | मुस्लीम बौद्ध, हिंदू-महार |
| २२ | सौ. लोणकर नंदा नारायण | हिंदु फुलमाळी |
| २३ | सौ. व्यवहारे कमल ज्ञानराज | - |
| २४ | सौ. जगताप उषा सुभाष | हिंदू -बौद्ध (महार) |
| २५ | सौ. पायगुडे सुर्वणा रोहिदास | हिंदू-मराठा |
| २६ | सौ. देवकर मोहिनी राजेंद्र | हिंदू-कुणबी मराठा |
| २७ | सौ. कदम भारती प्रकाश | हिंदू मराठा |

**३) भारतीय जनता पक्ष / पार्टी (भाजप)**

| क्र. | महिला नगरसेविकांची नावे | धर्म व जात |
|---|---|---|
| १ | सौ. खाडे निलिमा दत्तात्रय | हिंदू-वंजारी |
| २ | सौ. मोहोळ मोनिका दुरलीधर | हिंदू मराठा |
| ३ | सौ.कुलकर्णी मेधा विश्राम | हिंदू ब्राह्मण |
| ४ | सौ. सहस्त्रबुद्धे माधुरी श्रीराम | हिंदू ब्राह्मण |
| ५ | सौ. टिळक मुक्ता शैलेश | हिंदू ब्राह्मण |
| ६ | सौ. घाटे मनिषा धनंजय | - |
| ७ | सौ. नागपुरे मंजुषा दिपक | - |
| ८ | श्रीमती वस्ते स्मिता पद्माकर | - |
| ९ | सौ. ढमाले प्रतिभा नितीन | हिंदू-मराठा |
| १० | सौ.वैरागे कविता भारत | - |
| ११ | सौ. सौ. चोरबेले मनिषा प्रदीप | जैन |
| १२ | सौ. तापकीर वर्षा विलास | हिंदू मराठा |
| १३ | सौ. देशपांडे मानसी मनोज | हिंदू ब्राह्मण |

## ४) शिवसेना

| क्र. | महिला नगरसेविकांची नावे | धर्म व जात |
|---|---|---|
| १ | सौ.मंजाळकर निना | - |
| २ | सौ. देशपांडे संगीता शाम | हिंदू - ब्राह्मण |
| ३ | सौ. झेंडे सोनम मयूर | हिंदू न्हावी |
| ४ | सौ. ओसवाल दिपाली प्रमोद | जैन-मारवाडी |
| ५ | सौ.थोरवे कल्पना संभाजी | - |
| ६ | सौ. वाडकर विजया पोपट | हिंदू फुळमाळी |

## ५) महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे)

| क्र. | महिला नगरसेविकांची नावे | धर्म व जात |
|---|---|---|
| १ | सौ. साळुंके सुनिता अनिल | हिंदू -मराठा (कुणबी) |
| २ | सौ.कांबळे अर्चना रमेश | हिंदू -मातंग |
| ३ | सौ. कुलकर्णी निलम अविनाश | हिंदू -ब्राह्मण |
| ४ | सौ. साने आशा राजेश | हिंदू-चांभार |
| ५ | सौ.वागस्कर विनिता राजेंद्र | हिंदू-मराठा |
| ६ | सौ.तिकोने संगीता राहूल | हिंदू-मातंग |
| ७ | सौ. मारणे जयश्री गजानन | हिंदू -मराठा |
| ८ | सौ. कनोजिया पुष्पा कैलास | हिंदू-मारवाडी |
| ९ | सौ.दांगट भाग्यश्री कैलास | हिंदू-मराठा |
| १० | सौ.मखवान सुरेखा अविनाश | हिंदू-गोसावी |
| ११ | सौ.डाखवे अनिता दिनेश | हिंदू-मातंग |
| १२ | सौ. बहिरट कल्पना दिलीप | हिंदू-कुणबी मराठा |
| १३ | सौ. पाटील रुपाली चंद्रशेखर | हिंदू-मराठा |
| १४ | कु. चाकणकर भारती | हिंदू-फुलमाळी |
| १५ | कु. गदादे प्रिया शिवाजी | हिंदू-फुलमाळी |
| १६ | श्रीमती नेटके सुशिला (ओसवाल) | - |
| १७ | सौ. ठोसर संगीता राजेंद्र | हिंदू-गुरव |
| १८ | सौ. बाबर आरती साईनाथ | हिंदू-मराठा |
| १९ | सौ. शिंदे अस्मिता विशाल | हिंदू-मराठा |

### ६) अपक्ष

| क्र. | महिला नगरसेविकाचे नावे | धर्म व जात |
|---|---|---|
| १ | सौ. कदम अश्विनी नितीन | हिंदू-मराठा |

### ७) रिपाई

| क्र. | महिला नगरसेविकाचे नावे | धर्म व जात |
|---|---|---|
| १ | सौ. देवकर सुनंदा संजय | हिंदू-मराठा |

**तक्ता नं. ४ : पुणे मनपामधील महिला नगरसेविकांची वयानुसार वर्गवारी**

| क्र. | वय | संख्या (महिला) |
|---|---|---|
| १ | १८-३० | ०९ |
| २ | ३१-४० | २९ |
| ३ | ४१-५० | ३२ |
| ४ | ५१-६० | ०८ |
| ५ | ६१-७० | ०० |
| | एकूण | ७८ |

**पुणे महानगरपालिकेमधील पक्ष निहाय निवडून आलेल्या महिलांच्या शिक्षणाचे वर्गीकरण**

**तक्ता नं. ५**

### १) काँग्रेस पक्ष

| क्र. | महिला नगरसेविकांची नावे | शिक्षण |
|---|---|---|
| १ | सौ. गायकवाड शशिकला धोंडीराम | १० वी पास |
| २ | सौ. गायकवाड संगीता दत्तात्रय | १२ वी पास |
| ३ | श्रीमती आरडे शशिकला | ४ थी पास |
| ४ | सौ. सावंत शितल अजय | बी.एससी (पदवीधर) |
| ५ | सौ.गलांडे सुनिता | ९ वी पास |
| ६ | श्रीमती राजगुरू लताबाई दयाराम | १० वी पास |
| ७ | सौ. जाधव अश्विनी तुकाराम | बी.ए. (पदवीधर) |
| ८ | सौ. मराठे वैशाली राजू | बी.कॉम (पदवीधर) |
| ९ | सौ. शिवरकर कविता चंद्रकांत | ८ वी पास |
| १० | श्रीमती खान जिल्लेहुमा मोशीरफ | १० वी पास |
| ११ | सौ. गडाळे सुनंदा सतीश | - |

## २) राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष

| क्र. | महिला नगरसेविकांची नावे | धर्म व जात |
|---|---|---|
| १ | सौ. टिंगरे रेखा चंद्रकांत | १० वी पास |
| २ | सौ. पठारे संजिला बापू | १२ वी पास |
| ३ | सौ. कळमकर उषा ज्ञानेश्वर | १० वी पास |
| ४ | सौ. मुरकुटे रंजना अशोक | १२ वी पास |
| ५ | सौ. चिमटे रोहिणी सुधीर | बी.ए. (पदवीधर-भूगोल) |
| ६ | सौ. निम्हण सुषमा प्रमोद | १२ वी पास |
| ७ | सौ. ओरसे शारदा शंकर | बी.ए. (पदवीधर-भूगोल) |
| ८ | सौ. भोसले रेशमा अनिल | १२ वी पास |
| ९ | सौ. परदेशी मीना रवी | ५ वी पास |
| १० | सौ. सरवदे मीनल आनंद | पदवीधर (डी. एड.,बी.एड.) |
| ११ | सौ. पठारे सुमन बाबासाहेब | १२ वी पास |
| १२ | सौ. कोद्रे चंचला संदीप | बी.ए. (पदवीधर) |
| १३ | सौ. दुधाने लक्ष्मी देवराम | ८ वी पास |
| १४ | सौ. कवडे सुरेखा चंद्रकांत | १० वी पास |
| १५ | सौ. कापरे विजया हनुमंत | १२ वी पास |
| १६ | सौ. पवार रंजना शिवाजी | १० वी पास |
| १७ | सौ. बनकर वैशाली सुनिल | पदव्युत्तर |
| १८ | सौ. आंदेकर राजश्री सूर्यकांत | ९ वी पास |
| १९ | सौ. कुदळे संगीता अक्रूर | ९ वी पास |
| २० | सौ. बोडके मनिषा संतोष | १० वी पास |
| २१ | सौ. मोमीन हीना शफीक | १२ वी पास |
| २२ | सौ. लोणकर नंदा नारायण | बी.कॉम (पदवीधर) |
| २३ | सौ. व्यवहारे कमल ज्ञानराज | बी.ए. (पदवीधर) |
| २४ | सौ. जगताप उषा सुभाष | ९ वी पास |
| २५ | सौ. पायगुडे सुर्वणा रोहिदास | १० वी पास |
| २६ | सौ. देवकर मोहिनी राजेंद्र | १२ वी पास |
| २७ | सौ. कदम भारती प्रकाश | १० वी पास |

## ३) भारतीय जनता पक्ष (भाजप)

| क्र. | नगरसेविकांची नावे | व्यवसाय |
|---|---|---|
| १ | सौ. खाडे निलीमा दत्तात्रय | बी.ए. (पदवीधर अर्थशास्त्र) |
| २ | सौ. मोहोळ मोनिका मुरलीधर | एच.एस.सी. डी.एड. |
| ३ | सौ. कुलकर्णी मेधा विकास | पदव्युत्तर(एम.कॉम.) |
| ४ | सौ. सहस्त्रबुद्धे माधुरी श्रीराम | पदवीधर (बी.कॉम) |
| ५ | सौ. टिळक मुक्ता शैलेश | (BA,MBA, Dipoloma in Jurnalism) |
| ६ | सौ. घाटे मनिषा धनंजय | पदव्युत्तर (एमए-मराठी) |
| ७ | सौ. नागपुरे मंजुषा दीपक | द्वीपदवीधर, एमबीए |
| ८ | सौ. वस्ते स्मिता पद्माकर | - |
| ९ | सौ. ढमाले प्रतिभा नितीन | पदवीधर (बी.कॉम.) |
| १० | सौ. वैरागे कविता भारत | १० वी पास |
| ११ | सौ. चोरबेले मनिषा प्रवीण | १२ वी पास (वाणिज्य) |
| १२ | सौ. तापकीर वर्षा विलास | १२ वी पास |
| १३ | सौ. देशपांडे मानसी मनोज | पदवीधर (बी.कॉम) |

## ४) शिवसेना

| क्र. | महिला नगरसेविकांची नावे | धर्म व जात |
|---|---|---|
| १ | सौ.मंजाळकर निना | - |
| २ | सौ. देशपांडे संगीता शाम | बी.कॉम (पदवीधर) |
| ३ | सौ. झेंडे सोनम मयूर | एस.वाय.बी.ए. |
| ४ | सौ. ओसवाल दिपाली प्रमोद | एस.वाय. बी.कॉम |
| ५ | सौ.थोरवे कल्पना संभाजी | १० वी पास |
| ६ | सौ. वाडकर विजया पोपट | १० वी पास |

## ७) महाराष्ट्र नवनिर्माण सेना पक्ष (मनसे)

| क्र. | नगरसेविकांची नावे | शिक्षण |
|---|---|---|
| १ | सौ. साळुंके सविता उर्फ सुनिता अनिल | १० वी पास |
| २ | सौ. कांबळे अर्चना रमेश | बी.कॉम (पदवीधर) |
| ३ | सौ. कुलकर्णी निलम अविनाश | बी एस. सी. (पदवीधर) |
| ४ | सौ. साने आशा राजेश | ३ री पास |
| ५ | सौ.वागस्कर विनिता राजेंद्र | पदव्युत्तर (एम. कॉम) |
| ६ | सौ. तिकोने संगीता राहूल | बी. ए. (पदवीधर) |
| ७ | सौ. मारणे जयश्री गजानन | १० वी पास |
| ८ | सौ. कनोजिया पुष्पा कैलास | पदव्युत्तर (मराठी) |
| ९ | सौ. दांगट भाग्यश्री कैलास | १२ वी पास (वाणिज्य) |
| १० | सौ. मखवान सुरेशा अविनाश | १२ वी पास |
| ११ | सौ. डाखवे अनिता दिनेश | बी.कॉम. (पदवीधर) |
| १२ | सौ. बहिरट कल्पना दिलीप | १२ वी पास (विज्ञान) |
| १३ | सौ. पाटील रुपाली चंद्रशेखर | बी.ए., एल.एल.बी. |
| १४ | कु. भारती चाकणकर | डी.एड., एफ.वाय. बी.ए. |
| १५ | कु. प्रिया गदादे | बी.कॉम (पदवीधर) |
| १६ | श्रीमती नेटके सुशिला ओसवाल | - |
| १७ | सौ. ठोसर संगीता राजेंद्र | १० वी पास |
| १८ | सौ. बाबर भारती साईनाथ | बी.ए. (पदवीधर) |
| १९ | सौ.शिंदे अस्मिता विशाल | पदवीधर (हॉटेल मॅनेजमेंट) |

## ६) अपक्ष

| क्र. | महिला नगरसेविकाचे नावे | शिक्षण |
|---|---|---|
| १ | सौ. कदम अश्विनी नितीन | पदव्युत्तर (एम.कॉम) |

## ७) रिपाई

| क्र. | महिला नगरसेविकाचे नावे | शिक्षण |
|---|---|---|
| १ | सौ. देवकर सुनंदा संजय | ९ वी पास |

## पुणे मनपामधील विजयी महिला उमेदवारांची निवडणूक लढविलेली संख्या-पदनिहाय

## तक्ता नं. ६ : १) कॉंग्रेस पक्ष

| क्र. | महिला नगरसेविकांची नावे | निवडणूक लढविलेली संख्या | पूर्वीची निवडणूक संख्या |
|---|---|---|---|
| १ | सौ. गायकवाड शशिकला धोंडीराम | प्रथम वेळ | |
| २ | सौ. गायकवाड संगीता दत्तात्रय | द्वितीय वेळ | प्रथम २००७ पराभव |
| ३ | श्रीमती शशिकला आरडे | प्रथम वेळ | |
| ४ | सौ. सावंत शित अजय | प्रथम वेळ | |
| ५ | सौ.गलांडे सुनिता | प्रथम वेळ | |
| ६ | श्रीमती राजगुरू लताबाई दयाराम | चौथी वेळ | प्रथम १९९७, द्वितीय २००२, तृतीय२००७ |
| ७ | सौ. जाधव अश्विनी तुकाराम | प्रथम वेळ | |
| ८ | सौ. मराठे वैशाली राजू | द्वितीय वेळ | |
| ९ | सौ. शिवरकर कविता चंद्रकांत | प्रथम वेळ | |
| १० | श्रीमती खान जिल्लेहुमा मोशीरफ | प्रथम वेळ | |
| ११ | सौ. गडाळे सुनंदा सतीश | - | |

## २) राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष

| क्र. | महिला नगरसेविकांची नावे | निवडणूक लढविलेली संख्या | पूर्वीची निवडणूक संख्या |
|---|---|---|---|
| १ | सौ. टिंगरे रेखा चंद्रकांत | द्वितीय वेळ | २००७ - यशप्राप्त |
| २ | सौ. पठारे संजिला बापू | प्रथम वेळ | |
| ३ | सौ. कळमकर उषा ज्ञानेश्वर | प्रथम वेळ | |
| ४ | सौ. मुरकुटे रंजना अशोक | प्रथम वेळ | |
| ५ | सौ. चिमटे रोहिणी सुधीर | प्रथम वेळ | |
| ६ | सौ. निम्हण सुषमा प्रमोद | प्रथम वेळ | |
| ७ | सौ. ओरसे शारदा शंकर | प्रथम वेळ | |
| ८ | सौ. भोसले  रेशमा अनिल | प्रथम वेळ | |
| ९ | सौ. परदेशी मीना रवी | प्रथम वेळ | |
| १० | सौ. सरवदे मीनल आनंद | प्रथम वेळ | |
| ११ | सौ. पठारे सुमन बाबासाहेब | प्रथम वेळ | |
| १२ | सौ. कोद्रे चंचला संदीप | प्रथम वेळ | |
| १३ | सौ. दुधाने लक्ष्मी देवराम | प्रथम वेळ | |
| १४ | सौ. कवडे सुरेखा चंद्रकांत | द्वितीय वेळ | प्रथम २००७ |

| | | | |
|---|---|---|---|
| १५ | सौ. कापरे विजया हनुमंत | प्रथम वेळ | |
| १६ | सौ. पवार रंजना शिवाजी | प्रथम वेळ | |
| १७ | सौ. बनकर वैशाली सुनिल | प्रथम वेळ | |
| १८ | सौ. आंदेकर राजश्री सूर्यकांत | प्रथम वेळ | |
| १९ | सौ. कुदळे संगीता अक्रूर | प्रथम वेळ | |
| २० | सौ. लोणकर नंदा नारायण | प्रथम वेळ | |
| २१ | सौ. मोमीन हीना शफीक | प्रथम वेळ | |
| २२ | सौ. लोणकर नंदा नारायण | प्रथम वेळ | |
| २३ | सौ. व्यवहारे कमल ज्ञानराज | तृतीय वेळ | २००२,२००७ दोन्हीमध्ये यशप्राप्त |
| २४ | सौ. जगताप उषा सुभाष | तृतीय वेळ | २००२ पराभव, २००७ यश |
| २५ | सौ. पायगुडे सुर्वणा रोहिदास | प्रथम वेळ | |
| २६ | सौ. देवकर मोहिनी राजेंद्र | प्रथम वेळ | |
| २७ | सौ. कदम भारती प्रकाश | प्रथम वेळ | |

## ३) भारतीय जनता पक्ष (भाजप)

| क्र. | महिला नगरसेविकांची नावे | निवडणूक लढविलेली संख्या | पूर्वीची निवडणूक संख्या |
|---|---|---|---|
| १ | सौ. खाडे निलीमा दत्तात्रय | प्रथम वेळ | |
| २ | सौ. मोहोळ मोनिका मुरलीधर | प्रथम वेळ | |
| ३ | सौ. कुलकर्णी मेधा विकास | प्रथम वेळ | |
| ४ | सौ. सहस्त्रबुद्धे माधुरी श्रीराम | प्रथम वेळ | |
| ५ | सौ. टिळक मुक्ता शैलेश | तृतीय वेळ | २००२,२००७ यश |
| ६ | सौ. घाटे मनिषा धनंजय | द्वितीय वेळ | प्रथम २००७ पराभव |
| ७ | सौ. नागपुरे मंजुषा दीपक | प्रथम वेळ | - |
| ८ | सौ. वस्ते स्मिता पद्माकर | - | - |
| ९ | सौ. ढमाले प्रतिभा नितीन | प्रथम वेळ | |
| १० | सौ. वैरागे कविता भारत | प्रथम वेळ | |
| ११ | सौ. चोरबेले मनिषा प्रवीण | प्रथम वेळ | |
| १२ | सौ. तापकीर वर्षा विलास | प्रथम वेळ | |
| १३ | सौ. देशपांडे मानसी मनोज | प्रथम वेळ | |

## ४) शिवसेना

| क्र. | महिला नगरसेविकांची नावे | निवडणूक लढविलेली संख्या | पूर्वीची निवडणूक संख्या |
|---|---|---|---|
| १ | सौ.मंजाळकर निना | - | - |
| २ | सौ. देशपांडे संगीता शाम | द्वितीय वेळ | प्रथम २००७ पराभव |
| ३ | सौ. झेंडे सोनम मयूर | प्रथम वेळ | - |
| ४ | सौ. ओसवाल दिपाली प्रमोद | द्वितीय वेळ | प्रथम २००७ पराभव |
| ५ | सौ.थोरवे कल्पना संभाजी | प्रथम वेळ | - |
| ६ | सौ. वाडकर विजया पोपट | प्रथम वेळ | - |

## ५) महाराष्ट्र नवनिर्माण सेना पक्ष (मनसे)

| क्र. | महिला नगरसेविकांची नावे | निवडणूक लढविलेली संख्या | पूर्वीची निवडणूक संख्या |
|---|---|---|---|
| १ | सौ. साळुंके सुनिता अनिल | प्रथम वेळ | |
| २ | सौ. कांबळे अर्चना रमेश | प्रथम वेळ | |
| ३ | सौ. कुलकर्णी निलम अविनाश | प्रथम वेळ | |
| ४ | सौ. साने आशा राजेश | प्रथम वेळ | |
| ५ | सौ.वागस्कर विनिता राजेंद्र | प्रथम वेळ | |
| ६ | सौ. तिकोने संगीता राहूल | प्रथम वेळ | |
| ७ | सौ. मारणे जयश्री गजानन | प्रथम वेळ | |
| ८ | सौ. कनोजिया पुष्पा कैलास | प्रथम वेळ | |
| ९ | सौ. दांगट भाग्यश्री कैलास | प्रथम वेळ | |
| १० | सौ. मखवान सुरेशा अविनाश | प्रथम वेळ | |
| ११ | सौ. डाखवे अनिता दिनेश | प्रथम वेळ | |
| १२ | सौ. बहिरट कल्पना दिलीप | तृतीय वेळ | २००२ यशप्राप्त<br>२००७ पराभव |
| १३ | सौ. पाटील रुपाली चंद्रशेखर | प्रथम वेळ | |
| १४ | कु. भारती चाकणकर | प्रथम वेळ | |
| १५ | कु. प्रिया गदादे | प्रथम वेळ | |
| १६ | श्रीमती नेटके सुशिला ओसवाल | प्रथम वेळ | |
| १७ | सौ. ठोसर संगीता राजेंद्र | प्रथम वेळ | |
| १८ | सौ. बाबर भारती साईनाथ | प्रथम वेळ | |
| १९ | सौ.शिंदे अस्मिता विशाल | प्रथम वेळ | |

## ६) अपक्ष

| क्र. | महिला नगरसेविकांची नावे | निवडणूक लढविलेली संख्या | पूर्वीची निवडणूक संख्या |
|---|---|---|---|
| १ | सौ. कदम अश्विनी नितीन | द्वितीय वेळ | प्रथम २००७ पराभव |

## ७) रिपाई

| क्र. | महिला नगरसेविकांची नावे | निवडणूक लढविलेली संख्या | पूर्वीची निवडणूक संख्या |
|---|---|---|---|
| १ | सौ. देवकर सुनंदा संजय | प्रथम वेळ | - |

# पुणे महानगरपालिका सार्वजनिक निवडणूक २०१२
## विजयी महिला उमेदवारांची यादी पुढीलप्रमाणे

| क्र. | उमेदवाराचे नाव | पक्ष | प्रभाग क्रमांक व प्रभागाचे नाव |
|---|---|---|---|
| १. | रेखा टिंगरे | रा. काँग्रेस | प्र. क. १ अ<br>धानोरी गावठाण विधानगर |
| २. | संजिला पठारे | राष्ट्रवादी काँग्रेस | प्र. क. २ ब<br>खराडी गावठाण चंदनगर |
| ३. | उषा कळमळकर | राष्ट्रवादी काँग्रेस | प्र. क. ३ अ विमाननगर |
| ४. | सुनंदा देवकर | रिपाई | प्र. क. ४ अ नागपूर चाळ<br>येरवडा कारागृह |
| ५. | सविता साळुंखे | मनसे | प्र. क. ५ अ विश्रांतवाडी,<br>निमनगर झोपडपट्टी |
| ६. | अर्चना कांबळे | मनसे | प्र. क. ६ अ बोपोडी<br>किलोस्कर इंजिन ऑईल |
| ७. | शशिकला गायवाकड | काँग्रेस | प्र. क. ७ अ पुणे विद्यापीठ |
| ८. | संगिता गायकवाड | काँग्रेस | प्र. क. ७ ब. औंध गावठाण<br>सिंध कॉलनी |
| ९. | रंजना मुरकुटे | राष्ट्रवादी काँग्रेस | प्र. क. ९ अ  बाणेर बालेवाडी<br>गावठाण |
| १०. | रोहिणी चिमटे | राष्ट्रवादी काँग्रेस | प्र. क. १० अ<br>सुतारपाडी पाषाण |
| ११. | सुषमा निम्हण | राष्ट्रवादी काँग्रेस | प्र. क. १० ब<br>सुतारपाडी पाषाण |
| १२. | शारदा ओरसे | राष्ट्रवादी काँग्रेस | प्र. क. ११ अ<br>गोखलेनगर, जनवाडी |
| १३. | निलम कुलकर्णी | मनसे | प्र. क. १३ अ<br>मॉडेल कॉलनी, गोखलेनगर |

| | | | |
|---|---|---|---|
| १४. | आशा साने | मनसे | प्र. क. १३ अ<br>कमल नयन बजाज उद्यान |
| १५. | रेश्मा भोसले | राष्ट्रवादी काँग्रेस | प्र. क. १३ ब<br>कमल नयन बजाज उद्यान |
| १६. | मीना परदेशी | राष्ट्रवादी काँग्रेस | प्र. क. १४ अ<br>डेक्कन कॉलेज, येरवडा |
| १७. | शशिकला आर्डे | काँग्रेस | प्र. क. १५ अ नयी खराडी<br>लक्ष्मीनगर |
| १८. | शीतल सावंत | काँग्रेस | प्र. क. १६ ब<br>आर. टी. ओ. शांतीनगर,<br>झोपडपट्टी |
| १९. | मीनल सरवदे | राष्ट्रवादी काँग्रेस | प्र. क. १७ अ<br>अगारखान पॅलेस विक्रीकर<br>भवन |
| २०. | सुनिता गलांडे | काँग्रेस | प्र. क्र. १८ अ वडगाव शेरी<br>आदर्शनगर |
| २१. | सुमन पठारे | राष्ट्रवादी काँग्रेस | प्र. क्र. १९ ब<br>वडगाव शेरी, साईनगर |
| २२. | चंचला कोद्रे | राष्ट्रवादी काँग्रेस | प्र. क्र. २० अ<br>मुंढवा, मगरपट्टा सिटी |
| २३. | वनिता वागस्कर | मनसे | प्र. क्र. २१ अ<br>कोरेगाव पार्क, वाडिया कॉलेज |
| २४. | लताबाई राजगुरू | काँग्रेस | प्र. क्र. २२ अ नायडू रुग्णालय<br>ताडीवाला रस्ता |
| २५. | संगिता तिकोने | मनसे | प्र. क्र. २३ अ जुना बाजार<br>कुंभारवाडा |
| २६. | निलिमा खाडे | भाजप | प्र. क्र. २४ अ डेक्कन जिमखाना<br>घोले रस्ता |
| २७. | निता मंजाळकर | शिवसेना | प्र. क्र. २५ अ वडारवाडी<br>पांडवनगर |
| २८. | अश्विनी जाधव | काँग्रेस | प्र. क्र. २६ अ<br>केळेवाडी, एम.आय.टी. |
| २९. | वैशाली मराठे | काँग्रेस | प्र. क्र. २७ अ<br>किशीगंधानगर शिवतीर्थनगर |

| | | | |
|---|---|---|---|
| ३०. | जयश्री मारणे | मनसे | प्र. क्र. २८ अ परमहंसनगर वनाज कंपनी |
| ३१. | पुष्पा कमोजिया | मनसे | प्र. क्र. २९ ब बावधन खुर्द, वेदभवन |
| ३२. | भाग्यश्री दांगट | मनसे | प्र. क्र. ३० अ पॉप्युलरनगर वारजे |
| ३३. | लक्ष्मी दुधाणे | राष्ट्रवादी काँग्रेस | प्र. क्र. ३१ ब वारजे गावठाण |
| ३४. | सुरेखा मकवान | मनसे | प्र. क्र. ३२ अ हिंगणे स्त्री शिक्षण संस्था |
| ३५. | संगिता देशपांडे | शिवसेना | प्र. क्र. ३२ ब हिंगणे स्त्री शिक्षण संस्था |
| ३६. | मोनिका मोहोळ | भाजप | प्र. क्र. ३४ ब यशवंतराव चव्हाण नाट्यगृह |
| ३७. | मेधा कुलकर्णी | भाजप | प्र.क्र. ३५ ब, दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल |
| ३८. | माधुरी सहस्रबुद्धे | भाजप | प्र.क्र. ३६ ब प्रभात रस्ता, विधी महाविद्यालय |
| ३९. | मुक्ता टिळक | भाजप | प्र. क्र. ३७ ब नारायण पेठ नानावाडा |
| ४०. | अनिता डाखवे | मनसे | प्र.क्र. ३८ अ कसबा गणपती सूर्या हॉस्पिटल |
| ४१. | सोनम झेंडे | शिवसेना | प्र.क्र. ३९ अ के.ई. एम. हॉस्पिटल |
| ४२. | कल्पना बहिरट | मनसे | प्र.क्र. ४० अ रेल्वे स्टेशन डॉ. आंबेडकर भवन |
| ४३. | सुरेखा कवडे | राष्ट्रवादी काँग्रेस | प्र. क्र. ४१ ब सोपानबाग कवडेवाडी |
| ४४. | विजया कापरे | राष्ट्रवादी काँग्रेस | प्र. क्र. ४२ अ हडपसर गावठाण, वैदुवाडी |
| ४५. | रंजना पवार | राष्ट्रवादी काँग्रेस | प्र. क्र. ४३ ब आकाशवाणी साधना विद्यालय |
| ४६. | वैशाली बनकर | राष्ट्रवादी काँग्रेस | प्र. क्र. ४४ अ सातववाडी, ग्लायडिंग सेंटर |

| | | | |
|---|---|---|---|
| ४७. | कविता शिवरकर | काँग्रेस | प्र. क्र. ४६ ब, वानवडी रामटेकडी |
| ४८. | जिलेहुमा खान | काँग्रेस | प्र. क्र. ४७ ब सहकारनगर, राजेवाडी |
| ४९. | राजश्री आंदेकर | राष्ट्रवादी काँग्रेस | प्र. क्र. ४८ अ डोके तालीम, रामोशी गेट |
| ५०. | सुनंदा गडाळे | काँग्रेस | प्र. क्र. ४९ अ सिटी पोस्ट, गाडीखाना |
| ५१. | रुपाली पाटील | मनसे | प्र. क्र. ५० अ गोखले हॉल मंडई |
| ५२. | मनिषा घाटे | भाजप | प्र. क्र. ५१ ब टिळक रस्ता, लोकमान्यनगर |
| ५३. | मनिषा बोडके | राष्ट्रवादी काँग्रेस | प्र. क्र. ५२ ब दत्तवाडी, दांडेकर पूल |
| ५४. | मंजुषा नागपुरे | भाजप | प्र. क्र. ५३ अ आनंदनगर हिंगणे खुर्द |
| ५५. | युगंधा/भारती चाकणकर | मनसे | प्र. क्र. ५४ अ वडगाव धायरी सनसिटी |
| ५६. | संगिता कुदळे | राष्ट्रवादी काँग्रेस | प्र. क्र. ५५ अ सिंहगड इन्स्टिट्यूट वडगाव |
| ५७. | प्रिया गदादे | मनसे | प्र. क्र. ५६ ब जनता वसाहत |
| ५८. | स्मिता वस्ते | भाजप | प्र. क्र. ५७ अ सारसबाग, पर्वती |
| ५९. | प्रतिभा ढमाले | भाजप | प्र. क्र. ५८ अ मामलेदार कचेरी |
| ६०. | सुशिला ओसवाल | मनसे | प्र. क्र. ५९ अ समता भुमी |
| ६१. | हिना रफिक मोमीन | राष्ट्रवादी काँग्रेस | प्र. क्र. ६० अ जनवैध स्टेडियम |
| ६२. | नंदा लोणकर | राष्ट्रवादी काँग्रेस | प्र. क्र. ६१ अ शिंदे छत्री, वानवडी |
| ६३. | संगिता ठोसर | मनसे | प्र. क्र. ६२ ब कोंढवा बु॥ |

| | | | |
|---|---|---|---|
| ६४. | भारती बाबर | मनसे | प्र. क्र. ६३ ब<br>मिठानगर कोंढवा खु.॥ |
| ६५. | कविता वैरागी | भाजप | प्र. क्र. ६४ ब<br>सॅलेसबरी पार्क |
| ६६. | कमल व्यवहारे | राष्ट्रवादी काँग्रेस | प्र. क्र. ६५ ब<br>लोहियानगर |
| ६७. | मनिषा चोरबोले | भाजप | प्र.क्र. ६६ अ<br>एस. टी. वर्कशॉप |
| ६८. | अश्विनी कदम | अपक्ष | प्र.क्र. ६७ ब शिवदर्शन |
| ६९. | उषा जगताप | राष्ट्रवादी काँग्रेस | प्र.क्र. ६८ अ<br>सहकारनगर |
| ७०. | वर्षा तापकीर | भाजप | प्र.क्र. ६९ अ<br>राऊत बाग, धनकवडी |
| ७१. | अस्मिता शिंदे | मनसे | प्र.क्र. ७० ब के के मार्केट |
| ७२. | मानसी देशपांडे | भाजप | प्र.क्र. ७१ ब मार्केटयार्ड<br>महेश सोसायटी |
| ७३. | दिपाली ओसवाल | शिवसेना | प्र.क्र. ७२ ब<br>महेश सोसायटी अप्पर |
| ७४. | सुवर्णा पायगुडे | राष्ट्रवादी काँग्रेस | प्र.क्र. ७३ व बालाजीनगर<br>पुण्याईनगर |
| ७५. | मोहिनी देवकर | राष्ट्रवादी काँग्रेस | प्र.क्र. ७४ अ धनकवडी<br>भारती विद्यापीठ |
| ७६. | कल्पना थोरवे | शिवसेना | प्र.क्र. ७५ अ आंबेगाव |
| ७७. | भारती कदम | राष्ट्रवादी काँग्रेस | प्र.क्र. ७६ अ<br>सुखसागर नगर कात्रज |
| ७८. | वाडकर विजया पोपट | शिवनेता | प्र.क्र. ४५ ब. वगळेपडळ<br>महंमदवाडी |

संदर्भ : MA च्या (Research project Based Disertation) MA च्या विषयाकरिता सादर करण्यात आलेला लघुशोध प्रबंध. (२०११-१२) शितल रामचंद्र शेलार हे अभ्यासक आहेत.

प्रकरण ४

# पुणे महानगरपालिकेतील महिलांचे प्रतिनिधीत्व

**प्रस्तावना :**

महिलांसाठी ५०% आरक्षण हा आधुनिक जगात राजकीय घडामोडीत झालेली एक नवी क्रांतीच आहे. यामुळे महानगरपालिकेतील विकास व राजकीय, सामाजिक व आर्थिक बाबी यांचा जवळून अभ्यास करता येणार आहे.


**महाराष्ट्रातील राजकीय पक्ष :**

महाराष्ट्रामध्ये सहा राजकीय पक्ष हे वर्चस्व पातळीवर कार्यरत आहेत.

१) काँग्रेस, २) राष्ट्रवादी काँग्रेस ३) भारतीय जनता पार्टी ४) शिवसेना ५) महाराष्ट्र नवनिर्माण सेना ६) रिपाई

आलेख १ नुसार असे निर्देशनास येते की, वेगवेगळ्या पक्षातील महिला उमेदवार व स्वावलंबी उमेदवार तसेच महिलाचे राजकीय सक्षमीकरण हे राजकीय कारकिर्दीत किती टक्के झाले आहे हे दाखविले आहे.


२०% काँग्रेस, ४०% राष्ट्रवादी काँग्रेस, ११% शिवसेना, १५% भाजप, २०% मनसे आणि ६% इतर असे टक्केवारीनुसार वर्गीकरण केले आहे.



**सक्रीय राजकीय सहभाग :**

आलेख नं. २ वरून असे निर्देशनास येते की १९८० मध्ये ८% महिला राजकारणात सक्रीय होत्या तर १९९० मध्ये ४०%, २००० मध्ये ४९% आणि २०१० पासून २०११ पर्यंत ३% महिला राजकारणात सक्रीय सहभाग घेतलेला दिसत आहे.


यावरून असे लक्षात येते की १९९० नंतर आरक्षण धोरण जाहीर झाल्यामुळे महिलांचा राजकीय सहभाग वाढलेला आहे.



प्राथमिक माहिती

**महिलांच्या राजकीय सहभागाची पार्श्वभूमी :**


आलेख नं. ३ च्या सहाय्याने असे दिसून येते की, ४९% टक्के या गृहिणी आहेत, नोकरदार महिलांचे प्रमाण १२% आहे, व्यावसायिक महिलांचे प्रमाण हे १७% आहे तर २२% महिलांचे प्रमाण हे सामाजिक कार्य व शैक्षणिक कार्य यामधून सहभाग आहे.



प्राथमिक माहिती

**कारणे :**


आलेख नं. ४ च्या सहाय्याने असे निदर्शनास येते की, ९४% महिला या सामाजिक कार्यातून राजकारणात सक्रीय झाल्याचे मान्य करतात तर ६% महिला या त्यांना मिळालेली संधी व आवड यामुळे राजकारणात सक्रीय झाल्या आहेत.




प्राथमिक माहिती


**निवडणूक :**

आलेख नं. ५ च्या सहाय्याने असे दिसून येते की ६२% महिला यांनी प्रथम वेळा निवडणूक लढविली आहेत तर २३% महिलांनी द्वितीय वेळा, ५% महिलांनी तृतीय वेळा आणि १०% महिलांनी ४ वेळा निवडणूक लढविलेली आहे.





प्राथमिक माहिती

**विजयी महिला टक्केवारी :** आलेख नं. ६ वरून असे दिसून येते की / दाखविण्यात आले आहे की, १८% महिला या सामाजिक कार्य करत करत निवडणूक जिंकल्या / विजयी झाल्या आहेत तर ४२% महिला या पराभूत झालेल्या आहेत.





**कौटुंबिक पार्श्वभूमी :**

आलेख नं. ७ असे दाखवले की, ९७% महिलांना राजकीय वारसा हा जास्त मजबूत प्रमाणावर आहे. त्यामध्ये त्यांचे पती, वडील, भाऊ आणि इतर नातेवाईक हे सक्रीय राजकारणात आहेत. त्यामुळे त्यांना प्रोत्साहन मिळाले आहे. उलट ३% महिला या कोणत्याही प्रकारचा राजकीय संबंध नसणाऱ्या आहेत परंतु त्यांना मिळालेली संधी व आवड या कारणांमुळे त्यांचा राजकारणात सक्रीय सहभाग आहे.




**पाठिंबा :**

आलेख नं. ८ वरून असे दाखविण्यात येते की, पुरुष व महिला यांना कौटुंबिक पाठिंबा हा पुरेपूर प्रमाणात आहे. १००% पाठिंबा हा महिलांना त्यांच्या कुटुंबातून मिळालेला आहे. तसेच त्यांच्या कुटुंबातून त्यांना नैतिक, आर्थिक व मानसिक पाठिंबा हा पुरेपूर प्रमाणात मिळाला आहे. महिलांच्या म्हणण्यानुसार कौटुंबिक पाठिंबा नसता तर त्या त्यांचे ध्येय यशस्वीच करू शकल्या नसत्या.




**आरक्षण धोरण :**


आलेख नं. ९ वरून असे दर्शविण्यात येते की, ८०% महिलांनी त्यांची राजकीय कारकीर्द ही फक्त ५०% आरक्षण मिळाल्यामुहेच सुरुवात केली आहे. कारण आतापर्यंत पुरुषी वर्चस्वामुळे ते शक्य होत नव्हते. २०% महिलांचे म्हणणे असे आहे की महिला सक्षम असतील तर आरक्षणाची गरज नाही परंतु टक्केवारी ही कमी होईल.




५०% आरक्षणामुळे महिला या स्वत:ला सक्षम व समर्थ सिद्ध करू शकतील असे सांगितले आहे. तसेच सर्व समस्या म्हणजेच राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक या समजून घेऊन व्यवस्थितपणे महिला त्याचे निदान करू शकतात आणि राजकारणात सक्रीय सहभाग घेऊन उच्च पदावर कार्य करू शकतात.

**राजकारणातील महिलांची प्रगती :**

आलेख नं. १० वरून असे दर्शविण्यात येते की, ९२% महिलांनी ५०% आरक्षणामुळे सहभाग घेऊन आपली प्रगती केली आहे तर ५% महिलांनी व्यक्तिगत ध्येय व सामाजिक संबंध यांच्या माध्यमातून स्वत:ची राजकीय कारकीर्द विकासात्मक केली आहे.





**राष्ट्रीय पातळीवरील राजकारण :** आलेख नं. ११ वरून असे दिसून येते की १००% महिला या राष्ट्रीय पातळीवर राजकीय कारकीर्द सक्रीय करण्यात सक्षम आहेत. प्रत्येक महिला मध्ये उत्साह आहे. व त्या राष्ट्रीय पातळीवर प्रगती, शांतता राखण्याचे काम करू शकतात.



**निर्णय निर्मितीमध्ये सहभाग :**


आलेख नं. १२ वरून असे दिसून येते की, ४३% महिला या निर्णय निर्मिती प्रक्रियेमध्ये सहभागी आहेत व त्यांचे निर्णयांना मान्यता देण्यात येते. परंतु ५७% महिला या अशा आहेत की निर्णय प्रक्रियेमध्ये सहभागी असतात परंतु त्यांचे निर्णय ग्राह्य धरले जात नाहीत. त्यांची अधिमान्यता व परिणामकारकता राजकीय व्यवस्थेत मान्य केली जात नाही.




प्राथमिक माहिती

**सहभागी पातळी :**


आलेख नं. १३ वरून असे दिसून येते की, ११% महिलांना राज्य पातळीवरच्या राजकारणामध्ये संधी देण्यात आली आहे व त्यानुसार त्यांना स्वत:ला सिद्ध करण्याचे व ध्येय साध्य करण्याचे राजकीय रचनेमध्ये स्थान मिळाले आहे. ८९% महिलांना महानगरपालिकामध्ये कार्य करण्याची संधी मिळालेली आहे. परंतु राज्य व राष्ट्रीय पातळीवर कार्य करण्याची संधी त्यांना आतापर्यंत मिळालेली नाही.




प्राथमिक माहिती


**राजकारणातील न्याय :**

आलेख नं. १४ वरून असे दिसून येते की, ६५% महिलांना राजकारणात न्याय मिळाला आहे त्यांना पुरुषाबरोबर समान धरले जात आहे व त्यांना अधिकार देण्यात आले आहेत. परंतु ३५% महिलांना राजकीय न्याय मिळाला नाही त्यांना पुरुषांबरोबर समान धरले जात नाही.




**समस्या :**

आलेख नं. १५वरून असे दिसून येते की, ७५% महिला या समस्यांचे निराकरण अगदी जवळून करतात तर २५% महिला या समस्यांचे निराकरण करण्यात असमर्थ आहेत आणि ५०% आरक्षणामुळे महिलांना समस्या सोडविण्यासाठी अगदी सोपे होणार आहे व त्यांच्यामुळे सत्ता व अधिकार आले आहेत.



**निष्कर्ष :**

वरील सर्व आलेखांवरून असे स्पष्ट होते की महिला या राजकारणामध्ये सक्रीय सहभाग घेवून प्रशासकीय कामे  व राजकीय स्थिती हे दोन्ही व्यवस्थितपणे सांभाळू शकतात. किंवा त्यांचे व्यवस्थापन व्यवस्थितपणे करू शकतात. सामाजिक पातळीवर समस्या व भावना यांचा विचार करून ते त्या आत्मविश्वासाने, काळजी घेऊन सोडवू शकतात.

तसेच ज्या राष्ट्रीय पातळीवर महिला कार्यरत आहेत, त्यांनी त्यांच्या अनुभवांची चर्चा केली तर महिलांमध्ये उत्साह निर्माण होऊन त्या अधिक सक्रीयपणे कार्य करू शकतात.

पुणे मनपातील महिलांच्या प्रतिनिधीत्वाचा अभ्यास करताना असे दिसून आले की, महिला या सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक या सर्व दृष्टिकोनातून त्यांना मिळालेल्या संधीमुळे व आरक्षणामुळे सक्षम झालेले आहे.

प्रकरण ५

# निष्कर्ष

**प्रस्तावना :**

पुणे महानगरपालिकेत महिलांचा राजकीय सहभाग हा सार्वत्रिक निवडणूक २०११-१२ मध्ये पुरुषांपेक्षा जास्त आहे. म्हणजेच एकूण जागेपैकी ७८ महिला नगरसेविका आहेत तर ७४ पुरुष नगरसेविका आहेत.

२०११-१२ च्या निवडणुकीचा विचार करून असे दिसून येते की, ५०% आरक्षण हे जाहीर झाल्यामुळे महिलांचा राजकीय सहभाग हा वाढला आहे. तसेच त्यांचा निर्णय प्रक्रियेमध्ये देखील सहभाग वाढला आहे.

ज्या महिला नगरसेविका म्हणून निवडून आल्या आहेत. त्यांचा आर्थिक दृष्टिकोनातून विचार करता सर्व स्तरातील महिला या आर्थिकदृष्ट्या सक्षम आहेत. म्हणजेच यातील महिला गृहिणी, नोकरदार, व्यावसायिक अशा विविध स्तरातील आहेत. ज्या महिला नगरसेविका म्हणून निवडून आल्या आहेत त्यांनी स्वावलंबी वृत्ती दर्शविलेली आहे.

महिला नगरसेविकांचा कोणतेही समस्या किंवा अडचणअसेल तर त्या पुरुषसत्ताक दृष्टिकोनातून न पाहता एक महिला म्हणून ती समस्या जाणून घेऊन त्या दृष्टीने ती कशी सोडविता येईल याचा विचार करताना दिसतात.

पुणे महानगरपालिकेत ज्या महिला विजयी जाळ्या आहेत त्यातील ९९% महिलांना राजकीय वारसा आहे तर फक्त १% महिला अशा आहेत त्यांना कसल्याही प्रकारचा राजकीय वारसा नाही पण स्वत:चे कर्तृत्व व आवड या जोरावर त्यांना विजय मिळाला आहे. याचा अर्थ असा होत नाही ज्या ९९% महिला आहेत त्यांना जिद्द, आवड व कर्तृत्व नाही फरक एवढाच आहे की त्या त्यांच्या घरातील पती, सासरे, दिर, जाऊ, काका, काकू किंवा भाऊ यांच्या राजकारणातील सक्रीय सहभागामुळे राजकारण व समाजकारण यामध्ये सहभाग घेतला आहे. म्हणजेच त्यांनी

राजकारण व समाजकारण हे खूप जवळून पाहिले आहे.

**निष्कर्ष :**

२०११-१२ च्या निवडणुकीचा अभ्यास करता असेही दिसून येते की, महिलांचा राजकीय सहभाग हा ५०% आरक्षण धोरण जाहीर झाल्यामुळे नाही तर त्या पूर्वीपासूनच समाजकार्यात सहभागी होत्या.

महिलांसाठी स्थानिक स्वराज्य संस्थेत ५०% आरक्षण जाहीर झाले आणि महिलांचा राजकारणातील सहभाग वाढला आहे. २००७ मध्ये महिलांचा केवळ ३०% सहभाग परंतु २०११-१२च्या  निवडणुकीत तो ५०% च्या वरती गेला आहे.

२००२ च्या निवडणुकीत काँग्रेस, रा. काँग्रेस व शिवसेना-भाजप युती अशी तिहेरी स्पर्धा झाली होती. पॅनेल पद्धतीने निवडणुका झाल्या होत्या. खुल्या गटातील व इतर मागास गटातील जागा असल्याने तिकीट वाटपात फारशी बंडखोरी झाली नाही.

हडपसर, सिंहगडरस्ता, नगररस्ता या भागातून रा. काँग्रेसचे उमेदवार मोठ्या संख्येने निवडून आले होते. राष्ट्रवादीने या वेळेस प्रथम महानगरपालिका निवडणूक लढविली होती. शिवाजीनगर व कसबा पेठ विधानसभा मतदारसंघात शिवसेना भाजप युतीचा प्रभाव राहिला. परंतु युतीला काँग्रेस राष्ट्रवादीला एकमेकांच्या विरोधी निवडणूक लढवून जास्त फायदा झाला नाही.

बोपोडी, पर्वती, कॉन्टेनमेंट विधानसभा मतदार संघात काँग्रेसचा प्रभाव राहिला.

२००२ च्या निवडणुकीमध्ये पुणे शहरातील प्रभावी मराठी गटाला म्हणजे ज्यांची काँग्रेसमध्ये कोंडी होत होती त्यांना राष्ट्रवादी काँग्रेसच्या रूपाने नवा पक्ष मिळाला. काँग्रेसचा प्रभाव झोपडपट्टी विभागात तर भाजप, शिवसेना प्रभाव पेठांमध्ये कायम राहिला.

पक्ष निहाय विचार करता काँग्रेसचे वर्चस्व होते तर जाती निहाय विचार करता मराठा-कुणबी समाजाचे वर्चस्व होते.

२००४ ची विधान सभा निवडणुकीत काँग्रेसला ३ जागा, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना व भाजप यांना प्रत्येकी १ जागा मिळाली होती. शिवसेनेची एक जागा - भवानी पेठ मतदार संघातील काँग्रेसकडे गेली होती तर शिवाजीनगर मतदार संघात राष्ट्रवादी काँग्रेसकडे उमेदवार नसल्याने काँग्रेसमधून अधिक भोसले यांना राष्ट्रवादी काँग्रेसने आयात केले. २००४ च्या विधानसभा निवडणुकीत राजकीय क्षेत्रात तीन बदल झाले -

१) शिवाजीनगर, मतदारसंघातील शिवसेनेचे आमदार कॉ. नारायण राणे यांच्याबरोबर गेले.

२) भवानी पेठ मतदार संघातील शिवसेनेचे माजी आमदार दीपक पायगुडे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेत गेले.

३) शिवाजीनगर मतदार संघातील मुळचे काँग्रेसचे अनिल भोसले राष्ट्रवादी काँग्रेसच्या तिकीटावर पुन्हा नगरसेवक झाले.

तसेच विधानसभा पुर्नरचना अहवालात बोपोडी मतदारसंघ जाऊन वडगाव शेरी हा नवीन मतदार संघ तयार झाला. (contoment) विधान सभा संघाचे दोन भाग झाले. काँग्रेसचा प्रभाव असणारा भाग नवीन हडपसर मतदार संघात जोडला गेला.

२००७ च्या महानगरपालिका निवडणुकीनंतर काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस यांनी एकत्र येवून महानगरपालिकेवर नियंत्रण ठेवले व महानगरपालिकेतील सत्तापदे वाटून घेतली. या काळात पुणे शहरात आयटी, उद्योग, बांधकाम उद्योग व औद्योगिक वसाहती मोठ्या प्रमाणात वाढल्या. सेवाक्षेत्रे, रोजगार संधी यांच्यात वाढ झाली. त्यामुहे पुणे शहराच्या बाजारपेठांची उलाढाल हजार कोटींवर पोहोचली.

२००२ चा अर्थसंकल्प ४५० कोटीचा होता तो २००७ मध्ये १७०० वर पोहचला. ही वाढ निवासी जागांवरील कर व जकात यातून झाली. केंद्र शासनाने शहरी भागाच्या विलासाकरिता मोठा निधी उपलब्ध केला या निधीच्या वापराचे नियोजन कसे करायचे यावरून राष्ट्रवादी काँग्रेस काँग्रेसची कोंडी करायला सुरुवात केली. राज्य सरकारच्या झोपडपट्टी पुर्न:विकास योजनेअंतर्गत झोपडपट्टी धारकांना २५० चौ. फुटांची घरे मोफत देऊन उरलेल्या जागा वापर करण्याचे अधिकार बांधकाम व्यावसायिकांना मिळणार होते. या योजनेचे अध्यक्षपद अजित पवार यांना सुरेश कलमाडी यांनी मिळू दिले नाही.

पुणे शहरातील एकूण लोकसंख्येपैकी ४२% लोकसंख्या झोपडपट्टीत राहते. निवडणुकीच्या दृष्टीने झोपडपट्टी हा सर्वात मोठा मतदार संघ आहे. झोपडपट्टीतील राहणारे बहुसंख्य दलित समाजाचे असल्याने राष्ट्रवादीने त्यांचे मोठे मेळावे भरविले व ३५० चौ. फुटांची घरे देण्याचे आश्वासन दिले. मराठी समाजाला काँग्रेसमध्ये डावलले जाने अशी काँग्रेसवर टिका करून राष्ट्रवादीने झोपडपट्टी मतदार आपल्या प्रभावाखाली आणल्याचा प्रयत्न केला.

२००७ मध्ये महापालिका निवडणुकीत एकूण वार्ड १४४ होती. त्यापैकी खुले मतदार संघ ८८ इतर मागासवर्गीय ३९, अनुसूचित जाती १६, अनुसूचित जमाती १ अशी वर्गवारी होती. या निवडणुकांमध्ये माळी, मराठा. कुणबी या जातींचा प्रभाव राष्ट्रवादी काँग्रेसच्या रूपाने पुन्हा प्रस्थापित झाला.

२००२ साली मराठा, माळी, कुणबी या जातीचे ७४ नगरसेवक होते. व २००७ साली ८३ नगरसेवक झाले. राष्ट्रवादी काँग्रेसच्या या नगरसेवकांपैकी ३० नगरसेवक या तीन जातींचे आहेत. २००७ च्या निवडणूक निकालानंतर राष्ट्रवादी काँग्रेस व काँग्रेस यांची आघाडी झाली नाही. राष्ट्रवादी काँग्रेसने उपमहापौर पद शिवसेनेला देवून त्यांच्याबरोबर युती केली.

बहुमतासाठी काही अपक्षांचा पाठिंबा राष्ट्रवादी काँग्रेसने घेतला. तरीही बहुमत पूर्ण होत नसल्याने भाजप पक्षाने विरोधी पक्षनेतेपदाच्या बदल्यात सभागृहात गैरहजर राहून राष्ट्रवादी काँग्रेसला मदत केली. राष्ट्रवादी काँग्रेसला व शिवसेना यांची युती पुणे पॅटर्न ओळखली जाते.

**२०११-१२ च्या पुणे महानगरपालिकेत तीन मोठे राजकीय बदल घडून आले.** ते म्हणजे

१) पुणे महानगरपालिकेत महाराष्ट्र नवनिर्माण सेना हा पक्ष विरोधी पक्ष म्हणून उदयास आला.

२) महानरगपालिकेतील महिला नगरसेविकांची टक्केवारी पुरुष टक्केवारीपेक्षा जास्त आहे.

३) राष्ट्रवादी काँग्रेसने आपले वर्चस्व कायम राखत पालिकेची सत्ता स्वत:च्या वर्चस्वासाठी ठेवली व महापौर हे पद मराठा समाजाच्या स्त्रीला न देता ते इतर मागासवर्गीय प्रवर्गातील स्त्रीला दिले होते.

वरील तीन बदल सर्वात महत्त्वाचे बदल आहेत.

१) महिलांच्या राजकीय सहभागाचा वाढलेला पाहून असे लक्षात येते की महापालिकेतील धोरणांचा प्रभाव महाराष्ट्राच्या धोरणावर पडतो.

२) महापालिकेच्या निवडणुकीसाठी महिलांनी प्रचार पद्धतीत स्वत:च्या पक्षाचे व कार्याचे प्रचार मोठ्या प्रमाणावर केला होता. काही महिलांनी तर प्रचारासाठी रजा घेवून कार्य केले होते. तर काही महिलांनी फक्त दोन महिने अगोदरच राजकारणात येण्याचा निर्णय घेतला होता.

३) महिला नगरसेविकांच्या मुलाखतीतून असे दिसून आले की केवळ आरक्षण मिळाल्यामुळे त्यांनी राजकारणात सहभाग किंवा निर्णय प्रक्रियेत सहभाग घेण्याचा निर्णय घेतला.

४) महापालिकेतील महिला नगरसेविकांच्या मुलाखतीतून असे दिसून आले की काही महिलांचे शिक्षण हे फारच कमी आहे. परंतु त्यांना असलेला राजकीय वारसा व पक्षाचा पाठिंबा यामुळे त्या विजयी झाल्या आहेत.

२०११-१२ च्या महापालिका निवडणुकीत सर्वात जास्त महिला ह्या मराठा व कुणबी

मराठा या समाजातील आहेत. तर अनुसूचित जाती व जमातीतील महिलांचे प्रमाण कमी आहे. त्याचप्रमाणे इतर मागासवर्गीय महिलांचे प्रमाण ही मध्यम आहे.

शिक्षणाच्या दृष्टिकोनातून पाहिले असता असे दिसून आले की काही महिला ह्या ०-१२ पर्यंत शिक्षण झालेल्या आहेत. काही महिला नगरसेविका ह्या पदवीधर आहेत तर खूप कमी महिला ह्या पद्व्युत्तर व उच्चशिक्षित आहेत. परंतु ज्या उच्चशिक्षित होत्या त्या नोकरी करत होत्या व फक्त आरक्षण मिळाल्यामुळे व प्रभाग मिळाल्यामुहे त्यांनी राजकारणात सहभाग घेतला परंतु याचा अर्थ असा नाही की फक्त आरक्षणच आवश्यक होते तर त्यांना यापूर्वीही राजकारणात सहभाग घ्यायचा होता पण फक्त जागा उपलब्ध नसल्यामुळे त्यांना सहभाग घेता आला नाही.

महापालिकेतील महिला नगरसेवक या निवडणूक लढविण्याअगोदर समाजकार्य करत होत्या त्यांनी यापूर्वी सांस्कृतिक व सामाजिक उपक्रमातून आपला सहभाग दाखविला होता. महिलांना राजकीय वारसा असल्या कारणामुळे त्या त्यात पूर्णपणे सहभागी होत असत.

सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये हळदी-कुंकू, गौरी-सजावट स्पर्धा, दांडिया स्पर्धा, यासारखे कार्यक्रम महिलांसाठी नियोजित केले जात होते तसेच महिलांचे सक्षमीकरण व सबलीकरण व्हावे यासाठी बचत गटाच्या माध्यमातून त्यांना रोजगार उपलब्ध करून दिला जात असे व आर्थिक मदत करण्याचा प्रयत्न करत असे.

सामाजिक उपक्रमामध्ये महिलांसाठी आरोग्य शिबिरे भरवली जात असे त्यामध्ये महिलांचे अडचणी व समस्या यावर बोलण्यासाठी व्यासपीठ निर्माण केले जात असे. विविध कार्यक्रमाच्या वेळेत रक्तदान शिबिरे आयोजित करून लोकांमध्ये जनजागृती करण्याचा प्रयत्न केला जात असे.

तसेच स्त्री-भ्रूण हत्या थांबवावी यासाठी विशेष करून पथनाट्य आयोजित करण्यात येत असे.

झोपडपट्टी मात्र हा प्रत्येक विभाग किंवा प्रभागांतर्गत येतो व त्याठिकाणी सर्व सोयीसुविधांचा अभाव आहे. त्याची परिपूर्तता करण्यासाठी महिला नगरसेविका यांनी पुढाकार घेतला आहे.

एकीकडे काही प्रमाण हे उच्चवर्गीय म्हणून ओळखले जातात तर काही प्रभाग हे कनिष्ठ वर्गीय म्हणून ओळखले जातात. काही ठिकाणी सर्व सुखसोयी आहेत तरि काही ठिकाणी मात्र पाण्यासाठी देखील वणवण करावी लागत आहे अशी स्थिती असल्याकारणाने महिला नगरसेविकांनी त्या अडचणी जवळून जाणून घेतल्या व तेथील सोयीसुविधा पूर्ण करण्यासाठी पालिकेचे दार ठोठावले आहे व यातूनच त्यांचा गरीब श्रीमंत ही दरी कमी करण्याचा विचार आहे.

ज्या सुशिक्षित महिला आहेत त्यांनी त्याच्या प्रभागातील व इतर प्रभागातील देखील झोपडपट्टी भागातील महिलांचे पुर्नवसन, शिक्षण, आरोग्य यांची  व्यवस्था करण्यासाठी मनपाचे दवाखाने व शाळा निर्माण करण्याचा प्रस्ताव पालिकेसमोर मांडला आहे. सुशिक्षित महिला नगरसेविकांनी महिलांसाठी रात्रशाळा व विविधी संधी निर्माण करून देण्यासाठी प्रयत्न करत आहेत व वेळोवेळी पालिकेकडे निवेदन सादर केले आहे.

बचत गटाच्या माध्यमातून महिलांना रांगोळी, मेहंदी कोर्स, ब्युटीपार्लर कोर्स यांचे प्रशिक्षण दिले जात आहेत. त्याचबरोबर महागाई विरोधात तोंड देण्यासाठी जोडधंदा व व्यवसाय याचे प्रशिक्षण दिले जात आहेत.

महिलांनी स्वत: सक्षम व्हावे यासाठी त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करून त्यांचे सबलीकरण करण्याचे प्रयत्न केला जात आहे.

आजच्या परिस्थितीचा विचार करता पालिकेमध्ये महापौर पद हे एका महिलेकडेच आहे. त्यामुळे त्या महिलांचे प्रश्न जास्तच समजून घेऊन कार्य करतील अशी आशा व्यक्त केली जात आहे.

कचरा, पाणी व वीज हे महत्त्वाचे तीन प्रश्न आहेत की ज्यावर उपाय करण्यासाठी सर्वच महिला नगरसेविका प्रयत्न करत आहेत.

रस्ता व वाहतुककोंडी हे पुण्यातील प्राथमिक स्वरूपाची समस्या आहे व ती सोडविण्यासाठी प्रत्येक प्रभागार्गंत किंवा विभागातंर्गंत रस्त्याचे चौपदीकरण किंवा रस्ता रुंदीकरण करण्यासाठी विशेष प्रयत्न चालू केले आहेत.

महिलांसाठी व लहान मुलांसाठी उद्याने व क्रिंडागणे निर्माण करावीत यासाठी काही महिला नगरसेविका या प्रयत्नशील आहेत. तसेच पालिका शाळा व दवाखाना यांचे नुतनीकरण करून त्याठिकाणी चांगल्या प्रकारे सुविधा कशा देता येतील याकडे त्यांनी लक्ष केंद्रित केले आहे.

समाजातील जेष्ठ नागरिकांना विरंगुळा देण्यासाठी हास्य क्लब, विरंगुळा केंद्रे व वाचनालय यांची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी काही प्रभागातील खास करून पेठेतील महिला नगरसेविका प्रयत्नशील आहेत.

वाहतुकीची समस्या ही प्रत्येक विभागातील व प्रभागातील समस्या आहे व ती सोडविण्यासाठी सर्व महिला नगरसेविका प्रयत्न करत आहेत. विविध प्रकारे पालिकेमध्ये नियोजन आराखडा सादर केला जात आहे व त्यावर विचार करण्यासाठी  दबाव आणला जात आहे.

काही ठिकाणी महिलांसाठी स्वच्छता गृहेदेखील नाहीत ती निर्माण करण्यासाठी प्रयत्न चालू केले आहेत व कचरा व्यवस्थापनासाठी प्रत्येक प्रभागात घंटागाडी चालू करण्यात आली आहे.

महिलांसाठी व मुलींसाठी सांस्कृतिक कार्यक्रम व सामाजिक कार्यक्रम घेवून त्यामधून त्यांची मानसिकता बदलण्यासाठी प्रयत्न केले जात आहे.

पालिकेमध्ये मनसे हा पक्ष विरोधी पक्ष म्हणून कार्यरत आहे व या पक्षातर्फे विविध योजना राबविण्यासाठी व जनतेच्या कल्याणासाठी प्रयत्न केले जात आहेत.

विधवा स्त्रियांना पेन्शन योजना चालू करून त्यांचे आर्थिक सबलीकरण केले जात आहे. त्याचबरोबर त्यांचे व इतर महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी वेळोवेळी सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून जागृती केली जात असते.

ज्या ठिकाणी ड्रेनेजची समस्या आहे त्याठिकाणी नवीन ड्रेनेजची पाईप लाईन टाकून ते सुधारले आहे. पेठेमध्ये काही जुने वाडे आहेत त्यामध्ये नुतनीकरण करण्यासाठी विशेष प्रयत्न चालू केले आहेत.

गुरुकुल व पुनर्वसन योजनेच्या माध्यमातून गरीब लोकांसाठी घरे देण्यात आली आहेत व पाणी व वीज हे देखील त्या ठिकाणी उपलब्ध करून दिले जात आहे. त्या ठिकाणी सर्व शिक्षा अभियानाच्या माध्यमातून सर्वांना शिक्षण दिले जात आहे.

**गृहितकांचा शोध :**

एकंदरीत २०११-१२ च्या महानगरपालिका निवडणुकीच्या अभ्यासातून असे दिसून आले की,

१) महिलांचा सहभाग हा २००२ आणि २००७ च्या महानगरपालिका निवडणुकीपेक्षा वाढलेला आहे.

२) महिलांचा राजकीय सहभाग हा जास्त करून राजकीय वारसा लाभला असल्याने आहे त्यांनी राजकारण व समाजकारण यामध्ये फारकत केलेली नाही.

३) बहुतेक महिलांनी असे सांगितले आहे समाजकार्याची आवड असल्याने राजकारणात राजकीय सहभाग घेतला आहे परंतु खरे कारण हे त्या फक्त राजकीय वारसा असल्यानेच राजकारणात सहभागी झाल्या आहेत.

४) २०११-१२ च्या निवडणुकीतून असेही निदर्शनास आले की मूलभूत समस्या ह्या जास्त बिकट आहेत व त्यामध्ये सुधारणा करण्याची गरज आहे.

५) आतापर्यंतच्या निवडणुकींचा अभ्यास केला असता असे दिसून आले पुरुषांचा सहभाग हा जास्त प्रमाणात होता पण कार्यामध्ये तत्परता ही दिसून येत नव्हती.

६) महिलांच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक या चारही दृष्टिकोनातून विचार केला जात आहे व त्यातूनच त्यांचे सक्षमीकरण व सबलीकरण करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

७) युवा पिढी उदा. भारती चाकणकर व प्रिया कादावे या सारख्या मुली देखील आरक्षणामुळे राजकीय सहभाग घेताना दिसतात व जनतेने देखील त्यांना स्वीकारले आहे.

८) महापालिका निवडणुकीतून असेही दिसून आले की बचत गट ही सध्या महिलांसाठी आर्थिक गरज भागविण्याची व रोजगार संधी मिळविण्याचे एक महत्त्वाचे साधन आहे.

९) पुणे महानगरपालिका निवडणुकीत असेही दिसून आले की महिलांच्या राजकीय सहभागामुळे महिलांच्या मानसिकतेत बदल होत आहे व त्यांचा राजकारणामुळे बघण्याचा दृष्टिकोन बदलत आहे.

१०) परंतु असे असले तरी एका बाजूला महिलांचा राजकीय सहभाग वाढला आहे तर दुसऱ्या बाजूला पक्षांचे राजकारण देखील वाढले आहे.

११) २०११-१२ च्या निवडणुकीत असे दिसून येते की पक्ष कोणताही असो महिला आरक्षण मिळाल्यामुळे जनतेने समाजकार्य करणाऱ्या महिलेचा नगरसेविका म्हणून स्वीकार केला आहे व एकत्रितपणे काम करण्याचा देखील निर्धार केला आहे.

१२) परंतु महिलांचा राजकीय सहभाग वाढला असला तरी काही प्रमाणात काही प्रभागामध्ये महिला या निर्णय प्रक्रियेत सहभागी होताना दिसत नाहीत तर त्या ठिकाणी पुरुषी वर्चस्व दिसून येते.

१३) महानगरपालिका निवडणुकीमध्ये सर्वात महत्त्वाचा फरक असा दिसून येतो तो म्हणजे नेतृत्व बदल होय.

नेतृत्व बदल असा की महिलांचा वाढलेला सहभाग हा राजकारण व समाजकारण यांना नवीन दिशा देणारा आहे.

१४) सर्वात शेवटी ते म्हणजे या निवडणुकीमध्ये सर्व जातीतील स्त्रियांनी सहभाग घेतला आहे व त्या विजयी देखील झाल्या आहेत. परंतु जातीचे वर्चस्वाचा विचार करून सर्वात जास्त वर्चस्व हे मराठा कुणबी समाजाचे आहे.

१५) महिलांचे राजकीय सक्षमीकरण होताना दिसते.

**उपाययोजने**णे.

* महिलांना नियोजन व कृती यामध्ये सहभागी करून घेवून जागा उपलब्ध करून देणे हे महत्त्वाचे आहे.

* निर्णय निर्मिती प्रक्रियेमध्ये महिलांच्या विचारांच्या सकारात्मक दिशेने विचार करून घेता येईल अशा प्रकारची राजकीय यंत्रणा निर्माण करणे.

* भ्रष्टाचार आणि राजकारणातील गुन्हे यांना नियंत्रण करणे.

* शहरी व ग्रामीण भागातील शासन यंत्रणेने विजयी झालेल्या महिला उमेदवारांसाठी विशेष प्रशिक्षण कॅम्पचा सल्ला देणे.

महिलांची राजकारणातील भूमिका व प्रतिनिधीत्व काय आहे तसेच कार्य व जबाबदारी काय आहे याची परिपूर्ण माहिती पुरविणे बंधनकारक करणे आवश्यक आहे.

५०% आरक्षण आहे त्याचप्रमाणे निर्णय निर्मिती प्रक्रियेमध्ये महिलांना सहभागी करून घेणे आवश्यक आहे.

*प्रसारमाध्यमांनी महिलांना राजकारणात सक्रीय सहभाग घेण्यासाठी त्यांना प्रोत्याहन दिले पाहिजे. यासाठी त्यांनी ज्या महिला राजकारणात यशस्वीरीत्या सक्रीय आहेत त्यांचे कार्य व परिणाम यांची माहिती सकारात्मक दृष्टिकोनातून दाखविलेली व सांगितली गेली पाहिजे.

* महिलांच्या अधिकाराचा फायदा इतर वर्चस्व धारी घेऊ शकणार नाहीत याची जागृती महिलांमध्ये केली पाहिजे.

## संदर्भ ग्रंथ सूची


१) पुणे विद्यापीठ अंतर्गत MA च्या Research Project Based Dissertation या विषयासाठी सादर करण्यात आलेला अप्रकाशित लघुशोध प्रबंध वर्ष २०११-१२
(श्री. वि.पां. कुंभार अण्णासाहेब मगर कॉलेज, पा नं. ३ ते ११)

२) डॉ. प्रकाश पवार, २०११, समकालीन राजकीय चळवळ : नवहिंदुत्व व जातसंघटना (संपादक - प्रकाश पवार, डायमंड प्रकाशन, पृ.क्र. १८८-१९८)

३) डॉ. वैशाली पवार, २०१२, महिलांच्य सत्ता संघर्षाचा आलेख (डायमंड प्रकाशन (पृ.क्र. १ ते १५८)

४) पुणे विद्यापीठ अंतर्गत MA च्या Research Project Based Dissertation या विषयासाठी सादर करण्यात आलेला अप्रकाशित लघुशोध प्रबंध वर्ष २०११-१२
(कु. शेलार शितल रामचंद्र, अण्णासाहेब मगर कॉलेज, पृ. क्र. १ ते २२)

५) महिला नगरसेविकांची प्रत्यक्ष मुलाखती (सर्वेक्षण पद्धतीद्वारा)

६) मिनाक्षी सूद आणि हिमानी नौटियाल, (Report of Statistics on women in India 2010 (Published by National Institute of Public Cooperation and child development, New Delhi- 110016, page no. 343 to 359)

७) Kothari C. R. Research Methodology and Techniques, Darmesh Printers, Delhi, 2004, pg. 60.

८) Basu Durga Das, Introduction to the Constitution of India, Wadhwa and Company, Law Publishers, New Delhi, 19th Edition 2004, pg. 273.

९) मुंबई निवडणूक आयोग कार्यालयातील प्रा. वाय. एल. राजवडे यांनी सादर केलेला अहवाल.

## नियतकालिके व वर्तमानपत्रे लेख सुची

१) महाराष्ट्र टाईम्स, पुणे आवृत्ती, ऑगस्ट २०११ ते फेब्रुवारी २०१२
२) लोकसत्ता, पुणे आवृत्ती, ऑगस्ट २०११ ते फेब्रुवारी २०१२
३) सकाळ, पुणे आवृत्ती, ऑगस्ट २०११ ते फेब्रुवारी २०१२

**संकेत स्थळ :**

ww.punemahanagarpalika.com
www.stateelection commission.com

## पुणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक - २०१२

### प्रभाग आरक्षण सोडत : (एकुण प्रभाग - ७६ एकुण संदस्य संख्या -१५२)

| प्रभाग क्रमांक | आरक्षण सोडतीनुसार निश्चिम झालेली जागा | |
|---|---|---|
| | अ | ब |
| १ | सर्वसाधारण महिला | सर्वसाधारण |
| २ | नागरीकांचा मागासवर्ग | सर्वसाधारण महिला |
| ३ | नागरीकांचा मागासवर्ग महिला | सर्वसाधारण |
| ४ | सर्वसाधारण महिला | सर्वसाधारण |
| ५ | नागरीकांचा मागासवर्ग महिला | सर्वसाधारण |
| ६ | अनुसूचित जाती महिला | सर्वसाधारण |
| ७ | अनुसूचित जाती महिला | सर्वसाधारण |
| ८ | नागरीकांचा मागासवर्ग | सर्वसाधारण महिला |
| ९ | सर्वसाधारण महिला | सर्वसाधारण |
| १० | अनुसूचित जमाती | सर्वसाधारण महिला |
| ११ | सर्वसाधारण महिला | सर्वसाधारण |
| १२ | सर्वसाधारण महिला | सर्वसाधारण |
| १३ | अनुसूचित जाती महिला | सर्वसाधारण |
| १४ | अनुसूचित जाती महिला | सर्वसाधारण |
| १५ | अनुसूचित जाती महिला | सर्वसाधारण |
| १६ | अनुसूचित जाती | सर्वसाधारण महिला |
| १७ | अनुसूचित जाती महिला | सर्वसाधारण |
| १८ | नागरीकांचा मागासवर्ग महिला | सर्वसाधारण |
| १९ | नागरीकांचा मागासवर्ग | सर्वसाधारण महिला |
| २० | नागरीकांचा मागासवर्ग महिला | सर्वसाधारण |
| २१ | नागरीकांचा मागासवर्ग | सर्वसाधारण महिला |
| २२ | अनुसूचित जाती महिला | सर्वसाधारण |
| २३ | अनुसूचित जाती | सर्वसाधारण महिला |
| २४ | सर्वसाधारण महिला | सर्वसाधारण |
| २५ | नागरीकांचा मागासवर्ग महिला | सर्वसाधारण |
| २६ | सर्वसाधारण महिला | सर्वसाधारण |
| २७ | नागरीकांचा मागासवर्ग महिला | सर्वसाधारण |
| २८ | सर्वसाधारण महिला | सर्वसाधारण |
| २९ | नागरीकांचा मागासवर्ग | सर्वसाधारण महिला |
| ३० | सर्वसाधारण महिला | सर्वसाधारण |
| ३१ | नागरीकांचा मागासवर्ग | सर्वसाधारण महिला |
| ३२ | नागरीकांचा मागासवर्ग महिला | सर्वसाधारण |
| ३३ | नागरीकांचा मागासवर्ग | सर्वसाधारण महिला |
| ३४ | नागरीकांचा मागासवर्ग | सर्वसाधारण महिला |
| ३५ | नागरीकांचा मागासवर्ग | सर्वसाधारण महिला |
| ३६ | नागरीकांचा मागासवर्ग | सर्वसाधारण महिला |
| ३७ | नागरीकांचा मागासवर्ग | सर्वसाधारण महिला |
| ३८ | नागरीकांचा मागासवर्ग महिला | सर्वसाधारण |
| ३९ | नागरीकांचा मागासवर्ग महिला | सर्वसाधारण |
| ४० | नागरीकांचा मागासवर्ग महिला | सर्वसाधारण |
| ४१ | अनुसूचित जाती | सर्वसाधारण महिला |
| ४२ | नागरीकांचा मागासवर्ग महिला | सर्वसाधारण |
| ४३ | नागरीकांचा मागासवर्ग | सर्वसाधारण महिला |
| ४४ | नागरीकांचा मागासवर्ग महिला | सर्वसाधारण |
| ४५ | नागरीकांचा मागासवर्ग | सर्वसाधारण महिला |
| ४६ | अनुसूचित जाती | सर्वसाधारण महिला |
| ४७ | अनुसूचित जाती | सर्वसाधारण महिला |
| ४८ | नागरीकांचा मागासवर्ग महिला | सर्वसाधारण |
| ४९ | सर्वसाधारण महिला | सर्वसाधारण |
| ५० | नागरीकांचा मागासवर्ग महिला | सर्वसाधारण |
| ५१ | अनुसूचित जाती | सर्वसाधारण महिला |
| ५२ | नागरीकांचा मागासवर्ग | सर्वसाधारण महिला |
| ५३ | सर्वसाधारण महिला | सर्वसाधारण |
| ५४ | नागरीकांचा मागासवर्ग महिला | सर्वसाधारण |
| ५५ | नागरीकांचा मागासवर्ग महिला | सर्वसाधारण |
| ५६ | अनुसूचित जाती | सर्वसाधारण महिला |
| ५७ | नागरीकांचा मागासवर्ग महिला | सर्वसाधारण |
| ५८ | सर्वसाधारण महिला | सर्वसाधारण |
| ५९ | सर्वसाधारण महिला | सर्वसाधारण |
| ६० | अनुसूचित जाती महिला | सर्वसाधारण |
| ६१ | नागरीकांचा मागासवर्ग महिला | सर्वसाधारण |
| ६२ | नागरीकांचा मागासवर्ग महिला | सर्वसाधारण |
| ६३ | नागरीकांचा मागासवर्ग | सर्वसाधारण महिला |
| ६४ | नागरीकांचा मागासवर्ग | सर्वसाधारण महिला |
| ६५ | अनुसूचित जाती | सर्वसाधारण महिला |
| ६६ | सर्वसाधारण महिला | सर्वसाधारण |
| ६७ | नागरीकांचा मागासवर्ग | सर्वसाधारण महिला |
| ६८ | अनुसूचित जाती महिला | सर्वसाधारण |
| ६९ | नागरीकांचा मागासवर्ग महिला | सर्वसाधारण |
| ७० | नागरीकांचा मागासवर्ग | सर्वसाधारण महिला |
| ७१ | अनुसूचित जाती | सर्वसाधारण महिला |
| ७२ | नागरीकांचा मागासवर्ग | सर्वसाधारण महिला |
| ७३ | नागरीकांचा मागासवर्ग | सर्वसाधारण महिला |
| ७४ | नागरीकांचा मागासवर्ग महिला | सर्वसाधारण |
| ७५ | सर्वसाधारण महिला | सर्वसाधारण |
| ७६ | सर्वसाधारण महिला | सर्वसाधारण |

सुची

- अनुसूचित जमाती
- अनुसूचित जाती
- नागरीकांचा मागासवर्ग महिला
- नागरीकांचा मागासवर्ग
- सर्वसाधारण महिला